तरुण भारत

# राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे 'सशक्त साधन'

## आमदार मनोजदादा घोरपडे यांचे प्रतिपादन, नागठाणे महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

वार्ताहर
देशमुखनगर

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांना समाजाची सेवा करण्याबरोबरच श्रमसंस्कार शिबिरातून सामूहिक सेवा करण्याचा अनुभव मिळतो, त्यातून त्यांचे संघटन कौशल्य विकसित होते. आणि व्यक्तिमत्व विकास घडून येतो. त्यामूळे राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे 'सशक्त साधन' आहे, असे उदगार कराड उत्तरचे आमदार मनोजदादा घोरपडे यांनी काढले.

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयातील शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर खोजेवाडी (ता. जि. सातारा) येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटन समारंभात



खोजेवाडी : श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार मनोज घोरपडे.

प्रमुख उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते.

आमदार मनोजदादा घोरपडे म्हणाले, युवकांनी श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून दत्तक खेड्याचा विकास साधण्यासाठी गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प कार्यान्वित करावेत. शिबिरात श्रमदानातून समाजसेवा व उदबोधन कार्यक्रमांमधून मूल्ये व चांगले विचार आत्मसात करावेत. आजचा युवक हा उद्याचा सुजाण नागरिक आहे यासाठी त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास केला पाहिजे.

प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड म्हणाले, श्रमसंस्कार शिबिर कालावधीमध्ये सहजीवन, सहशिक्षण व सहभोजन या प्रक्रियांच्या माध्यमातून सर्वधर्मी समानत्व या भावनेचा विकास होतो. स्वयंसेवकांनी लोकांशी संवाद साधावा. आणि संवादकौशल्य अवगत करावे. श्रमसंस्कार शिबिरातून युवकांनी श्रमदानाचे महत्त्व जाणून घेणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमात खोजेवाडी ग्रामस्थांच्यावतीने आमदार मनोजदादा घोरपडे यांची आमदारपदी निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी प्रतिष्ठित नागरिक व मान्यवर उपस्थित होते.

या समारंभाच्या सुरुवातीस शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय कराड येथील प्रोफेसर प्राचार्य डॉ. सतीश घाटगे यांचा एनएसएस स्फूर्ती गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. जयमाला उथळे यांनी केले तर आभार डॉ सुनील पवार यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी माजी पंचायत समिती सदस्य संजयबाबा घोरपडे, खोजेवाडीच्या सरपंच सौ. वैशाली घोरपडे, उपसरपंच अशोक मदने, ग्रामपंचायत सदस्य, मान्यवर तसेच राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरातील सर्व स्वयंसेवक, स्वयंसेविका, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# पुण्यभूमी महाराष्ट्र न्यूज

Saturday 1st February 2025 | Pynyabhoomimaharashtra@gmail.com | website: www.mywebsite.com


# तारुण्याच्या उंबरठ्यावरती येणाऱ्या आव्हानांना युवकांनी धैर्याने सामोरे जावे. - मा किशोर काळोखे



**सातारा प्रतिनिधी : बजरंग चौधरी** सातारा : युवकांनी तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना पळवाटा, चोरवाटा न शोधता चांगल्या वाटा शोधा. शेतातील खत, कुटुंबातील मत व समाजातील पत सांभाळता येणारा खरा श्रीमंत असतो. म्हणून युवकांनी शारीरिक सक्षमतेबरोबरच मानसिक सक्षमता वाढवून तारुण्याच्या उंबरठ्यावरती येणाऱ्या आव्हानांना धैर्याने सामोरे जावे. असे उदगार मा. किशोर काळोखे (प्रकल्पाधिकारी परिवर्तन व्यसनमुक्ती संस्था सातारा ) यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे खोजेवाडी ता. जि. सातारा या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरातील दुसऱ्या दिवसाचे पुष्प गुंफताना तारुण्याच्या उंबरठ्यावरती या विषयावर ते बोलत होते.

मा. किशोर काळोखे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, तरुणांना चांगली मैत्री करता आली पाहिजे. जीवनात चांगले मित्र असणे गरजेचे आहे. जीवनाची ध्येय निश्चित करता आले पाहिजे. व्यसनापासून दूर राहणे सद्यस्थितीत आवश्यक आहे.त्याचबरोबर आपल्यातील सुप्त गुणांच्या विकासाबरोबरच अनेक कौशल्य आत्मसात करत आत्मनिर्भर बनावे.

या प्रबोधनपर व्याख्यानाचे प्रास्ताविक स्वयंसेविका कु. स्नेहा पवार हिने केले. सूत्रसंचालन अनिता गायकवाड यांनी केले तर आभार कु. प्रतिक्षा जाधव हिने मानले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री अशोक मदने उपसरपंच खोजेवाडी होते तर प्रा.अभय जायभाये आणि हिराबाई घोरपडे (ग्रामपंचायत सदस्या) यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचबरोबर या ग्रामस्थ, स्वयंसेवक स्वयंसेविका बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमअधिकारी डॉ. संदीप लोखंडे व डॉ. सुनील पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे सदस्य प्रा शितल सालवाडगी, प्रा. संतोष सोंडगे, प्रा. सुनीता जाधव, प्रा. भालचंद्र बिचीतकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

लोकराज्य न्यूज 1

मंगळवार दिनांक २८ जानेवारी २०२५

# राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे 'सशक्त साधन' - मा. आ. मनोजदादा घोरपडे

नागठाणे प्रतिनिधी:

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांना समाजाची सेवा करण्याबरोबरच श्रमसंस्कार शिबीरातून सामुहिक सेवा करण्याचा अनुभव मिळतो त्यातून त्यांचे संघटन कौशल्य विकसित होते. आणि व्यक्तिमत्व विकास घडून येतो. त्यामूळे राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे 'सशक्त साधन' आहे असे उदगार कराड उत्तरचे आमदार मनोजदादा घोरपडे यांनी काढले.



आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयातील शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे खोजेवाडी ता जि सातारा येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटन समारंभात प्रमुख उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते . मा. आमदार मनोज दादा घोरपडे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, युवकांनी श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून दत्तक खेड्याचा विकास साधण्यासाठी गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प कार्यान्वित करावेत. शिबीरात श्रमदानातून समाजसेवा व उदबोधन कार्यक्रमांमधून मूल्ये व चांगले विचार आत्मसात करावेत. आजचा युवक हा उद्याचा सुजाण नागरिक आहे यासाठी त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास केला पाहिजे.

विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उदघाटनाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले , श्रमसंस्कार शिबिर कालावधीमध्ये सहजीवन, सहशिक्षण व सहभोजन या प्रक्रियांच्या माध्यमातून सर्वधर्मी समानत्व या भावनेचा विकास होतो. स्वयंसेवकांनी लोकांशी संवाद साधावा. आणि संवादकौशल्य अवगत करावे.

या कार्यक्रमात खोजेवाडी ग्रामस्थांच्यावतीने मा. आमदार मनोज दादा घोरपडे यांची आमदारपदी निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी प्रतिष्ठित नागरिक व मान्यवर उपस्थित. या समारंभाच्या सुरुवातीस शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय कराड येथील प्रोफेसर प्राचार्य डॉ. सतीश घाटगे यांचा एन एस एस स्फूर्ती गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.संदीप लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. जयमाला उथळे यांनी केले तर आभार डॉ सुनील पवार यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरातील सर्व स्वयंसेवक स्वयंसेविका, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे 'सशक्त साधन' : आ. मनोजदादा घोरपडे

सातारा न्यूज;
देशमुखनगर : राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांना समाजाची सेवा करण्याबरोबरच श्रमसंस्कार शिबीरातून सामुहिक सेवा करण्याचा अनुभव मिळतो त्यातून त्यांचे संघटन कौशल्य विकसित होते. आणि व्यक्तिमत्व विकास घडून येतो. त्यामूळे राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे 'सशक्त साधन' आहे असे उदगार कराड उत्तरचे आमदार मनोजदादा घोरपडे यांनी काढले.

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयातील शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे खोजेवाडी ता जि सातारा येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटन समारंभात प्रमुख उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते.

आमदार मनोज दादा घोरपडे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, युवकांनी श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून दत्तक खेड्याचा विकास साधण्यासाठी गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प कार्यान्वित करावेत. शिवीरात श्रमदानातून समाजसेवा व उदबोधन कार्यक्रमांमधून मूल्ये व चांगले विचार आत्मसात करावेत. आजचा युवक हा उद्याचा सुजाण नागरिक आहे यासाठी त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास केला पाहिजे.

विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उदघाटनाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, श्रमसंस्कार शिबिर कालावधीमध्ये सहजीवन, सहशिक्षण व सहभोजन या प्रक्रियांच्या



माध्यमातून सर्वधर्मी समानत्व या भावनेचा विकास होतो. स्वयंसेवकांनी लोकांशी संवाद साधावा. आणि संवादकौशल्य अवगत करावे.

या कार्यक्रमात खोजेवाडी ग्रामस्थांच्या वतीने मा. आमदार मनोज दादा घोरपडे यांची आमदारपदी निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार करण्यात आला.

त्यावेळी प्रतिष्ठित नागरिक व मान्यवर उपस्थित. या समारंभाच्या सुरुवातीस शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय कराड येथील प्रोफेसर प्राचार्य डॉ. सतीश घाटगे यांचा एन एस एस स्फूर्ती गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. जयमाला उथळे यांनी केले तर आभार डॉ सुनील पवार यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी मा. संजय बाबा घोरपडे (प.स. सदस्य), सौ वैशाली घोरपडे (सरपंच , खोजेवाडी) श्री अशोक भिवा मदने (उपसरपंच खोजेवाडी) ग्रामपंचायत सदस्य, मान्यवर व सर्व ग्रामस्थ तसेच राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरातील सर्व स्वयंसेवक स्वयंसेविका, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रीतिसंगम

# नागठाणे महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा उत्साहात संपन्न

**नागठाणे/प्रतिनिधी:**

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून जिल्हा कौशल विकास रोजगार व उद्योजक्ता मार्गदर्शन केंद्र, सातारा यांच्यावतीने महाविद्यालयातील प्लेसमेंट विभाग यांच्या विद्यमाने महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा यशस्वीरित्या संपन्न झाला.



रोजगार मेळाव्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना संबंधित माहिती सर्व उद्योजक व उमेदवारांना देवून या योजनेतून प्रशिक्षणार्थी घेण्यासाठी आस्थापनांना आवाहन करण्यात आले. या रोजगार मेळाव्यात २३ उद्योजक उपस्थित राहिले होते. यात १११५ पदासाठी ४३० उमेदवारांनी मुलाखती दिल्या. त्यामध्ये २१७ उमेदवारांची प्राथमिक निवड करून ४७ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. त्याचबरोबर उचधघझध करिता १० प्रशिक्षणार्थी उमेदवारांची ही निवड केली.

या रोजगार मेळाव्यात इस्राईल मधील नॉनवॉर झोन मध्ये घरगुती सहायक या क्षेत्रांत युवक युवतींना रोजगाराची संधी मिळावी याकरिताही कॅम्पचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये १७ उमेदवारांनी उपस्थिती दर्शवली. त्यांना या योजनेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यातील ०३ उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज भरून घेण्यात आले आहेत.

रोजगार मेळाव्याचे उदघाटन श्री सुनील पवार (सहाय्यक उपायुक्त जिल्हा कौशल्य विकास जिल्हा रोजगार व उद्योजकता केंद्र सातारा ) यांच्या उपस्थितीत व महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. सहाय्यक उपायुक्त सुनील पवार यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या उद्योजकता आणि रोजगार याबाबतच्या विविध योजनांची माहिती उमेदवारांना देऊन मुलाखतीसाठी शुभेच्छा दिल्या. उदघाटनपर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ संदीप लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शितल सालवाडगी व प्रा.भालचंद्र बिचितकर यांनी केले. तर आभार डॉ. नागनाथ चोबे यांनी मानले.

रोजगार मेळावा संपूर्ण बैठक व्यवस्थेचे नियोजन डॉ. राजाराम कांबळे व डॉ सुनील पवार यांनी केली. मेळावा यशस्वी करण्यासाठी प्लेसमेंट विभागातील सर्व सदस्य, जिल्हा कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातील सर्व कर्मचारी, नागठाणे व परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मोकाशी महाविद्यालयातील विद्यार्थीनी बनली अधिकारी

प्रीतिसंगम

# युवकांचे प्रेरणास्थान: श्री स्वामी विवेकानंद

## माजी प्राचार्य. डॉ.जे.एस. पाटील




**नागठाणे/प्रतिनिधी:**
श्री स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन राष्ट्रीय युवक दिन म्हणून साजरा केला जातो. ते एक जगविख्यात सन्यांशी होते. त्यांनी आपल्या वैश्विक एकतेच्या विचारातून सर्व मानवजातीला बंधूतेचा, मानवतेचा संदेश देऊन जगात सुख, शांती नांदण्यासाठी महान कार्य केले. आपल्या विचार व कार्यातून देशाला घडविण्यासाठी युवकांना त्यांनी अद्वितीय प्रेरणा दिली. म्हणूनच ते युवकांचे प्रेरणास्थान आहेत. असे उदगार मा. प्राचार्य डॉ. जे.एस.पाटील यांनी काढले.

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या श्री स्वामी विवेकानंद सप्ताहाच्या सांगता समारंभात श्री स्वामी विवेकानंद : युवकांचे प्रेरणास्थान या विषयावर ते बोलत होते.

प्राचार्य डॉ जे एस पाटील आपल्या भाषणात पुढे म्हणाले, युवक हे देशाचे खरे आधारस्तंभ आहेत. म्हणून राष्ट्रातील युवकांना प्रतिभासंपन्न, शिस्तप्रिय, चारित्र्यवान व जबाबदार नागरिक घडविण्यासाठी विवेकानंदांनी शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. त्यांनी जगभरात अनेक व्याख्याने दिली. त्यांचे हे महान कार्य युवकांसाठी महत्वपूर्ण व दिशादर्शक आहे.

या व्याख्यानपर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, स्वामी विवेकानंद हे धर्म, इतिहास, तत्वज्ञान, कला, सामाजिक विज्ञान आणि साहित्याचे प्रचंड अभ्यास होते. शिकागो येथे झालेल्या जागतिक धर्म परिषदेत त्यांनी भारत आणि हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व केले. तेव्हा त्यांच्या विचाराने संपूर्ण जग त्यांच्याकडे आकर्षित झाले.भारतीय संस्कृतीला जगभर ओळख मिळाली.

या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले श्री. मनोहर साळुंखे (कृषीभूषण, महाराष्ट्र राज्य) यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. तसेच विवेकानंद जयंती सप्ताह मध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या शुभहस्ते पारितोषिक व बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. संतोष निलाखे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजाराम कांबळे यांनी केले तर आभार डॉ.जयमाला उथळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# पुण्यभूमी महाराष्ट्र न्यूज

## राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे 'सशक्त साधन' मा. आमदार मनोजदादा घोरपडे



पुण्यभूमी प्रतिनिधी : बजरंग चौधरी

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांना समाजाची सेवा करण्याबरोबरच श्रमसंस्कार शिबीरातून सामुहिक सेवा करण्याचा अनुभव मिळतो त्यातून त्यांचे संघटन कौशल्य विकसित होते. आणि व्यक्तिमत्व विकास घडून येतो. त्यामूळे राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे 'सशक्त साधन' आहे असे उदगार कराड उत्तरचे आमदार मनोजदादा घोरपडे यांनी काढले.

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयातील शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे खोजेवाडी ता जि सातारा येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटन समारंभात प्रमुख उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते .

मा. आमदार मनोज दादा घोरपडे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, युवकांनी श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून दत्तक खेड्याचा विकास साधण्यासाठी गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प कार्यान्वित करावेत. शिबीरात श्रमदानातून समाजसेवा व उदबोधन कार्यक्रमांमधून मूल्ये व चांगले विचार आत्मसात करावेत. आजचा युवक हा उद्याचा सुजाण नागरिक आहे यासाठी त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास केला पाहिजे.

विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उदघाटनाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले , श्रमसंस्कार शिबिर कालावधीमध्ये सहजीवन, सहशिक्षण व सहभोजन या प्रक्रियांच्या माध्यमातून सर्वधर्मी समानत्व या भावनेचा विकास होतो. स्वयंसेवकांनी लोकांशी संवाद साधावा. आणि संवादकौशल्य अवगत करावे.

या कार्यक्रमात खोजेवाडी ग्रामस्थांच्यावतीने मा. आमदार मनोज दादा घोरपडे यांची आमदारपदी निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी प्रतिष्ठित नागरिक व मान्यवर उपस्थित. या समारंभाच्या सुरुवातीस शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय कराड येथील प्रोफेसर प्राचार्य डॉ. सतीश घाटगे यांचा एन एस एस स्फूर्ती गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.संदीप लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. जयमाला उथळे यांनी केले तर आभार डॉ सुनील पवार यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरातील सर्व स्वयंसेवक स्वयंसेविका, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना सकारात्मक दृष्टिकोन रुजवते : प्रा.ए.बी.कणसे

**सातारा न्यूज;**

**देशमुखनगर :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी जीवनात कायम शिस्त लावून घेतली तर खऱ्या अर्थाने त्याचे जीवन घडेल. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असतो. तो सकारात्मक दृष्टिकोन स्वयंसेवकांच्यात रुजवण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना करते असे प्रतिपादन प्रा.ए.बी. कणसे यांनी मानले.

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे खोजेवाडी ता जि. सातारा येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात व्याख्यानपर कार्यक्रमात ते 'राष्ट्रीय सेवा योजना व आजचा युवक' या विषयावर बोलत होते.

प्रा.ए.बी.कणसे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, एन एस एस ही एक दिंडी असून ती विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून गावोगावी जाते. या दिंडीत सहभागी असलेला स्वयंसेवक दत्तक गावात सामाजिक जनजागृती, प्रबोधन व श्रमदानातून ग्रामस्वच्छता करून श्रमसंस्काराची शिदोरी आत्मसात करतो. स्वयंसेवकांनी चिरंतर आठवण राहील अशा रितीने शिबिरातील विविध उपक्रमात सहभागी होऊन आपल्या कार्याचा ठसा उठवावा असे मत त्यांनी मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जयमाला उथळे या होत्या. त्यांनी आपल्या भाषणामध्ये एन एस एस च्या माध्यमातून स्वयंसेवकांना श्रमाची स्वच्छतेची व जागरूकतेची जाणीव होत असते आणि ती जाणीव त्याला आयुष्यामध्ये यशस्वी करण्यासाठी उपयोगी ठरत असते असे मत मांडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत कु. वैष्णवी साळुंखे हीने केले. सूत्रसंचालन कु. प्रतीक्षा देशमुख हिने केले तर आभार कु. अनुजा महाडिक हिने केले. त्यावेळी सौ. हिराबाई घोरपडे (ग्रामपंचायत सदस्या) व श्री. विश्वनाथ साळुंखे उपस्थित होते.

प्रीतिसंगम

# काळाच्याही पुढे असणारा प्रजाहितदक्ष राजा छ.प्रतापसिंह महाराज

## विजय मांडके

**नागठाणे/प्रतिनिधी:**

छत्रपती शाहू महाराज यांच्यावर छ. प्रतापसिंह महाराज यांच्या समाज सुधारणेचा प्रभाव पडला होता. प्रतापसिंह महाराज यांनी सातारा हे शहर अत्याधुनिक पद्धतीने वसवले. शहरात नवा राजवाडा, जलमंदिर पॅलेस यांसारख्या काही वास्तू बांधल्या. शहराला पाणीपुरवठा व्हावा म्हणून यवतेश्वर डोंगरावर तलाव खोदून खापरी नळाने गावात पाणी आणले. तसेच मुलांच्या शिक्षणासाठी पाठशाळा काढली आणि संस्कृत-मराठीबरोबर इंग्रजी भाषेच्याही अध्ययनाला उत्तेजन दिले. छापखाना काढून अनेक उपयुक्त ग्रंथ छापविले. याशिवाय मराठा तरुण-तरुणींना लष्करी शिक्षण देण्यास प्रारंभ केला.सती बंदीचा कायदा केला.अशा समाज सुधारणा करणारा काळाच्याही



पुढे असणारा प्रजाहितदक्ष राजा म्हणून इतिहासात अजरामर झाला असे उदगार विजय मांडके (ज्येष्ठ विचारवंत व पत्रकार )यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती प्रतापसिंह महाराज व्याख्यानमालेत 'समाज सुधारक प्रतापसिंह महाराज व महाराष्ट्रातील समाज परिवर्तन ' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड हे होते.

विजय मांडके आपल्या भाषणात पुढे म्हणाले , सवाई माधवरावाने छत्रपतिपदाची प्रतिष्ठा सामान्यतः राखली परंतु दुसरा बाजीरावाने त्यांचा अवमान करण्यास प्रारंभ केला व अखेरीस छत्रपती प्रतापसिंहांना काशी येथे स्थानबद्ध केले व तेथेच त्यांचा मृत्यु झाला. इतिहासात लोकोपयोगी काम करणारा एक सद्गुणी, लोककल्याणकारी राजा म्हणून प्रतापसिंह महाराज यांचे नाव सुवर्ण अक्षराने लिहिण्यासारखे आहे.

या व्याख्यानमालेचे अध्यक्ष कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, प्रतापसिंह महाराज यांनी स्वतंत्र ग्रंथालय निर्माण केले. त्यांच्या मृत्यूनंतर ते त्यांच्या पत्नीने लोकार्पण केले. प्रतापसिंह महाराजांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. ते दूरदृष्टीचे राजे होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्याख्यानमालेचे समन्वयक प्रा. संतोष निलाखे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शौकत आतार यांनी केले. तर आभार डॉ.राजाराम कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गणेश साळुंखे, उपाध्यक्ष प्रदीप बर्गे, उद्योजक अक्षय जेधे तसेच सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक बंधू भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने विद्यापीठ व राज्यस्तरीय स्पर्धात विविध कलाप्रकारात यश संपादन केल्यामुळे उद्योजक अक्षय जेधे यांनी सांस्कृतिक विभागासाठी पंधरा हजार रुपयांची देणगी दिली.

# पुण्यभूमी महाराष्ट्र न्यूज

Tuesday 21st January 2025 | सर्वसामान्यांचे हक्काचे व्यासपीठ | मुख्य संपादक मंगेश पवार


# नागठाणे महाविद्यालयात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन '




| अ.क्र | आस्थापनेचे नाव | पदाचे नाव | पदांची संख्या | शैक्षणिक पात्रता | वयोमर्यादा | बैठक व्यवस्था |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | [illegible] | ऑपरेटर/लॅब ऑपरेटर/स्टोअर किपर | ३० | १०वी,१२ वी/ बीएससी केमेस्ट्री/ बी कॉम/एम कॉम/ एम बी ए मार्केटिंग | स्त्री/पुरुष २० ते ३५ | १ ला मजला खोली क्र.२०१ |
| ०२ | टफ गिअर, ट्रान्समिशन सातारा | क्वालिटी/ ट्रेनी आयटीआय | ५० | बीई मेकॅनिकल / आयटीआय सीएनसी/ व्हीएमसी/ एचएमसी/क्वालिटी/टर्नर | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | १ ला मजला खोली क्र.२०२ |
| ०३ | [illegible] इंजिनिअरिंग प्रा.लि. सातारा | सिनियर ऑफिसर/ज्युनियर ऑफिसर / मार्केटींग ऑफिसर | ११ | डिप्लोमा / बी.ई. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग /एम.बी.ए मार्केटिंग / बी.ई. / बी.टेक / बी.एससी / डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग | स्त्री/पुरुष २० ते ३५ | १ ला मजला खोली क्र.२०३ |
| ०४ | कूपर कॉर्पोरेशन प्रा.लि. सातारा | फौंड्री ऑपरेटर / आयटीआय ट्रेनी / मेकॅनिक | ५० | आयटीआय, फौन्ड्री,फिटर,टर्नर,वायरमन इलेक्ट्रीशियन / डिप्लोमा मेकॅनिकल | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | १ ला मजला खोली क्र.२०४ |
| ०५ | [illegible] इंजिनिअरिंग लि. सातारा | ट्रेनी आयटीआय | ३८ | आयटीआय मशिनिस्ट / फिटर / टर्नर | स्त्री/पुरुष [illegible] | १ ला मजला खोली क्र.२०५ |
| ०६ | [illegible] इंजिनिअरिंग प्रा.लि. सातारा | टेक्निशियन इलेक्ट्रीकल / ट्रेनी आयटीआय / डिझाईन इंजिनिअर | १८ | आयटीआय बीएससी /इलेक्ट्रीकल / मशिनिस्ट /वेल्डर/फिटर/ बीई मेकॅनिकल अनुभव आवश्यक | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | १ ला मजला खोली क्र.२०६ |
| ०७ | [illegible] प्रा.लि. शिरवळ | आयटीआय फिटर/ इलेक्ट्रीशियन/ कॉम्प्युटर ऑपरेटर | १४ | आयटीआय फिटर/ इलेक्ट्रीशियन/ कॉम्प्युटर ऑपरेटर | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | १ ला मजला खोली क्र.२०७ |
| ०८ | [illegible] प्रा.लि.सातारा | डिझाईन इंजिनिअर/ सेल्स & मार्केटींग/ बँक ऑफिस | ११ | पदवीधर/बीई/बीटेक | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | दुसरा मजला ३०१ |
| ०९ | [illegible], पुणे | सेल्स & मार्केटींग | १० | पदवीधर/[illegible] | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | दुसरा मजला ३०२ |
| १० | [illegible] सर्व्हिसेस,सातारा | मशीन ऑपरेटर | ६० | आयटीआय सर्व ट्रेड/ डिप्लोमा मेकॅनिकल | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | दुसरा मजला ३०३ |
| ११ | [illegible] प्रा.लि पुणे | इंजिनिअर | ३० | आयटीआय इलेक्ट्रीशियन/[illegible] डिप्लोमा बीई इलेक्ट्रॉनिक्स | स्त्री/पुरुष [illegible] | दुसरा मजला ३०४ |
| १२ | [illegible] इंडीया लिमिटेड हिंजवडी पुणे | ट्रेनी | १५० | दहावी / बारावी / सर्व ट्रेड आयटीआय / कोणत्याही शाखेची पदवी | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | दुसरा मजला ३०५ |
| १३ | [illegible] सातारा | ट्रेनी आयटीआय | ३५ | आयटीआय सर्व ट्रेड | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | दुसरा मजला ३०६ |
| | | ट्रेनी डिप्लोमा | १० | डिप्लोमा इंजिनिअरिंग | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | |
| १४ | श्री एच आर सर्व्हिसेस सातारा | ट्रेनी | ५० | दहावी / बारावी / सर्व ट्रेड आयटीआय / कोणत्याही शाखेची पदवी | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | दुसरा मजला ३०७ |
| १५ | [illegible] एज्युकेशन ट्रेनिंग लि. | अॅप्रेन्टीशिप ट्रेनी | १०० | १० वी,१२ वी पदवीधर, आयटीआय डिप्लोमा बीएस्सी | स्त्री/पुरुष १८ ते ३२ | दुसरा मजला ३०८ |
| १६ | स्पंदना स्फुर्ती फायनान्स लि. सातारा | लोन ऑफिसर | ५० | १० वी ते पदवीधर | स्त्री/पुरुष १८ ते ३५ | पहिला मजला हॉल [illegible] |
| १७ | एल आय सी इंडिया, सातारा | पंतप्रधान विमा सखी / रुरल करियर प्रतिनिधी | २६० | १० वी पास ते पदवीधर | स्त्री/पुरुष [illegible] | पहिला मजला हॉल २०५ |
| | एकुण रिक्तपदे | | १०४७ | | | |

टीप : [illegible]

आर्ट्स , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक 24 जानेवारी 2025 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 2.30 या वेळेत पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यासाठी प्रवेश विनामूल्य असून ऑपरेटर लॅब व स्टोर कीपर / क्वालिटी ट्रेनिंग आयटीआय/ ज्युनिअर व सिनिअर ऑफिसर /मार्केटिंग ऑफिसर /फौड्री ऑफिसर / आयटीआय ट्रेनी मेकॅनिक / टेक्निशियन इलेक्ट्रिकल/ट्रेनि आयटीआय/डिझाईन इंजिनिअर /आयटीआय फिटर/ इलेक्ट्रिशियन / कॉम्प्युटर ऑपरेटर /डिझाईनिंग इंजिनियर सेल्स अँड मार्केटिंग / बँक ऑफिस , मशीन ऑपरेटर , इंजिनीयर/ लोन ऑफिसर /अप्रेन्टीशिप ट्रेनि/पंतप्रधान बिमा सखी / रुरल करिअर प्रतिनिधी अशा एकूण १०४७ पदासाठी भरती होत आहे.

तसेच निवड झालेल्या उमेदवारांना तासवडे, सातारा व शिरवळ एमआयडीसी, तसेच पुणे येथील नामांकित कंपनीत नोकरी करण्याची संधी मिळणार आहे. हा रोजगार मेळावा यशस्वी करण्यासाठी नागठाणे व महाविद्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विविध गावच्या ग्रामपंचायती तसेच बोरगाव पोलीस स्टेशन बोरगाव यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे.

तरी गरजू उमेदवारांनी मुलाखतीस येताना आपली सर्व मूळ शैक्षणिक कागदपत्रे व त्याच्या 4 झेरॉक्स प्रती सोबत आणून पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे व या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी केले आहे.


संपादक : दिलीप वाघमारे

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, संचलित

# थोरले प्रतापसिंह हे काळाच्याही पुढे असणारे प्रजाहितदक्ष राजे होते

प्रतिनिधी
सातारा

आठव्या शतकात मराठा तरुणींना लष्करी शिक्षणाबरोबरच पाठशाळा काढून त्यांच्या शिक्षणाला प्राधान्य देणारे सातारचे थोरले प्रतापसिंह महाराज हे समाज सुधारणा करण्यात अग्रेसर होते म्हणूनच ते काळाच्याही पुढे असणारे प्रजाहितदक्ष राजे होते असे उद्‍गार जेष्ठ पत्रकार विजय मांडके यांनीही नागठाणे येथे बोलताना व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज डॉट ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त नागठाणे येथील महाविद्यालयात आयोजित छत्रपती प्रतापसिंह महाराज व्याख्यानमालेत समाज सुधारक प्रतापसिंह महाराज व महाराष्ट्रातील समाज परिवर्तन या विषयावर विजय मांडके बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड होते.



**नागठाणे : विजय मांडके बोलताना शेजारी प्रभारी प्राचार्य डॉ. महेश गायकवाड, प्रा. डॉ. अजितकुमार जाधव, गणेश साळुंखे, अक्षय जेधे, प्रदीप बर्गे आदी दिसत आहेत.**

कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्यावर साताराच्या छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या समाज सुधारण्यांचा प्रभाव पडलेला होता म्हणूनच त्यांनी आग्रहपूर्वक प्रबोधनकार ठाकरे यांच्याकडून उपेक्षित राहिलेल्या छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचा इतिहास लिहून घेण्याचे वचन घेतले आणि वचन दिल्याप्रमाणे प्रबोधनकार ठाकरे यांनी थोरल्या प्रतापसिंह महाराजांवरील ग्रंथ लिहिला.

प्रतापसिंह महाराज यांनी सातारा हे शहर अत्याधुनिक पद्धतीने पसरले तसेच साताऱ्यात नवा राजवाडा, जलमंदिर पॅलेस यासारख्या वास्तू बांधल्या. सातारा शहराला पाणीपुरवठा व्हावा म्हणून यवतेश्वरच्या डोंगरावर तलाव खोदून खापरी नळाने गावात पाणी आणले. तसेच संस्कृत मराठी बरोबरच इंग्रजी भाषेच्या ही अध्ययनाला उत्तेजन दिले. छापखाना काढून अनेक उपयुक्त ग्रंथ प्रसिद्ध केले. सती बंदीचा कायदा सातारा संस्थानामध्ये केला. असे समाजसुधारक व प्रजाहितदक्ष राजे म्हणून प्रतापसिंह महाराज ओळखले जातात असे सांगून विजय मांडके यांनी एक सद्‍गुणी लोकोपयोगी काम करणारा लोककल्याणकारी राजा म्हणून प्रतापसिंह महाराज यांचे नाव इतिहासात सुवर्ण अक्षरानेच लिहिले पाहिजे असे त्यांचे काम होते.

दुसरा बाजीराव पेशवा, तसेच बाळाजीपंत नातू यांनी इंग्रज अधिकाऱ्यांच्या साथीने प्रतापसिंह महाराज यांच्या विरोधात कसा कट रचला याबाबतही ऐतिहासिक दाखले देत विजय मांडके यांनी प्रतापसिंह महाराजांचे चरित्र व चारित्र्य श्रोत्यांपुढे सादर केले.

प्रतापसिंह महाराजांनी स्वतंत्र ग्रंथालय निर्माण केले. त्यांच्या मृत्यूनंतर ते त्यांच्या पत्नीने लोकार्पण केले. दूरदृष्टीचे असे हे राजे होते असे गौरवोद्‍गार अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रभारी प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविक व्याख्यानमालेचे समन्वयक प्रा. संतोष निलाखे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शौकत आतार यांनी केले. आभार डॉ. राजाराम कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गणेश साळुंखे, उपाध्यक्ष प्रदीप बर्गे, उद्योजक अक्षय जेधे तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक बंधू भगिनी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने विद्यापीठ व राज्यस्तरीय स्पर्धात विविध कलाप्रकारात यश संपादन केल्यामुळे उद्योजक अक्षय जेधे यांनी सांस्कृतिक विभागासाठी पंधरा हजार रुपयांची देणगी दिली.

JDS/RRW

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# नागठाणे कॉलेजमध्ये शुक्रवारी रोजगार मेळावा

**नागठाणे : पुढारी वृत्तसेवा**

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि नागठाणे कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. २४ रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० या वेळेत पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यासाठी प्रवेश विनामूल्य असून ऑपरेटर लॅब व स्टोर कीपर, क्वालिटी ट्रेनिंग, आयटीआय ऑफिसर, मार्केटिंग ऑफिसर, फौड्री ऑफिसर, आयटीआय ट्रेनी मेकॅनिक, टेक्निशियन इलेक्ट्रिकल, ट्रेनि आयटीआय, डिझाईन इंजिनिअर, आयटीआय फिटर, इलेक्ट्रिशियन, कॉम्प्युटर ऑपरेटर,डिझाईनिंग इंजिनियर सेल्स अँड मार्केटिंग, बँक ऑफिस, मशीन ऑपरेटर, इंजिनीयर, लोन ऑफिसर, अप्रेन्टीशिप ट्रेनी अशा विविध १ हजार ४७ पदासाठी भरती होत आहे.

या मेळाव्यातून निवड झालेल्या उमेदवारांना तासवडे, सातारा व शिरवळ एमआयडीसी, तसेच पुणे येथील नामांकित कंपनीत नोकरी करण्याची संधी मिळणार आहे.

तरी युवकांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य कॅ. डॉ. महेश गायकवाड यांनी केले.

Satara Edition
Jan 22, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com



नागठाणे : व्याख्यानमालेत बोलताना विजय मांडके, शेजारी प्रभारी प्राचार्य डॉ. महेश गायकवाड , प्रा. डॉ. अजितकुमार जाधव, गणेश साळुंखे, अक्षय जेधे, प्रदीप बर्गे.

# थोरले प्रतापसिंह महाराज प्रजाहितदक्ष राजे : मांडके

सातारा, दि. १८(प्रतिनिधी) - आठव्या शतकात मराठा तरुणींना लष्करी शिक्षणाबरोबरच पाठशाळा काढून त्यांच्या शिक्षणाला प्राधान्य देणारे साताराचे थोरले प्रतापसिंह महाराज हे समाज सुधारणा करण्यात अग्रेसर होते म्हणूनच ते काळाच्याही पुढे असणारे प्रजाहितदक्ष राजे होते, असे उद्गार ज्येष्ठ पत्रकार विजय मांडके यांनीही शनिवारी नागठाणे येथे बोलताना व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त नागठाणे येथील महाविद्यालयात आयोजित छत्रपती प्रतापसिंह महाराज व्याख्यानमालेत विजय मांडके बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड होते.

मांडके म्हणाले, प्रतापसिंह महाराज यांनी सातारा हे शहर अत्याधुनिक पद्धतीने पसरले तसेच साताऱ्यात नवा राजवाडा, जलमंदिर पॅलेस यासारख्या वास्तू बांधल्या. सातारा शहराला पाणीपुरवठा व्हावा म्हणून यवतेश्वरच्या डोंगरावर तलाव खोदून खापरी नळाने गावात पाणी आणले. तसेच संस्कृत मराठी बरोबरच इंग्रजी भाषेच्या ही अध्ययनाला उत्तेजन दिले. छापखाना काढून अनेक उपयुक्त ग्रंथ प्रसिद्ध केले. सती बंदीचा कायदा सातारा संस्थानामध्ये केला. असे समाज सुधारक व प्रजाहितदक्ष राजे म्हणून प्रतापसिंह महाराज ओळखले जातात. प्रा. संतोष निलाखे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शौकत आतार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राजाराम कांबळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गणेश साळुंखे, उपाध्यक्ष प्रदीप बर्गे, उद्योजक अक्षय जेधे तसेच विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

प्रीतिसंगम

# ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांच्या यशस्वी वाटचालीतून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी

## मुख्याध्यापक संजय नलवडे



**नागठाणे/प्रतिनिधीः** जागतिक सर्वोच्च ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत भारतासाठी पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक जिंकण्याचा पराक्रम कराडच्या मराठमोळ्या खाशाबा जाधव यांनी घडविला. स्पर्धेला जाण्यासाठी त्यांना पैसे नव्हते. लोकांकडून पैसे गोळा करून निधी जमवला व स्पर्धेत सहभागी झाले आणि देशाला पदक मिळविले. त्यांचा जन्मदिवस म्हणजे १५ जानेवारी हा दिवस राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. संघर्षमय जीवनातून ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांनी केलेल्या यशस्वी वाटचालीतून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. असे उद्‌गार संजय नलवडे (माजी मुख्याध्यापक अजिंक्यतारा विद्यामंदिर शेंद्रे), यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स, कॉमर्स सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उद्घाटन व खाशाबा जाधव यांचा जन्मदिवस राज्य क्रीडा दिन म्हणून विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

संजय नलवडे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, आज सर्व सोयी सुविधा उपलब्ध झाल्या आहेत मात्र विद्यार्थ्यांच्यात वाचन व खेळाची आवड कमी झाली आहे. ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच विविध खेळांमध्ये प्रावीण्य मिळवावे आणि महाविद्यालयाचा व गावाचा नावलौकिक वाढवावा.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव यांनी ऑलम्पिकमध्ये मिळवलेला विजय हा भारत देशासाठी खूप अभिमानाची गोष्ट ठरली. त्यानंतर देशाला फार वर्षांनी ऑलिंपिकमध्ये पदक मिळाले. आज क्रीडा संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करणे काळाची गरज बनली आहे.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. मराठी भाषा जतन आणि संवर्धनासाठी या पंधरवड्यात ग्रंथदान , ग्रंथवाचन व ग्रंथ प्रदर्शन या उपक्रमाबरोबरच काव्यवाचन, निबंध, वक्तृत्व , पुस्तक परीक्षण, स्पर्धा व व्याख्यानपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. स्मिता कालभूषण यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शितल सालवडगी यांनी केले. तर आभार डॉ. लक्ष्मण दोड्मणी यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी रमेश साळुंखे पाटील( पोलीस पाटील) विजय कदम, (विनामूल्य निरंतर पाणीपुरवठा), बाळासाहेब पवार (माजी चेअरमन विकास सेवा सोसायटी, नागठाणे), व सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक बंधू-भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.





# दिशादर्शक शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे



**सातारा न्यूज;**
**देशमुखनगर** : स्वातंत्र्योत्तर काळात कालमानानुसार शिक्षणाची दृष्टी बदलल्याशिवाय तरणोपाय नाही. केवळ स्त्री पुरुष साक्षर करून चालणार नाही तर ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कारी झालेली माणसंच देशाचे भविष्य घडवणार आहेत हे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ओळखले व त्यांनी दिन, दलित, उपेक्षित, आदिवासी स्त्रियांसाठी शिक्षणाची कवाडे खुली करून दिली. बापूजी दिशादर्शक शिक्षणमहर्षी आहेत. असे उद्‌गार लालबहादूर शास्त्री कॉलेजचे माजी उपप्राचार्य प्रा.डी .जी साळुंखे यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स, कॉमर्स सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्यावतीने श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहात आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानपर कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रा डी.जी. साळुंखे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, आई आणि वडिलांचे छत्र हरवल्यानंतर डॉ. बापूजींना फार त्रास सहन करावा लागला परंतु त्यांनी खडतर परिस्थितीतही हार न मानता शिक्षण पूर्ण केले. सौंदूर संस्थानात नोकरी, १९४२ च्या आंदोलनात सक्रिय सहभाग, सातारा जिल्हा काँग्रेसचे युवा अध्यक्ष, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संस्थेत मुख्याध्यापक म्हणून सेवा आणि शेवटी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना हा त्यांचा जीवन प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यामुळे डॉ बापूजी साळुंखे हे सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्रोत आहेत.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, डॉ. बापूजींनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या रूपाने शैक्षणिक क्रांती करून इतिहास निर्माण केला. सुसंस्काराने भारतीय नागरिक घडवणे हे पूज्य बापूजींचे स्वप्न संस्था आज पूर्ण करत आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संतोष निलाखे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजाराम कांबळे यांनी केले तर आभार डॉ. जयमाला उथळे यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी श्री आनंदराव नलवडे माजी सरपंच नागठाणे, प्रा विलासराव साळुंखे, श्री विष्णु साळुंखे माजी सरपंच नागठाणे हे मान्यवर तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

सातारा न्यूज हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रांकन, मालक, संपादक, श्री. प्रकाश गणपत शिंदे, यांनी साहस प्रिंटींग, नर्मदा ६७/ब, रामनगर, पवार कॉलनी, शाहुपूरी, सातारा. (महाराष्ट्र) ४१५ ००२ येथे मुद्रित करून सातारा न्यूज, का ००२ येथून प्रसिध्द केले. संपादक श्री. प्रकाश गणपत शिंदे या अंकात प्रसिध्द होणाऱ्या मताशी, मजकुराशी सहमत असतीलच असे नाही. (सर्व वादविवाद सातारा न्यायालयीन कक्षेत होतील. संपर्क क्रमांक ९७६६६१५६६६.

प्रीतिसंगम

# दिशादर्शक शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

## प्रा.डी.जी.साळुंखे

**नागठाणे/प्रतिनिधी:-** स्वातंत्र्योत्तर काळात कालमानानुसार शिक्षणाची दृष्टी बदलल्याशिवाय तरुणोपाय नाही. केवळ स्त्री पुरुष साक्षर करून चालणार नाही तर ज्ञान , विज्ञान आणि सुसंस्कारी झालेली माणसंच देशाचे भविष्य घडवणार आहेत हे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ओळखले व त्यांनी दिन, दलित, उपेक्षित, आदिवासी स्त्रियांसाठी शिक्षणाची कवाडे खुली करून दिली. बापूजी दिशादर्शक शिक्षणमहर्षी आहेत. असे उदगार लालबहादूर शास्त्री कॉलेजचे माजी उपप्राचार्य प्रा.डी.जी साळुंखे यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स, कॉमर्स ण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्यावतीने श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहात आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानपर कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रा डी.जी. साळुंखे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, आई आणि वडिलांचे छत्र हरवल्यानंतर डॉ. बापूजीना फार त्रास सहन करावा लागला परंतु त्यांनी खडतर परिस्थितीतही हार न मानता शिक्षण पूर्ण केले. सोंड्डूर संस्थानात नोकरी, १९४२ च्या आंदोलनात सक्रिय सहभाग, सातारा जिल्हा काँग्रेसचे युवा अध्यक्ष, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संस्थेत मुख्याध्यापक म्हणून सेवा आणि शेवटी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना हा त्यांचा जीवन प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यामुळे डॉ बापूजी साळुंखे हे सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्रोत आहेत.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, डॉ. बापूजींनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या रूपाने शैक्षणिक क्रांती करून इतिहास निर्माण केला.सुसंस्काराने भारतीय नागरिक घडवणे हे पूज्य बापूजींचे स्वप्न संस्था आज पूर्ण करत आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संतोष निलाखे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.राजाराम कांबळे यांनी केले तर आभार डॉ. जयमाला उथळे यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी श्री आनंदराव नलवडे माजी सरपंच नागठाणे, प्रा विलासराव साळुंखे, श्री विष्णू साळुंखे माजी सरपंच नागठाणे हे मान्यवर तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रीतिसंगम

# पैसे मिळविण्यासाठी शेअर बाजारातील गुंतवणुकीचे ज्ञान आवश्यक

## किशोर जाधव (शेअर ब्रोकर)

**नागठाणे/प्रतिनिधी:**

आर्थिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी गुंतवणूक हा सर्वोत्तम मार्ग आहे. गुंतवणुकीचे भरपूर पर्याय उपलब्ध असताना, शेअर बाजारात गुंतवणुकीइतके फायद्याचे काहीही नाही. स्टॉकमध्ये विवेकपूर्ण गुंतवणूक करून तुम्ही प्रचंड नफा मिळवू शकता. शेअर बाजारातील गुंतवणुकीत जोखीम असते. मात्र पैसे मिळवण्यासाठी शेअर बाजारातील गुंतवणुकीचे ज्ञान आवश्यक आहे असे उदगार मा किशोर जाधव (शेअर ब्रोकर)यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाच्यावतीने, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'शेअर मार्केट गुंतवणूक धोरण' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते.

श्री किशोर जाधव आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पुढे म्हणाले, शेअर बाजार हा शेअर्सची हालचाल समजून घेण्यासाठी आणि आकर्षक परतावा मिळविण्यासाठी योग्य ज्ञान असलेल्यांसाठी पैसे कमवण्याचे एक व्यासपीठ आहे. तुम्हाला शेअर बाजाराचे कामकाज आणि त्यात गुंतवणूक कशी करायची हे जाणून घ्यावे. शेअर गुंतवणुकीद्वारे नफा



मिळविण्यासाठी संयम महत्त्वाचा आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, तुम्ही जेंव्हा शेअर्समध्ये गुंतवणूक करण्यास सुरुवात करता तेव्हा तुमच्या उद्दिष्टांबद्दल स्पष्ट दृष्टिकोन बाळगा. तुम्हाला बाजाराचे ज्ञान असेल, स्टॉक निवडताना सावधगिरी बाळगली असेल तरच संभाव्य जास्त नफा मिळविणे शक्य आहे.

या कार्यक्रमाची प्रास्ताविक व स्वागत कॉमर्स विभागप्रमुख डॉ. संदीप लोखंडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. राजाराम कांबळे यांनी केला. सूत्रसंचालन प्रा.रघुनाथ संकपाळ यांनी केले तर आभार अग्रणी महाविद्यालय योजनेचे समन्वयक प्रा संतोष निलाखे यांनी मानले. या कार्यक्रमात राहुल लोंढे व त्र्यंबक कदम यांनीही आपले मनोगत व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

आविष्कार

**सातारा/प्रतिनिधी:**

08 Jan 2025 - Page 4 | epaper.pritisangam.in
Powered by softisky | 9764331134

लोकमत

# नागठाणे येथे २४ रोजी रोजगार मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**सातारा :** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ रोजी नागठाणे येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित केला आहे. जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त सुनील पवार यांनी केले आहे. मेळाव्यात डिप्लोमा इंजिनिअर, कॉम्प्युटर ऑपरेटर, ग्राईंडर, फिटर, इलेक्ट्रिशियन, मशिनिस्ट, टर्नर, १० वी पास, नापास, आयटीआय, कुशल, अर्धकुशल कामगार अशा प्रकारची १ हजार ४७ रिक्त पदे https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अधिसूचित केलेली आहेत. इच्छुकांनी संकेतस्थळावर नोंदणी करुन शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्त पदांसाठी ऑनलाईन अर्ज करावे.

Hello Satara
Page No. 2 Jan 16, 2025
Powered by: erelego.com

# थोरले प्रतापसिंह हे काळाच्याही पुढचे प्रजाहितदक्ष राजे होते

## ज्येष्ठ पत्रकार विजय मांडके यांचे गौरवोद्गार

सत्य सह्याद्री न्यूज नेटवर्क

नागठाणे : आताच्या शतकात मराठा तरुणांना लष्करी शिक्षणाबरोबर पाठशाळा काढून त्यांच्या शिक्षणाला प्राधान्य देणारे साताऱ्याचे थोरले प्रतापसिंह महाराज हे समाज सुधारणा करणारा अग्रेसर होते म्हणूनच ते काळाच्याही पुढे असणारे प्रजाहितदक्ष राजे होते असे उद्गार ज्येष्ठ पत्रकार विजय मांडके यांनी आज नागठाणे येथे बोलताना व्यक्त केले.



जनता दरबारवेळी समस्या जाणून घेताना आमदार मनोज घोरपडे, तहसीलदार बाई माने, विक्रम कदम, महेश घार्गे

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त नागठाणे येथील महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती प्रतापसिंह महाराज व्याख्यानमालेत समाज सुधारक प्रतापसिंह महाराज व महाराष्ट्रातील समाज परिवर्तन या विषयावर विजय मांडके बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉक्टर महेश गायकवाड होते.

कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या वर साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या समाज सुधारणांचा प्रभाव पडलेला होता म्हणूनच त्यांनी आग्रहपूर्वक प्रबोधनकार ठाकरे यांच्याकडून उपेक्षित राहिलेल्या छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचा इतिहास लिहून घेण्याचे वचन घेतले आणि वचन दिल्याप्रमाणे प्रबोधनकार ठाकरे यांनी थोरल्या प्रतापसिंह महाराजांवरील ग्रंथ लिहिला.

प्रतापसिंह महाराज यांनी सातारा हे शहर अत्याधुनिक पद्धतीने वसवले तसेच साताऱ्यात नवा राजवाडा, जलमंदिर पॅलेस यासारख्या वास्तू बांधल्या. सातारा शहराला पाणीपुरवठा व्हावा म्हणून यवतेश्वरच्या डोंगरावर तलाव खोदून खापरी नळाने शहरात पाणी आणले. तसेच संस्कृत मराठी बरोबर इंग्रजी भाषेच्या ही अध्ययनाला उत्तेजन दिले. छापखाना काढून अनेक उपयुक्त ग्रंथ प्रसिद्ध केले. सती बंदीचा कायदा सातारा संस्थानामध्ये केला. असे समाज सुधारक व प्रजाहितदक्ष राजे म्हणून प्रतापसिंह महाराज ओळखले जातात असे सांगून विजय मांडके यांनी एक सद्गुणी लोकोपयोगी काम करणारा लोककल्याणकारी राजा म्हणून प्रतापसिंह महाराज यांचे नाव इतिहासात सुवर्ण अक्षरांनीच लिहिले पाहिजे असे त्यांचे काम होते.

दुसरा बाजीराव पेशवा, तसेच बाळाजीपंत नातू यांनी इंग्रज अधिकाऱ्यांच्या साथीने प्रतापसिंह महाराज यांच्या विरोधात कसा कट रचला याबाबतही ऐतिहासिक दाखले देत विजय मांडके यांनी प्रतापसिंह महाराजांचे चरित्र व चारित्र्य श्रोत्यांपुढे सादर केले.

प्रतापसिंह महाराजांनी स्वतंत्र ग्रंथालय निर्माण केले, त्यांच्या मृत्यूनंतर ते त्यांच्या पत्नीने लोकार्पण केले. दूरदृष्टीचे असे हे राजे होते असे गौरवोद्गार अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रभारी प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविक व्याख्यानमालेचे समन्वयक प्रा. संतोष निलाखे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शौकत आतार यांनी केले. आभार डॉ. राजाराम कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गणेश साळुंखे, उपाध्यक्ष प्रदीप बर्गे, उद्योजक अक्षय जेधे तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक वृंद भगिनी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने विद्यापीठ व राज्यस्तरीय स्पर्धेत विविध कलाप्रकारात यश संपादन केल्यामुळे उद्योजक अक्षय जेधे यांनी सांस्कृतिक विभागासाठी पंधरा हजार रुपयांची देणगी दिली.

प्रीतिसंगम

# क्रांतीज्योती सावित्रीबाई उत्कट क्रांतीकारी समाज सुधारक

## डॉ.प्रतिभा चिकमट



**नागठाणे/प्रतिनिधी:-**
सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य देवून स्त्रीशिक्षणाचा विस्तार केला. समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा नष्ट करून बालविवाह, विधवा पुनर्विवाह, कुमारी माता यांना संरक्षण, विधवा आणि अनाथ मुलांसाठी आश्रमाची स्थापना, केशवपनाला प्रतिबंध घालण्यासाठी नाभिकांचा संप घडवून आणला. अशा अनेक सामाजिक सुधारणा स्त्रियांना रूढी परंपरांच्या अनिष्ट जोखंडातून मुक्त केले. स्त्रियांसाठी केलेल्या कार्यामुळे सावित्रीबाई या खऱ्या अर्थानि उत्कट क्रांतीकारक समाज सुधारक होत्या. असे उदगार लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा येथील इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रतिभा चिकमठ यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कक्ष व सांस्कृतिक विभाग यांच्यावतीने ३ जानेवारी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यान कार्यक्रमात 'सावित्रीच्या लेकी काल आणि आज 'या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन महेश गायकवाड हे होते.

डॉ प्रतिभा चिकमठ आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या, सावित्रीबाई फुले यांचा जयंती दिवस बालिका दिन व स्त्रीमुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, सावित्रीबाईंनी १९ व्या शतकात कर्मट व्यवस्थेविरुद्ध लढा दिला. विविध सामाजिक सुधारणा करून स्त्रियांना 'चूल आणि मूल ' या जोखंडातून मुक्त केलं. आज एकविसाव्या शतकातील स्त्रीयांनी त्यांचा आदर्श घेऊन मार्गक्रमण करावे.या कार्यक्रमाचे औचित्य साधून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर महिला सक्षमीकरण कक्ष या विभागाच्यावतीने भित्तिपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ.राजाराम कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.जयमाला उथळे यांनी केले. तर आभार प्रा. संतोष निलाखे यांनी मांडले. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रीतिसंगम

# स्त्री मुक्ती आंदोलनाची युगकर्ती



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, थोर समाजक्रांतिकारक महात्मा जोतिराव फुले यांच्या सुविद्य पत्नी. सावित्रीबाईचा जन्म, एका गरीब शेतकरी कुटुंबात शिरवळनजीकच्या नायगाव या खेड्यात दि. ३ जानेवारी १८३१ ला झाला. शिक्षणाची परंपरा नसलेल्या घरातील सावित्रीबाईंनी लग्नानंतर शिकून, जोतिरावांच्या खांद्याला खांदा लावून समाज सुधारणांचा क्रांती रथ अखेरच्या क्षणापर्यंत अव्याहतपणे चालू ठेवला.

एकोणिसाव्या शतकात शुद्रांची आणि स्त्रीयांची सामाजिक स्थिती पशूपेक्षाही हीन होती. देवधर्माच्या नावाखाली बहुसंख्य समाज गुलामगिरीत अडकला होता. ज्या काळात स्त्रीने शिकणे हे महापाप मानले जाई, त्या काळी निरक्षर सावित्रीबाईंनी विवाहानंतर शिक्षण घेतले. प्रारंभी पतीच्या आग्रहास्तव आणि काळाच्या ओघात स्वयंप्रेरणेने, स्वाध्यायाद्वारे. स्वतःच्या अखंड कार्यकर्तृत्वाने त्या आद्यशिक्षिका, मुख्याध्यापिका, समाजसेविका, दीनदलितांच्या उध्दारक; इतकेच नव्हे, तर आधुनिक मराठी कवितेच्या गंगोत्री बनल्या; आणि जोतिबांच्या मृत्यूनंतर तर सत्यशोधक समाजाचे नेतृत्वही त्यांनी सांभाळले.

स्त्री-शूद्रांचे व दीनदलितांचे दुःख पाहून सावित्री रडत बसल्या नाहीत. रडण्यापेक्षा स्त्री-शूद्रांचा दुःखमुक्तीचा संग्राम जोतीरावांसारख्या क्रांतिवीराबरोबर मोठ्या जिद्दीने, धैर्याने, चिकाटीने, कौशल्याने त्यांनी यशस्वी केला. महात्मा जोतिबांनी दि. १४ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील भिडे वाड्यात मुलींची शाळा सुरू केली. मुलींसाठी काढण्यात आलेली ही शाळा सबंध हिंदुस्थानातील पहिलीच शाळा होय. सावित्रीबाईंनी मुलींच्या शाळेत स्त्री-शिक्षिका म्हणून काम करण्यास सुरुवात केली. स्त्री व शुद्र-अतिशुद्रांसह अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी त्यांनी आपली सर्व शक्ती वेचली. स्त्री-पुरुष समानतेचा पहिला जाहीरनामा सावित्रीबाईंचा आहे. सन १८५२ मध्ये विश्रामबागवाड्यांत जोतीरावांच्या स्त्री-शिक्षण-कार्याबद्दल ब्रिटिश सरकारकडून शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.



**डॉ.राजाराम कांबळे**
**आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे**

सावित्रीबाईंनी मुलींसाठी व अस्पृश्यांसाठी शाळा काढणे, आपल्या घरातच बालहत्या-प्रतिबंधक गृह चालविणे, गोरगरीब कामगारांसाठी रात्रशाळा काढणे, दुष्काळात अन्नान्नदशा झालेल्या गरिबांसाठी अन्नछत्रे सुरू करणे, केशवपन - विधवाविवाहबंदी देवदासी पध्दती इ. दुष्ट प्रथांचे उच्चाटन करणे म्हणजे एकोणिसाव्या शतकातले या देशातील चमत्कारच होत! त्या काळात मुला-मुलीचे बालविवाह होत. अनेक मुली बालविधवा होत. तरुण वयातील विधवांना पुरुष फसवीत. सावित्रीबाईंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. विधवांना आसरा दिला. तरूण विधवांना हे गृह म्हणजे फार मोठा आधार होता. स्वतःच्याच घरात स्थापन केलेल्या अनाथ बालकाश्रमात सावित्रीबाईंनी '३५ ब्राह्मण विधवांची बाळंतपणे केली. काशीबाई या ब्राह्मण विधवेच्या, अनैतिक संबंधातून झालेल्या यशवंत नावाच्या मुलाला फुले दांपत्याने दत्तक घेऊन त्याला आपल्या मुलाचा दर्जा दिला.

स्त्रीवर्गाची विटंबना, अवहेलना आणि अघोरी छळ थांबावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले. जिवंत व मृत भगिनींचे केस कापू नयेत अशी न्हाव्यांना विनंती करण्याचे ठरले. त्यासाठी पुणे, मुंबई परिसरातील न्हाव्यांची एक परिषद बोलविली. न्हावी कोणते अघोरी काम करतात यावर चर्चा झाली. ताबडतोब न्हाव्यांनी संपाचा निर्णय घेतला. या देशातील न्हाव्यांचा, हा पहिला संप होय.

१८७६-७७ साली महाराष्ट्रात जो भीषण दुष्काळ पडला त्यावेळी जोतीरावांनी सरकारचे त्याकडे लक्ष वेधले. स्वतःच्या घरचे खंडोगणती धान्य गोरगरीबांना वाटून दिले. दुष्काळपीडित गरीब मुलांसाठी 'व्हिक्टोरिया बालाश्रम'ची स्थापना केली होती. त्याठिकाणी सावित्रीबाई आपल्या मैत्रिणींसह स्वतः स्वयंपाक करीत. त्याकाळी शुद्र-अतिशुद्र जातीच्या लोकांना उच्च जातीचे लोक आपल्या विहिरीवर व पाणवठ्यावर पाणी भरू देत नसत. जोतीबा व सावित्रीबाई यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद त्या लोकांना खुला केला. सावित्रीबाई समाजाच्या खंद्या कार्यकर्त्या होत्या. समाजाने पुरोहित नाकारून साध्या पद्धतीचे, हुंड्याशिवायचे, कमी खर्चातले विवाह लावायचा कार्यक्रम हाती घेतला. पहिला विवाह दि. २५ डिसेंबर १८७३ रोजी लावण्यात आला नंतर ही चळवळ देशव्यापी झाली. सावित्रीबाईंची मैत्रिण बजूबाई ग्यानोबा निंबणकर यांची कन्या राधा आणि फुल्यांचे कार्यकर्ते सीताराम जबानी आल्हाट यांचा हा विवाह होता. या ऐतिहासिक विवाहाचा खर्च सावित्रीबाईनी स्वतः केला. या विवाहांना भटजीनी देशभर विरोध केला. दि. ४ फेब्रुवारी १८८९ रोजी वयाच्या १६ व्या वर्षे त्यांनी आपल्या दत्तक पुत्राचा विवाहही याच पद्धतीने केला. हा भारतातला आधुनिक काळातला पहिला आंतरजातीय विवाह होय. त्याकाळी सरकारवर सतीची चाल बंद करण्याविषयीची कायदा करावा म्हणून सावित्रीबाई व जोतिबा यांनी दबाव आणला.

सन १८९६ साली पुन्हा दुष्काळ पडला. सावित्रीबाईंच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक समाजाचे मंडळ गव्हर्नरांकडे गेले. सरकारने मग दुष्काळी कामे काढली. शेतकऱ्यांना साऱ्यात सूट मिळावी म्हणून सावित्रीबाईंनी खूप खटपट केली. सावित्रीबाईंच्या कार्याचे महत्त्व ओळखून पंडिता रमाबाईनी त्यांना आर्थिक मदत दिली. बडोद्याच्या सयाजीरावांनी धान्य-कपडे-पैसा पाठविला.

जोतिबांची जीवनयात्रा संपली. अंतिम संस्काराच्या मुद्यावरूनच फुलेंच्या कुळातील लोकांनी वादळ निर्माण केले. 'जोतिबांचा अंत्यसंस्कार करण्याचा अधिकार आम्हालाच आहे. आम्ही त्यांच्या कुळातील आहोत. यशवंत, फुले कुळात जन्मला नाही म्हणून त्याला तो अधिकार नाही, अशी फुलेंच्या कुळातील लोकांनी भूमिका घेतली. त्यावेळी सावित्रीने कणखर भूमिका घेतली.

१८९७ साली महाराष्ट्रात प्लेग रोगाची मोठी साथ आली होती. या साथीत अनेकजण दगावले. सावित्रीबाईंनी आपले दत्तक चिरंजीव यशंवत यांची मदत घेतली. दीन-दलितांना दवाखान्यात नेले व त्यांची सेवा सावित्रीबाईंनी केली. एक दलित मुलगा या रोगाने पछाडलेला होता. ते पाहून माऊलीने त्यास खांद्यावर घेतले. दवाखान्यांकडे त्या निघाल्या. पण खुद्द त्यांनाच त्याची लागण झाली. आपला संसार न करता पीडित व दीनदलितांसाठी सावित्रीबाई राबल्या; अगदी आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत.


Powered by softisky | 9764331134

प्रीतिसंगम

# नागठाणे महाविद्यालयात भव्य कबड्डी स्पर्धा संपन्न

**नागठाणे/प्रतिनिधी:**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज , नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त नागठाणे परिसरातील सर्व ज्युनिअर कॉलेज मुले व मुली यांच्या भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन नवीन वर्षाच्या प्रारंभी करण्यात आले. कबड्डी स्पर्धेत नागठाणे परिसरातील सर्व ज्यु. कॉलेजच्या मुले व मुलींचे संघ सहभागी झाले.



या भव्य कबड्डी स्पर्धेचे उदघाटन यशवंत हरी साळुंखे (नाना) चेअरमन, अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना शाहूनगर शेंद्रे जिल्हा सातारा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते. यशवंत साळुंखे यांनी कबड्डी स्पर्धांच्या आयोजनाबाबत महाविद्यालयाचे कौतुक केले आणि या उपक्रमामुळे वेगळ्या प्रकारे नवीन वर्षाचे स्वागत केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत जिमखाना विभागप्रमुख डॉ.लक्ष्मण दोडमणी यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. राजाराम कांबळे यांनी केले. तर आभार डॉ. अजितकुमार जाधव यांनी मानले. त्यावेळी कॅप्टन दिलीप मोहिते, नलवडे साहेब सुभेदार, आबाजी साळुंखे, बिपिन साळुंखे, संदीप साळुंखे, प्राचार्य अशोक देसाई, नलावडे सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कबड्डी स्पर्धेमध्ये श्री रामकृष्ण विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज नागठाणे या कॉलेजच्या मुले व मुलींच्या दोन्ही संघाने स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. तसेच छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अपशिंगे ज्युनिअर कॉलेजच्या मुले व मुलींच्या दोन्ही संघाने द्वितीय क्रमांक मिळवला व श्री छत्रपती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तारळे या कॉलेजच्या मुले व मुलींच्या दोन्ही संघाने तृतीय (उत्तेजनार्थ) क्रमांक मिळविला.

भव्य कबड्डी स्पर्धामध्ये प्रथम क्रमांक मिळालेल्या मुले व मुली या दोन्ही संघाना प्रत्येकी ३००० रोख रुपये, चषक व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक मिळालेल्या मुले व मुली या दोन्ही संघांना प्रत्येकी २००० रुपये रोख चषक व प्रमाणपत्र तसेच तृतीय क्रमांक मिळालेल्या मुले व मुली या दोन्ही संघांना प्रत्येकी १००० रुपये रोख चषक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. पंच म्हणून बळीराम साळुंखे व विश्वास साळुंखे या राष्ट्रीय पंचांनी काम पाहिले.

सहभागी संघांना चषक, रोख रक्कम व पारितोषिक देण्यासाठी सुरेश ताटे, प्रदीप साळुंखे, शशिकांत पाटील डॉ. विकास जाधव डॉ. शहाजी जाधव यांनी मोलाचे आर्थिक सहकार्य केले. संघ नोंदणी प्रा शैला चोबे व प्रा रघुनाथ सपकाळ, गुणलेखक म्हणून डॉ गणेश गभाले, वेळाधिकारी म्हणून डॉ संदीप लोखंडे समालोचन म्हणून प्रा संतोष निलाखे यांनी काम पाहिले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व संघ व्यवस्थापक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आज का अंदाज

प्रीतिसंगम

# नागठाणे महाविद्यालयाचे शिवाजी विद्यापीठ सातारा विभागीय क्रिडा स्पर्धेत यश

**नागठाणे/प्रतिनिधी:**

श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज, पाचगणी यांच्यावतीने छत्रपती शाहू महाराज स्टेडियम, सातारा येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, सातारा विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे महाविद्यालयातील कु.संयुक्ता साळुंखे हिने ४०० मी धावणे स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला तर कु. अनुष्का साळुंखे हिने बांबू उडी या स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळविला.



त्यांची कोल्हापूर येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आंतर विभागीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड व जिमखाना विभागातील सदस्य डॉ. राजाराम कांबळे, प्रा संतोष निलाखे, प्रा. अभिलाषा देशमुख क्रिडा संचालक डॉ. लक्ष्मण दोडमणी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# संविधान भारतीय लोकशाहीचा आत्मा

## प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड

**नागठाणे/प्रतिनिधी:**

भारतीय संविधानाचा स्वीकार ज्या दिवशी केला गेला तो दिवस म्हणजे २६ नोव्हेंबर. दरवर्षी हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. संविधानाची निर्मितीमुळे स्वतंत्र भारताचा पाया रचला गेला. संविधान कोट्यवधी भारतीयांच्या आशा, स्वप्ने आणि आकांक्षा यांना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांनुसार मूर्त रूप देते. भाषा, वंश, धर्म, संस्कृती या अतुलनीय विविधतेच्या भूमीत भारतीय संविधान एकात्म शक्ती आहे. संविधान हा केवळ एक दस्तऐवज नसून भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे असे उदगार प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी काढले.




श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या संविधान दिन कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड पुढे म्हणाले, भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे .संविधान हे भारताचे वसाहती राजवटीतून सार्वभौम लोकशाहीकडे संक्रमण झाल्याचे दर्शवते आणि त्यांचे भविष्य घडवण्यासाठी लोकांच्या सामर्थ्याची निश्चिती करते. संविधानाने भारताला सार्वभौम, समाजवादी , धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक गणराज्य या लोकशाही मूल्याने घोषित केले आहे.

आजच्या काळात संविधानाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. जातीयता व धार्मिकतेचे वाढते विभाजन आणि सामाजिक विषमता यावर मात करण्यासाठी संविधान महत्त्वाचे ठरते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ नागनाथ चोबे यांनी केले. उद्देशिकेचे वाचन प्रा. भालचंद्र बिचितकर यांनी केले तर आभार डॉ. सुनील पवार यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# देशात भारतीयत्व रुजवण्या

प्रीतिसंगम

# नागठाणे महाविद्यालय एन.एस.एस एककास व कार्यक्रम अधिकारी यांना उत्कृष्ट जिल्हास्तरीय पारितोषिक प्राप्त

**नागठाणे/प्रतिनिधी:**

शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना २०२२-२३ साठीचे नागठाणे महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना एककास व कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप लोखंडे यांना सातारा जिल्हास्तरीय उत्कृष्ट पारितोषिक प्राप्त झाले.

नागठाणे महाविद्यालयाने एनएसएसच्या 'मी माझ्यासाठी नाही तर इतरांच्यासाठी आहे' या ब्रीदवाक्याचे पाईक होऊन विविध सामाजिक उपक्रम राबवून व युवकांच्यात शिबिराच्या माध्यमातून श्रमसंस्कार रुजवत संस्कारशील नागरिक बनवण्याचा प्रयत्न करून शिवाजी विद्यापीठात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे.






महाविद्यालयाने कोविड काळामध्ये रांगोळी, मास्क वाटप व जनजागृती करिता विविध उपक्रम राबविले . एन एस एस च्या माध्यमातून सन २०१४ पासून नागठाणे स्मशानभूमीची स्वच्छता आणि ऑनलाइन आर्थिक फसवणुकीबाबत केलेली जनजागृती या उपक्रमांची दखल विद्यापीठाकडून घेण्यात आली. म्हणूनच सन २०२२ २३ चा महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना एककास उत्कृष्ट महाविद्यालय जिल्हास्तरीय पारितोषिक देऊन सन्मानित केले.

कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप लोखंडे यांना ही शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सातारा उत्कृष्ट कार्यक्रमअधिकारी जिल्हास्तरीय पारितोषिक प्राप्त झाले. डॉ. लोखंडे सलग ११ वर्ष राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी ३ वर्षे सातारा ग्रामीण विभागीय समन्वयक व ३ वर्ष सातारा शहर आणि ग्रामीण विभागीय समन्वय तसेच कोविड-१९ काळात सातारा जिल्हा नोडल ऑफिसर म्हणूनही काम केले आहे.

शिवाजी विद्यापीठाने उत्कृष्ट महाविद्यालय व उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी म्हणून पारितोषिक दिल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड व राष्ट्रीय सेवा योजना समिती सदस्य, स्वयंसेवक आणि सर्व विद्यार्थ्यांचे तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप लोखंडे यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ शुभांगी गावडे, सहसचिव (प्रशासन) डॉ मिलिंद हुजरे, सहसचिव (अर्थ )प्राचार्य एस एम गवळी, सातारा जिल्हा विभागीय प्रमुख प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी अभिनंदन केले.



नागठाणे महाविद्यालयाच्या यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत शिक्षकवर्ग.

# नागठाणे कॉलेजचे कला प्रकारात यश

**नागठाणे : पुढारी वृत्तसेवा :** कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगद्वारा शाहू कला मंदिर सातारा येथे झालेल्या कर्मवीर फेस्टो टू २०२४ मध्ये आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाने समूहगीत आणि मूकनाट्य या दोनही कला प्रकार स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांत असलेले अभिनय कौशल्य या स्पर्धेच्या माध्यमातून दाखवून दिले. समूहगीत स्पर्धेसाठी संगीत दिग्दर्शक दीपक सपकाळ यांचे मार्गदर्शन तसेच सांस्कृतिक विभागातील सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. संतोष निलाखे, प्रा. जयमाला उथळे यांनी संघ संयोजक म्हणून काम केले. यशस्वी स्पर्धक कलाकार व मार्गदर्शकांचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड व टीमने केले.

प्रीतिसंगम

# नागठाणे कॉलेजच्या पॉझिटिव्ह एकांकिकेस रायसोनी राज्यस्तरीय एकांकिका करंडक स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**नागठाणे /प्रतिनिधी:**

कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या जी एच रायसोनी राज्यस्तरीय एकांकिका करंडक स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित, आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्यावतीने सादर केलेल्या पॉझिटिव्ह एकांकिकेस द्वितीय क्रमांक प्राप्त झाला असून नागपूर येथे होणाऱ्या महाअंतिम फेरीसाठी महाविद्यालयाच्या संघाची निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल सहभागी कलाकारांच्यावर अभिनंदन वर्षाव होत आहे.




या यशाबद्दल सर्व कलाकारांचे संस्थेचे कार्याध्यक्ष माननीय प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, सहसचिव (प्रशासन) सिताराम गवळी, सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, सातारा जिल्हा विभागप्रमुख प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे व महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ.महेश गायकवाड व सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले.

या स्पर्धेसाठी संघ संयोजक म्हणून डॉ.जयमाला उथळे डॉ. लक्ष्मण दोडमणी यांनी काम केले. दिग्दर्शक म्हणून नितीन पवार यांनी काम केले. या स्पर्धेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे.
www.dainikprabhat.com

Satara Edition 29 Oct 2024_006
29 Oct 2024

# एनसीसीमुळे युवकांवर देशसेवेचा संस्कार

## कॅप्टन दिलीप मोहिते; नागठाणे महाविद्यालयात नवीन एनसीसी कॅडेटचे स्वागत

**नागठाणे, दि. २८ (प्रतिनिधी)** - भारतामध्ये एनसीसीची सुरुवात १९४८ मध्ये पहिल्यांदा झाली. एकता और अनुशासन हे एनसीसीचे ब्रीदवाक्य आहे. एनसीसीअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लष्करी प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळेच त्यांच्यात देशाभिमान वाढीस लागतो. खऱ्या अर्थाने एनसीसी युवकांच्यात देशसेवेचे संस्कार व देशभक्तीची भावना रुजवण्याचा प्रयत्न करते, असे उदगार आजी-माजी सैनिक संघटना नागठाणेचे अध्यक्ष कॅप्टन दिलीप मोहिते यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात आयोजित केलेल्या एनसीसीमध्ये प्रथम वर्ष पूर्ण झालेल्या कॅडेटचा सत्कार व नव्याने प्रथम वर्षात प्रवेशित एनसीसी कॅडेटच्या स्वागत समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



**नागठाणे : महाविद्यालयातील एनसीसी कॅडेटच्या स्वागतप्रसंगी मार्गदर्शन करताना कॅप्टन दिलीप भोसले, समवेत मान्यवर.**

प्राचार्य कॅप्टन डॉ.महेश गायकवाड म्हणाले, एनसीसी युवकांच्यामध्ये शिस्त व जबाबदारीची जाणीव निर्माण करते त्यामुळे भावी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी त्यांना हे गुण उपयुक्त ठरतात.

सुभेदार प्रकाश साळुंखे यांनी सैन्यदल सेवेतील अनुभव सांगून विद्यार्थ्यांमध्ये धैर्य आणि महत्वकांक्षा निर्माण केली. सुभेदार संतोष पवार यांनी कॅडेटला करियर होण्यासाठी कष्ट घेणे किती महत्त्वाचा आहे याबाबत मार्गदर्शन केले. एनसीसी कॅडेट मोरे विक्रांत याने मनोगत व्यक्त केले.

एन सी सी सी टी ओ डॉ. गणेश गभाले यांनी प्रास्ताविक केले. बागल यांनी आभार मानले. शैला चोबे यांनी सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमास आजी-माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी, सदस्य, प्राध्यापक, एनसीसी कॅडेट उपस्थित होते.

---

# युवकांच्यात एनसीसीमुळे देशभक्ती, देशसेवा रुजते : मोहिते

वार्ताहर
देशमुखनगर

भारतामध्ये एनसीसीची सुरुवात १९४८ मध्ये पहिल्यांदा झाली. एकता और अनुशासन हे एनसीसीचे ब्रीदवाक्य आहे. स्थापनेपासूनच एनसीसीअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्यात लष्करी प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळेच त्यांच्यात देशाभिमान वाढीस लागतो. खऱ्या अर्थाने एनसीसी युवकांच्यात देशसेवेचे संस्कार व देशभक्तीची भावना रुजवण्याचा प्रयत्न करते, असे उद्‌गार आजी–माजी सैनिक संघटना नागठाणेचे अध्यक्ष कॅप्टन दिलीप मोहिते यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात आयोजित केलेल्या एनसीसीमध्ये प्रथम वर्ष पूर्ण झालेल्या कॅडेटचा सत्कार व नव्याने प्रथम वर्षात प्रवेशित एनसीसी कॅडेटच्या स्वागत समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले, आज देशसेवेचे व्रत घेतलेले अनेक तरुण एनसीसीच्या माध्यमातून थलसेना, नौसेना अथवा वायुसेनेत जाण्याचा निर्धार करून भावी सैनिक होण्यासाठी प्रयत्न करतात. म्हणून एनसीसी ही देश सेवेसाठी उत्तम काम करणारी ही संस्था आहे.



**नागठाणे : उपस्थितांना मार्गदर्शन करताना कॅप्टन दिलीप मोहिते.**

या कार्यक्रम सुभेदार प्रकाश साळुंखे यांनी सैन्यदल सेवेतील अनुभव सांगून विद्यार्थ्यांमध्ये धैर्य आणि महत्वकांक्षा निर्माण केली.

### भविष्यकाळात उपयुक्त

कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड म्हणाले, एनसीसी युवकांच्यामध्ये शिस्त व जबाबदारीची जाणीव निर्माण करते त्यामुळे भावी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी त्यांना हे गुण उपयुक्त ठरतात.

सुभेदार संतोष पवार यांनी कॅडेटला करियर होण्यासाठी कष्ट घेणे किती महत्त्वाचा आहे, याबाबत मार्गदर्शन केले. देशासाठी रक्त सांडण्याची तयारी ठेवली पाहिजे असे सुतोवाच केले.

प्रीतिसंगम

# युवकांच्यात एनसीसीमुळे देशभक्ती आणि देश सेवा रुजते

## कॅप्टन दिलीप मोहिते



**नागठाणे/प्रतिनिधी:**

भारतामध्ये एनसीसीची सुरुवात १९४८ मध्ये पहिल्यांदा झाली. एकता और अनुशासन हे एनसीसीचे ब्रीदवाक्य आहे. स्थापनेपासूनच एनसीसीअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्यात लष्करी प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळेच त्यांच्यात देशाभिमान वाढीस लागतो. खऱ्या अर्थाने एनसीसी युवकांच्यात देशसेवेचे संस्कार व देशभक्तीची भावना रुजवण्याचा प्रयत्न करते. असे उदगार आजी-माजी सैनिक संघटना नागठाणेचे अध्यक्ष कॅप्टन दिलीप मोहिते यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात आयोजित केलेल्या एनसीसीमध्ये प्रथम वर्ष पूर्ण झालेल्या कॅडेटचा सत्कार व नव्याने प्रथम वर्षात प्रवेशित एनसीसी कॅडेटच्या स्वागत समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले, आज देशसेवेचे व्रत घेतलेले अनेक तरुण एनसीसीच्या माध्यमातून थलसेना, नौसेना अथवा वायुसेनेत जाण्याचा निर्धार करून भावी सैनिक होण्यासाठी प्रयत्न करतात.म्हणून एनसीसी ही देश सेवेसाठी उत्तम काम करणारी ही संस्था आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ.महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, एनसीसी युवकांच्यामध्ये शिस्त व जबाबदारीची जाणीव निर्माण करते त्यामुळे भावी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी त्यांना हे गुण उपयुक्त ठरतात. या कार्यक्रम सुभेदार प्रकाश साळुंखे यांनी सैन्यदल सेवेतील अनुभव सांगून विद्यार्थ्यांमध्ये धैर्य आणि महत्वकांक्षा निर्माण केली.

सुभेदार संतोष पवार यांनी कॅडेटला करियर होण्यासाठी कष्ट घेणे किती महत्त्वाचा आहे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच देशासाठी रक्त सांडण्याची तयारी ठेवली पाहिजे असे सुतोवाच केले. तसेच उपस्थित आजी माजी फौजी भाईंनीही आपले सैनिक म्हणून काम करताना आलेले अनुभव कथन केले. एनसीसी कॅडेट मोरे विक्रांत यानेही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन सी सी सी टी ओ डॉ. गणेश गभाले यांनी केले. आभार बागल सरांनी मानले तर सूत्रसंचालन शैला चोबे मॅडम यांनी केले या कार्यक्रमासाठी सर्व आजी-माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी सदस्य महाविद्यालयातील प्राध्यापक एनसीसी कॅडेट व महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रीतिसंगम

# नागठाणे कॉलेजचा वाचन कट्टा उपक्रमातून वाचन संस्कृती रुजवण्याचा प्रयत्न

**नागठाणे/प्रतिनिधी:**

आर्टस्, कॉमर्स एड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षात ग्रंथालयात वाचनकट्टा उपक्रमाचे तिसरे पुष्प गुंफले. पुस्तकापासून दूर जाणाऱ्या तसेच वाचन संस्कृती लोप पावते कि काय अशा भवतालात 'वाचाल तर वाचाल' ही उक्ती जागवण्यासाठी वाचनकट्टा उपक्रम महाविद्यालयात सूरू केला. 'वाचन केल्याने मिळते ज्ञान अन दूर पळते अज्ञान' हे ब्रीद विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यासाठी वाचनकट्टा प्रयत्नशील आहे. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी आयोजित केल्या जाणाऱ्या या उपक्रमास विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. मुल वाचत आहेत वाचलेल्या पुस्तकांवार मनसोक्त बोलत आहेत, चर्चा करत आहेत.

वाचनकट्टा या उपक्रमा अंतर्गत अक्षता जाधव (बी.कॉम. भाग-३) या विद्यार्थिनीने अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकीरा' या सुप्रसिध्द कादंबरीविषयी आपले विचार, या कादंबरीच्या आवडीविषयी तसेच वाचनातील अनुभव अभिव्यक्त केले. अंजली जाधव (बी.ए. भाग - १) या विद्यार्थिनीने आ.ह. साळुंखे यांच्या 'चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये, म्हणून!'



या पुस्तकातील आशय व्यक्त केला. यामधील 'पत्नी गुलाम म्हणून हवी, की मैत्रीण म्हणून?' या ललित लेखाविषयी विस्तृत चर्चा केली. प्रणील माने (बी.कॉम. भाग- २) या विद्यार्थ्याने शिव खेरा यांच्या 'आपण जिंकू शकतो' या पुस्तका विषयी आपले विचार व्यक्त केले. हे पुस्तक म्हणजे प्रयत्न करणाऱ्या प्रत्येकाला प्रेरणा व उर्जा देणारे आहे. हे पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याने वाचावे असे मत व्यक्त केले.

प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड सर यांनी ग्रामिण प्रवाहातील आनंद विंगकर यांची 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरी विषयी आणि डॉ. आर. एम. कांबळे यांनी प्रशांत दीक्षित लिखित अर्थिक मन्वंतराचे शिल्पकार नरसिंह राव यांच्यावर आधारीत 'रावपर्व' व प्रा. आर. डी. सकपाळ यांनी 'आर्यचाणक्य' पुस्तकाविषयीचे विचार, मत, वाचनातील अनुभव व वाचनातून मिळालेले समाधान यावर विस्तृत चर्चा केली.

वाचनकट्टा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड सर होते. अर्थशास्त्र विभागाने आजच्या वाचनकट्ट्याचे आयोजन (host) केले होते. यामध्ये अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर एम कांबळे, डॉ. जयमाला उथळे, प्रा.रणधीर शिलेवंत, प्रा.आर.डी. सकपाळ होते. तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक, डॉ. सुरेश पाटील, प्रा.किशोरी कोळपे, व डॉ. संतोष सोंडगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. स्मिता कालभूषण यांनी केले तर सुत्रसंचालन व कार्यक्रमाचे आभार प्रा. शैला चोबे यांनी मानले. कार्यक्रमाचे छायाचित्रण प्रा. मनिषा सुतार यांनी केले. या कार्यक्रमाचे नियोजन वाचनकट्टा विभागाने प्रा केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

प्रीतिसंगम

# नागठाणे कॉलेजने रौप्य महोत्सवी वर्षात कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमातून विद्यार्थी घडवावेत

## कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के

**नागठाणे/प्रतिनिधी:**
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्यात कष्ट करण्याची जिद्द आणि चिकाटी असते. आज नवीन शैक्षणिक धोरणामुळे करिअर करण्यासाठी अनेक संधी प्राप्त झाल्या आहेत. मात्र विद्यार्थ्यांनी स्वतःच्या क्षमता ओळखून आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाचे महत्त्व समजून घेऊन संधीची निवड करून आपले करिअर करावे. आज आपले महाविद्यालय गुणवत्तेच्या शिखरावर आहे आणि ही गुणवत्ता वाढवणे ही सर्वांची जबाबदारी आहे, यासाठी महाविद्यालयाने रौप्य महोत्सवी वर्षात कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमातून विद्यार्थी घडवावेत असे उद्गार शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू प्रा.डॉ.डी.टी शिर्के यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कुलगुरू प्रा (डॉ.) डी टी शिर्के आपल्या भाषणात पुढे म्हणाले, कोणत्याही संस्थेचं जेव्हा वय वाढतं तेव्हा ती संस्था आपल्या कार्याने अधिक नावारूपाला येत असते. हे महाविद्यालय गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी केंद्रित शिक्षणातून समाजाच्या आदरास प्राप्त ठरले आहे. त्यामुळेच महाविद्यालयाचे आणि समाजाचे नाते अधिक दृढ बनले आहे. इथले ग्रामस्थ निर्व्याज्य मनानं प्रेम करणारे आहेत हे त्यांच्या कार्यक्रमातील उपस्थितीवरून दिसून येते. शिकलेला विद्यार्थी स्वावलंबी व्हावा ही समाजाची अपेक्षा असते. यासाठी महाविद्यालयाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी व कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य सौ शुभांगी गावडे आपल्या भाषणात म्हणाल्या, डॉ.बापूजींनी १९६२ मध्ये रामकृष्ण विद्यामंदिराची स्थापना करून ज्ञानज्योत नागठाणे गावात आणली. नंतर हे महाविद्यालय स्थापन झाले आणि विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली. आज या महाविद्यालयाने आपल्या कार्य कर्तृत्वाने विद्यापीठात ठसा उमटवला ही अभिमानाची बाब आहे.


नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या उद्घाटन समारंभात बोलताना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू प्रा. डॉ.डी.टी शिर्के समवेत प्राचार्य सौ शुभांगी गावडे व प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड इतर मान्यवर

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, स्वागत व पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी केले. कार्यक्रमात अजित साळुंखे, सातारा जिल्ह्याचे विभागप्रमुख प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ, कृषिभूषण मनोहर साळुंखे, मधुकर पाटील यांनी आपले मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजाराम कांबळे व प्रा शीतल सालवाडगी यांनी केले. तर आभार डॉ.अजितकुमार जाधव यांनी मानले. त्यावेळी नागठाणे आणि परिसरातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, हितचिंतक, पालक महाविद्यालयातील माजी विद्यार्थी, प्राचार्य व प्राध्यापक विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयात बांधण्यात येणाऱ्या बहुउद्देशीय सभागृहासाठी कृषीभूषण मनोहर साळुंखे यांनी पन्नास हजार रु., अजित साळुंखे यांनी पंचवीस हजार रु, जिमखाना गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी माजी विद्यार्थी, राष्ट्रीय खेळाडू व सध्या पोलीस दलात कार्यरत असलेले विद्यार्थी यांनी पंचवीस हजार रु. व प्रा.अण्णासाहेब पाटील यांनी दहा हजार रु देणगी देऊन महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# पुण्यभूमी महाराष्ट्र न्यूज

मुख्य संपादक: मंगेश पवार. उपसंपादक : दिलीप वाघमारे

Wednesday 23rd October 2024 Pynyabhoomimaharashtra@gmail.com website: www.mywebsite.com

## नागठाणे कॉलेजने रौप्य महोत्सवी वर्षात कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमातून विद्यार्थी घडवावेत! कुलगुरू प्रा (डी.) टी शिर्के

बातम्यांसाठी आणि जाहिरातीसाठी संपर्क करा. 9834245095



कुलगुरू डी टी शिर्के

सातारा नागठाणे

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्यात कष्ट करण्याची जिद्द आणि चिकाटी असते. आज नवीन शैक्षणिक धोरणामुळे करिअर करण्यासाठी अनेक संधी प्राप्त झाल्या आहेत. मात्र विद्यार्थ्यांनी स्वतःच्या क्षमता ओळखून आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाचे महत्त्व समजून घेऊन संधीची निवड करून आपले करिअर करावे. आज आपले महाविद्यालय गुणवत्तेच्या शिखरावर आहे आणि ही गुणवत्ता वाढवणे ही सर्वांची जबाबदारी आहे, यासाठी महाविद्यालयाने रौप्य महोत्सवी वर्षात कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमातून विद्यार्थी घडवावेत असे उदगार शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू प्रा. डॉ.डी.टी शिर्के यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कुलगुरू प्रा (डॉ.) डी टी शिर्के आपल्या भाषणात पुढे म्हणाले,कोणत्याही संस्थेचं जेव्हा वय वाढतं तेव्हा ती संस्था आपल्या कार्याने अधिक नावारूपाला येत असते. हे महाविद्यालय गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी केंद्रित शिक्षणातून समाजाच्या आदरास प्राप्त ठरले आहे. त्यामुळेच महाविद्यालयाचे आणि समाजाचे नाते अधिक दृढ बनले आहे. इथले ग्रामस्थ निर्व्याज्य मनानं प्रेम करणारे आहेत हे त्यांच्या कार्यक्रमातील उपस्थितीवरून दिसून येते. शिकलेला विद्यार्थी स्वावलंबी व्हावा ही समाजाची अपेक्षा असते. यासाठी महाविद्यालयाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी व कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य सौ शुभांगी गावडे आपल्या भाषणात म्हणाल्या, डॉ.बापूजींनी १९६२ मध्ये रामकृष्ण विद्यामंदिराची स्थापना करून ज्ञानज्योत नागठाणे गावात आणली. नंतर हे महाविद्यालय स्थापन झाले आणि विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली. आज या महाविद्यालयाने आपल्या कार्य कर्तृत्वाने विद्यापीठात ठसा उमटवला ही अभिमानाची बाब आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, स्वागत व पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी केले. कार्यक्रमात श्री अजित साळुंखे, सातारा जिल्ह्याचे विभागप्रमुख प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, कृषिभूषण मनोहर साळुंखे, मा श्री मधुकर पाटील यांनी आपले मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजाराम कांबळे व प्रा शीतल सालवाडगी यांनी केले. तर आभार डॉ. अजितकुमार जाधव यांनी मानले. त्यावेळी नागठाणे आणि परिसरातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, हितचिंतक, पालक महाविद्यालयातील माजी विद्यार्थी, प्राचार्य व प्राध्यापक विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयात बांधण्यात येणाऱ्या बहुउद्देशीय सभागृहासाठी कृषीभूषण मनोहर साळुंखे यांनी पन्नास हजार रु., श्री अजित साळुंखे यांनी पंचवीस हजार रु , जिमखाना गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी माजी विद्यार्थी , राष्ट्रीय खेळाडू व सध्या पोलीस दलात कार्यरत असलेले विद्यार्थी यांनी पंचवीस हजार रु. व प्रा.अण्णासाहेब पाटील यांनी दहा हजार रु देणगी देऊन महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

तरुण भारत

# नागठाणे कॉलेजच्या रौप्यमहोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

## प्रा. डॉ. महेश गायकवाड यांची माहिती, कुलगुरूंच्या हस्ते होणार बुधवारी शुभारंभ

वार्ताहर
देशमुखनगर

डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्ञानवर्धन, ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानदान याच आपल्या जीवित ध्येयाशी प्राणप्रतिष्ठेने एकनिष्ठ राहून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन करून शिक्षण प्रसाराचे पवित्र कार्य केले. ज्ञानापासून शतकानुशतके वंचित, दुर्लक्षित राहिलेल्या दीन-दलित, आदिवासी यासारख्या सामाजिक स्तराच्या आत्मोन्नतीसाठी स्वतःला वाहून घेऊन त्यांच्या युगानुयुगे अज्ञानरुपी अंधकाराने भरलेल्या झोपडया ज्ञानरुपी प्रकाशाने उजळून टाकल्या. २८ जून २००० मध्ये स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि लोकनेत्यांच्या प्रयत्नातून महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आणि नागठाणे व परिसरातील सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची उच्च शिक्षण घेण्याची सोय झाली. हे महाविद्यालय रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. सन २०२४-२५ या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून या महाविद्यालयाने विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे.

प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार २३ ऑक्टोबर २०२४ रोजी रौप्यमहोत्सवी कार्यक्रम होत आहे. महाविद्यालयाने रौप्यमहोत्सवी वर्षात आतापर्यंत विविध उपक्रम राबविले आहे.

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व कोरी पाटी प्रोडेक्शन तारळे यांच्यावतीने राज्यस्तरीय एकदिवसीय अभिनय व संगीत प्रशिक्षण. कार्यशाळेचे आयोजन. मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात आला. इंग्रजी संभाषण कौशल्य विषयावर आधारित कार्यशाळा घेण्यात आली.

### नशाबंदी विषयावर पोस्टरचे प्रदर्शन

वाङ्मय मंडळ उद्घाटन, बोरगाव पोलीस स्टेशनमध्ये एनएसएस विद्यार्थिनींकडून राख्या बांधण्याचा कार्यक्रम, एनएसएस व एनसीसी विभागाच्या वतीने 'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत जांभळेवाडी गावात २५० वृक्षांची लागवड करण्यात आली. इतिहास विभाग व इतिहास संशोधन मंडळ सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने ऑगस्ट क्रांती दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयात अविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठ सातारा जिल्हास्तरीय युवक महोत्सवात सहभाग (एकांकिका- प्रथम क्रमांक, लोकवाद्य एकलवादन - द्वितीय क्रमांक, समूहगीत- उत्तेजनार्थ व समूहगायन उत्तेजनार्थ पारितोषिक). मध्यवर्तीला लोकवाद्य एकलवादनात तृतीय क्रमांक व लघुपट उत्तेजनार्थ प्रथम) कॉमर्स विभागाच्या वतीने आत्मनिर्भर करिअर विषयवर व्याख्यान. वाचनकट्टा उपक्रम सुरू केला. 'स्वच्छता ही सेवा' विषयावर पोस्टर एनएसएस व एनसीसीच्या वतीने सज्जनगड स्वच्छता व प्लास्टिकमुक्त अभियान मोहीम, जिमखाना विभागातर्फे शिवाजी विद्यापीठ सातारा विभागीय टेबल टेनिस स्पर्धा, इंग्रजी विभागातर्फे वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला आहे.

### नियोजित कार्यक्रम

व्याख्यानमाला आयोजन, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सेमिनार व चर्चासत्राचे आयोजन, स्मरणिका तयार करणे, माजी विद्यार्थी यशोगाथा स्मरणिका, महाविद्यालय परिसर सुशोभीकरण, विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशीप, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या वस्तूंचे दर्शन. साहित्य संमेलनाचे आयोजन, माजी गुरुदेव कार्यकर्ता सत्कार समारंभ, माजी विद्यार्थी मेळावा, पालक मेळावा. शौर्य/माजी सैनिक स्मृती उद्यान, महारोजगार मेळावा, बहुउद्देशीय सभागृह बांधकाम असे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

प्रीतिसंगम



# नागठाणे महाविद्यालयाच्यावतीने ज्ञानज्योत रॅलीचे आयोजन

**नागठाणे/प्रतिनिधी:**

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे समाधी स्थळ, कोल्हापूर ते आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे ज्ञानज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्य सौ शुभांगीताई गावडे यांच्या हस्ते ज्ञानज्योतीचे प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव प्रशासन एस.एम.गवळी, संस्थेचे सी. ई.ओ.कौस्तुभ गावडे, संस्थेचे आजीव सेवक व कोल्हापूर जिल्हा विभाग प्रमुख श्रीराम साळुंखे, विवेकानंद कॉलेज कोल्हापूरचे प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार, संस्थेच्या व्यवस्थापक मंडळ सदस्य डॉ. श्रुती जोशी, संस्थेचे व्यवस्थापन मंडळ सदस्य एस. के. कुंभार यांनी ज्ञानज्योती रॅली साठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ.महेश गायकवाड, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी, शिक्षकेतर स्टाफ, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

सकाळ

# कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमातून विद्यार्थी घडवा

## कुलगुरू डॉ. शिर्के; नागठाणेतील कॉलेजमध्ये रौप्यमहोत्सवाचे उद्‌घाटन

**काशीळ, ता. २५ :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांत कष्ट करण्याची जिद्द आणि चिकाटी असते. आज नवीन शैक्षणिक धोरणामुळे करिअर करण्यासाठी अनेक संधी प्राप्त झाल्या आहेत. मात्र, विद्यार्थ्यांनी स्वतःच्या क्षमता ओळखून आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाचे महत्त्व समजून घेऊन संधीची निवड करून करिअर करावे. महाविद्यालयाने रौप्यमहोत्सवी वर्षांत कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमातून विद्यार्थी घडवावेत, असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के यांनी काढले.



**नागठाणे :** कार्यक्रमात बोलताना डॉ. डी. टी. शिर्के. त्या वेळी शुभांगी गावडे, रूपाली बेंद्रे, मनोहर साळुंखे, डॉ. महेश गायकवाड, डॉ. अजितकुमार जाधव आदी.

नागठाणे (ता. सातारा) येथील आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेजच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. संस्थेच्या सचिव प्राचार्य शुभांगी गावडे अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमात अजित साळुंखे, जिल्ह्याचे विभागप्रमुख प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, कृषिभूषण मनोहर साळुंखे, मधुकर पाटील यांनी मनोगते व्यक्त केले. डॉ. राजाराम कांबळे, प्रा. शीतल सालवाडगी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अजितकुमार जाधव यांनी आभार मानले. यावेळी सरपंच रूपाली बेंद्रे, परिसरातील नागरिक, पालक, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

### मदतीचा हात...

यावेळी बहुउद्देशीय सभागृहासाठी कृषिभूषण मनोहर साळुंखे, अजित साळुंखे, जिमखाना गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी माजी विद्यार्थी, राष्ट्रीय खेळाडू व सध्या पोलिस दलात कार्यरत असलेल्या विद्यार्थी व प्रा. अण्णासाहेब पाटील यांनी देणगी दिली.

Satara, Satara-Today
26/10/2024 Page No. 6

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# नागठाणे महाविद्यालयाची ज्ञानज्योत रॅली



**नागठाणे महाविद्यालयाच्या ज्ञानज्योत रॅलीच्या शुभारंभप्रसंगी पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी.**

**नागठाणे : पुढारी वृत्तसेवा**

आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे ता. सातारा महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी स्थळ, कोल्हापूर ते आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे ज्ञानज्योत रॅली काढण्यात आली.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्य सौ. शुभांगीताई गावडे यांच्या हस्ते ज्ञानज्योतीचे प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव एस. एम. गवळी, सीईओ कौस्तुभ गावडे, आजीव सेवक व कोल्हापूर जिल्हा विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, विवेकानंद कॉलेज कोल्हापूरचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संस्थेच्या व्यवस्थापक मंडळ सदस्य डॉ. श्रुती जोशी, एस. के. कुंभार यांनी ज्ञानज्योती रॅलीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड उपस्थित होते.

My Satara Edition
Oct 23, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
Satara Edition_19 Oct_006
19 Oct 2024

# 'एआय'मुळे भाषा आणि साहित्य अधिक समृद्ध होईल

## प्राचार्या सौ. शुभांगी गावडे; नागठाणे कॉलेजमध्ये राष्ट्रीय वेबिनार उत्साहात

**नागठाणे, दि. १८ (प्रतिनिधी)** - भारतात शेकडो भाषा व प्रांतवार हजारो बोलीभाषा आहेत. त्यामध्ये डिजिटल समावेश वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने स्थानिक भाषांमध्ये डिजिटल सेवा कशी उपलब्ध करता येईल याचाही विचार करावा. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने ज्या भाषा आता बोलल्या जात नाहीत त्याचे पुनरुज्जीवन केल्यास भाषा आणि साहित्य खूप समृद्ध होईल, असे उदगार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी काढले.

नागठाणे येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या कॉलेजच्या रौप्य महोत्सव वर्षाचे औचित्य साधून इंग्रजी विभाग व इंग्लिश लँग्वेज टिचर्स असोसिएशन ऑफ इंडिया, सातारा चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारच्या उदघाटनप्रसंगी बोलत होत्या. समारंभास प्राचार्य डॉ राजेंद्र शेजवळ, माजी प्राचार्य डॉ. अशोक करांडे व प्रो. डॉ. उज्वला ताटे उपस्थित होते.

गावडे म्हणाल्या, कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ एक नवीन तंत्रज्ञान नाही, तर ती जगभरातील चळवळ बनली आहे. आज भारत ए आय तंत्रज्ञानासंबंधित प्रतिभा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेशी जोडल्या गेलेल्या नवीन संकल्पना यातला सर्वात मुख्य घटक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा विस्तार खूप अधिक वाढत असून आपल्या नवीन भविष्याला घडवण्याचा एक मोठा आधार बनणार आहे.

वेबिनारमध्ये बिजभाषक म्हणून नांदेड विद्यापीठाचे प्रा. डॉ. दिलीप चव्हाण, शिवाजी विद्यापीठाचे प्रा. डॉ. मनोहर वासवाणी व गुजरातमधील डॉ. विशाल वरीया यांनी मार्गदर्शन केले. वेबिनारमध्ये एआय आणि साहित्य व भाषेसमोर असणाऱ्या संधी व आव्हाने यावर अभ्यासपूर्ण चर्चा करण्यात आली. वेबिनारमध्ये ११८ अभ्यासकांनी सहभाग नोंदवला तर पन्नास अभ्यासपूर्ण संशोधनपर लेख प्राप्त झाले आहेत.

वेबिनार आयोजनासाठी प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. वेबिनार यशस्वी करण्यासाठी डॉ. ज्ञानदेव काळे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुरेश पाटील, श्रीमती मनिषा सुतार, अशोक गाडेकर, श्रीमती शैला चोबे यांचे सहकार्य लाभले.

प्रीतिसंगम

# आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे भाषा व साहित्य समृद्ध होईल

## प्राचार्या सौ. शुभांगी गावडे

**नागठाणे/प्रतिनिधी:**

भारतात शेकडो भाषा बोलल्या जातात, तसेच हजारो बोलीभाषा आहेत. डिजिटल समावेश वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने स्थानिक भाषांमध्ये डिजिटल सेवा कशा उपलब्ध करून देता येतील याचाही विचार करून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने ज्या भाषा आता बोलल्या जात नाहीत त्या कशा पुनरुज्जीवित केल्या जाऊ शकतात यावर देखील काम केल्यास भाषा आणि साहित्य खूप समृद्ध होईल असे उदगार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित आर्टस , कॉमर्स एंड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सव वर्षाचे औचित्य साधून इंग्रजी विभाग व



इंग्लिश लँग्वेज टिचर्स असोसिएशन ऑफ इंडिया, सातारा चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'A study of Language and Literature: Opportunities and Challenges in the -I Era" या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारच्या उदघाटनप्रसंगी त्या प्रमुख उदघाटक म्हणून बोलत होत्या.

प्राचार्या सौ. शुभांगी गावडे आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या , कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ एक नवीन तंत्रज्ञान नाही, तर ती जगभरातील चळवळ बनली आहे. आज भारत एआय तंत्रज्ञाना संबंधित प्रतिभा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेशी जोडल्या गेलेल्या नवीन संकल्पना यातला सर्वात मुख्य घटक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा विस्तार खूप अधिक वाढत असून आपल्या नवीन भविष्याला घडवण्याचा एक मोठा आधार बनणार आहे.

राष्ट्रीय वेबिनारमध्ये बिजभाषक म्हणून नांदेड विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. दिलीप चव्हाण यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. वेबिनारच्या प्रथम सत्रात शिवाजी विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. मनोहर वासवाणी व व द्वितीय सत्रात गुजरात राज्यातील डॉ.विशाल वरीया यांनी प्रमुख वक्ते म्हणून भारतात आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्राची भविष्यातली दिशा आणि भाषा व साहित्य संधी आणि आव्हाने यावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय वेबिनारच्या उदघाटन समारंभास प्राचार्य डॉ राजेंद्र शेजवळ सदस्य व्यवस्थापन परिषद शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर , माजी प्राचार्य डॉ.अशोक करांडे व प्रो.(डॉ) उज्वला ताटे उपस्थित होते.

राष्ट्रीय वेबिनारमध्ये एआय आणि साहित्य व भाषेसमोर असणाऱ्या संधी व आव्हाने यावर अभ्यासपूर्ण चर्चा करण्यात आली. वेबिनारसाठी एकुण ११८ अभ्यासकांनी सहभाग नोंदवला तर जवळपास पन्नास अभ्यासपूर्ण संशोधनपर लेख प्राप्त झाले आहेत. वेबिनारचे यशस्वी आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले, राष्ट्रीय वेबिनार यशस्वी करण्यासाठी डॉ. ज्ञानदेव काळे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुरेश पाटील, श्रीमती मनिषा सुतार, अशोक गाडेकर, श्रीमती शैला चोबे यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

तरुण भारत

# आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे भाषा समृद्ध होईल

## नागठाणेमधील कार्यक्रमात प्राचार्या शुभांगी गावडे यांचे प्रतिपादन

वार्ताहर
देशमुखनगर

भारतात शेकडो भाषा बोलल्या जातात, तसेच हजारो बोलीभाषा आहेत. डिजिटल समावेश वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने स्थानिक भाषांमध्ये डिजिटल सेवा कशा उपलब्ध करून देता येतील. याचाही विचार करून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने ज्या भाषा आता बोलल्या जात नाहीत, त्या कशा पुनरुज्जीवित केल्या जाऊ शकतात. यावर देखील काम केल्यास भाषा आणि साहित्य खूप समृद्ध होईल, असे उद्गार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सव वर्षाचे औचित्य साधून इंग्रजी विभाग व इंग्लिश लँग्वेज टिचर्स असोसिएशन ऑफ इंडिया, सातारा चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या A study of Language and Literature Opportunities and Challenges in the AI Era या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारच्या उद्घाटनप्रसंगी त्या प्रमुख उद्घाटक म्हणून बोलत होत्या. राष्ट्रीय वेबिनारमध्ये बिजभाषक म्हणून नांदेड विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. दिलीप चव्हाण यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. वेबिनारच्या प्रथम सत्रात शिवाजी विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. मनोहर वासवाणी व द्वितीय सत्रात गुजरात राज्यातील डॉ. विशाल वरीया यांनी प्रमुख वक्ते म्हणून भारतात आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्राची भविष्यातली दिशा आणि भाषा व साहित्य संधी आणि आव्हाने यावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय वेबिनारच्या उद्घाटन समारंभास प्राचार्य डॉ राजेंद्र शेजवळ सदस्य व्यवस्थापन परिषद शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, माजी प्राचार्य डॉ. अशोक करांडे व प्रो.(डॉ) उज्वला ताटे उपस्थित होते. राष्ट्रीय वेबिनारमध्ये एआय आणि साहित्य व भाषेसमोर असणाऱ्या संधी व आव्हाने यावर अभ्यासपूर्ण चर्चा करण्यात आली. वेबिनारसाठी एकूण ११८ अभ्यासकांनी सहभाग नोंदवला तर जवळपास पन्नास अभ्यासपूर्ण संशोधनपर लेख प्राप्त झाले आहेत. वेबिनारचे यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले, राष्ट्रीय वेबिनार यशस्वी करण्यासाठी डॉ. ज्ञानदेव काळे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुरेश पाटील, मनिषा सुतार, अशोक गाडेकर, शैला चोबे यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

### बुद्धिमतेचा होणार विकास

प्राचार्या शुभांगी गावडे पुढे म्हणाल्या, कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ एक नवीन तंत्रज्ञान नाही, तर ती जगभरातील चळवळ बनली आहे. आज भारत एआय तंत्रज्ञाना संबंधित प्रतिभा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेशी जोडल्या गेलेल्या नवीन संकल्पना यातला सर्वात मुख्य घटक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा विस्तार खूप अधिक वाढत असून आपल्या नवीन भविष्याला घडवण्याचा एक मोठा आधार बनणार आहे.

# पुण्यभूमी महाराष्ट्र न्यूज

मुख्य संपादक : मंगेश पवार
Wednesday / 16/10/24


## वाचनाशिवाय विचारांचा विकास अशक्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड



वाचन हे केवळ एक शैक्षणिक साधन नाही, तर माणसाच्या वैयक्तिक विकासात, आत्मबळ वाढवण्यात आणि मानसिक समृद्धी वाढवण्यात मोलाची भूमिका बजावते. वाचनातून ज्ञान, कल्पनाशक्ती, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. त्यामुळे सर्वांनी वाचनाची सवय लावून घेतली पाहिजे. वाचनाशिवाय विचारांचा विकास अशक्य आहे असे उदगार प्राचार्य कॅप्टन महेश गायकवाड यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग, वाचन कट्टा, राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्रसेना यांच्या संयुक्त विद्यमाने "डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन म्हणून महाविद्यालयात साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात पुढे म्हणाले, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे संपूर्ण जीवन हे विदयार्थ्यांसाठी एक प्रेरणा आहे. शाळेत असताना त्यांनी अनेक आव्हाने पार केली, पण त्यांनी कधीच हार मानली नाही. त्यांचे कष्ट, जिज्ञासा आणि वाचनाची आवड यामुळेच ते सर्वोच्च पदापर्यंत पोहोचले. त्यांचा आदर्श तरुण पिढीने घेणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाची सुरुवात प्रथम भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम, स्वामी विवेकानंद, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमांच्या पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 350 व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या वर्णनाचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच डॉ राजाराम कांबळे यांनी आपले मनोगत ही व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ग्रंथपाल प्रा विजय यादव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.सौ.शैला चोबे यांनी केले तर आभार डॉ गणेश गभाले यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# वाचनाशिवाय विचारांचा विकास अशक्य

## कॅप्टन डॉ महेश गायकवाड




**नागठाणे/प्रतिनिधी:** वाचन हे केवळ एक शैक्षणिक साधन नाही, तर माणसाच्या वैयक्तिक विकासात, आत्मबळ वाढवण्यात आणि मानसिक समृद्धी वाढवण्यात मोलाची भूमिका बजावते. वाचनातून ज्ञान, कल्पनाशक्ती, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. त्यामुळे सर्वांनी वाचनाची सवय लावून घेतली पाहिजे. वाचनाशिवाय विचारांचा विकास अशक्य आहे असे उदगार प्राचार्य कॅप्टन महेश गायकवाड यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग, वाचन कट्टा, राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्रसेना यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन म्हणून महाविद्यालयात साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात पुढे म्हणाले, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे संपूर्ण जीवन हे विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणा आहे. शाळेत असताना त्यांनी अनेक आव्हाने पार केली, पण त्यांनी कधीच हार मानली नाही. त्यांचे कष्ट, जिज्ञासा आणि वाचनाची आवड यामुळेच ते सर्वोच्च पदापर्यंत पोहोचले. त्यांचा आदर्श तरुण पिढीने घेणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाची सुरुवात प्रथम भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम, स्वामी विवेकानंद, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमांच्या पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या वर्णनाचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच डॉ. राजाराम कांबळे यांनी आपले मनोगत ही व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ग्रंथपाल प्रा विजय यादव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.सौ.शैला चोबे यांनी केले तर आभार डॉ गणेश गभाले यांनी मानले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.



नागठाणे : युवा महोत्सवातील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत शिक्षक.

# युवा महोत्सवामध्ये नागठाणे महाविद्यालयाची बाजी

■ संतोष निलाखे, आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे

आजरा महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाचा ४४ वा मध्यवर्ती युवा महोत्सव झाला. या युवा महोत्सवात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित, आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाने सादर केलेल्या लोकवाद्य एकलवादन स्पर्धेत सौरभ चौगुले यास तृतीय क्रमांक प्राप्त झाला, तसेच लघुपट या कलाप्रकारात जाणीव या लघुपटास उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवातील महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व कलाकारांचे, तसेच लघुपटाचे दिग्दर्शक नितीन पवार, एकल वादन साथीदार ज्ञानेश्वरी पुजारी, लघुपटातील विद्यार्थी कलाकार, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. संतोष निलाखे व सर्व सदस्य यांचे अभिनंदन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी अभिनंदन केले.

प्रीतिसंगम



# अभिजात भाषेच्या दर्जाने मराठीचा गौरव वाढला

## प्रा.बाळासाहेब जगताप

***नागठाणे/प्रतिनिधी:***

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र सरकारने बहाल केला त्यामुळे मराठी ही भाषा स्वतंत्र आहे, कोणत्याही बाह्य प्रभावाखाली तिची निर्मिती झालेली नाही, या भाषेत किमान दीड हजार वर्षांपासून लिखित पुरावे उपलब्ध आहेत आणि मराठी भाषेचा प्रवाह सातत्यपूर्ण राहिलेला असून जी मौलिक साहित्य परंपरा दाखवते हे सिद्ध झाले. त्यामुळे मराठी भाषेचा गौरव वाढला आहे. असे उद्‌गार समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय, लोणी काळभोर जिल्हा पुणे या महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब जगताप यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात भाषेचा दर्जा: मराठीचा गुणगौरव या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानपर कार्यक्रमात अभिजात भाषेचा दर्जा: मराठीचा गुणगौरव या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कॅप्टन डॉ. महेश गायकवाड होते.

प्रा. बाळासाहेब जगताप आपल्या भाषणात पुढे म्हणाले, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम आणि संत नामदेव यांच्यासारख्या दिग्गजांच्या साहित्यांनी मराठी भाषा समृध्द झाली. तिचा अभिजातपण स्वयंसिद्ध आहेच परंतू आज अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचा दर्जा अधिकच उंचावला गेला आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेच्या संशोधनासाठी आणि तिच्या संवर्धनासाठी निधी मिळेल. त्यामुळे मराठी भाषेच्या जतनासाठी आणि प्राचीन साहित्याच्या अभ्यासासाठी प्रोत्साहन मिळाले आहे. मराठी भाषेतील प्राचीन साहित्य, संस्कृती, आणि इतिहास यांचे अधिकाधिक शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश होईल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा अधिक खोल अभ्यास करता येईल.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक व स्वागत प्रा . स्मिता कालभूषण यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रा. शितल सालवाडगी यांनी मानले. या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी तसेच प्रा. अभय जायभाये, डॉ. आर. एम. कांबळे, डॉ. एल. बी. दोडमणी प्रमुख उपस्थित होते.

# प्रीतिसंगम

## सातारा विभागीय टेबल टेनिस स्पर्धा नागठाणे महाविद्यालयात संपन्न

**नागठाणे/प्रतिनिधी:**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित, आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा विभागीय टेबल टेनिस स्पर्धा नागठाणे येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे उद्योजक मा. हृषिकेश ढाणे हे होते. स्पर्धेच्या उद्घाटनपर भाषणात ते म्हणाले, स्पर्धेमध्ये हार जीत होत असते. मात्र जिंकण्यासाठीच खेळत असताना तणाव वाढतो. त्यामुळे स्पर्धेत आपण अपयशी होतो. म्हणून स्पर्धेत खेळताना आनंद घ्या. आपोआप खेळ चांगला होऊन यश मिळते.

टेबल टेनिस स्पर्धेच्या उदघाटन समारंभाचे अध्यक्ष कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनीही विद्यार्थ्यांनी खेळाडू वृत्तीने खेळ करून स्पर्धेत यश मिळवावे असे आवाहन केले.स्पर्धेच्या उदघाटन समारंभाचे प्रास्ताविक व स्वागत जिमखाना विभाग प्रमुख डॉ.लक्ष्मण दोडमणी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. राजाराम कांबळे यांनी केला. सूत्रसंचालन प्रा.शैला चोबे यांनी केले तर आभार प्रा.संतोष निलाखे यांनी मांनले.

टेबल टेनिस स्पर्धेत मुलांमध्ये प्रथम क्रमांक शासकीय इंजीनियरिंग कॉलेज, कराड द्वितीय क्रमाक श्रीमती मीनलबेन



मेहता कॉलेज, पाचगणी तर तृतीय क्रमांक बाळासाहेब देसाई कॉलेज,पाटण यांनी मिळविला तर मुलीमध्ये प्रथम क्रमांक शासकीय इंजिनिअरिंग कॉलेज, कराड, द्वितीय क्रमांक सावित्रीबाई फुले महिला कॉलेज,सातारा व तृतीय क्रमांक बाळासाहेब देसाई कॉलेज,पाटण यांनी मिळविला. तसेच चतुर्थ क्रमांक शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे कॉलेज, कराड यांनी पटकावला.

सर्व स्पर्धकांना सातारा विभागीय स्पर्धेचे चेअरमन प्राचार्य डॉ सतीश देसाई यांच्या हस्ते पारितोषिक देवून गौरविण्यात आले. वरील संघाची आष्टा येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आंतर विभागीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ क्रिडा संचालक डॉ. दीपक डांगे, पंच श्री संग्राम राजेशिर्के व सौ मनीषा सरदेशमुख यांचे सहकार्य लाभले.

06 Oct 2024 - Page 4 | epaper.pritisangam.in
Powered by softisky | 9764331134

# तरुण भारत

## नागठाणे कॉलेजचे सज्जनगडावर 'स्वच्छता ही सेवा' अभियान

वार्ताहर
कास

आपल्या गड किल्ल्यांचे संवर्धन स्वच्छता ही आपणच केली पाहिजे कोणत्याही गडावर सार्वजनिक ठिकाणी गेल्यावर कचरा न करता स्वच्छता ठेवली पाहिजे हा संदेश पोहोचवण्यासाठी नागठाणे येथील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र सरकारमार्फत आयोजित 'माय भारत स्वच्छता ही सेवा' या अभियानाअंतर्गत सज्जनगड येथे स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्त अभियान राबविले.

हे अभियान केंद्र सरकारने १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये राबविण्यात येत आहे. शिबिराच्या प्रारंभी सातारा जिल्हा युवा अधिकारी स्वप्निल देशमुख यांनी शिबिरास शुभेच्छा



**सज्जनगड : किल्ले सज्जनगडावर स्वच्छता करणारे नागठाणे कॉलेजचे विद्यार्थी.**

संदेश दिला. सज्जनगडावरील वाहनतळ बस स्थानक किल्ले सज्जनगड महाद्वार मार्गावरील पायऱ्या अंगलाई देवी मंदिर या पाय्रया आणि गडावरील सर्व परिसरामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता करून प्लास्टिक तसेच प्लास्टिकच्या पाणी बॉटलचे संकलन केले.

यापूर्वी नागठाणे महाविद्यालयाने 'माय भारत स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत महाविद्यालयामध्ये तसेच सामाजिक स्तरावर स्वच्छतेवरती व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, स्मशानभूमी स्वच्छता हे उपक्रम देखील राबविले आहेत.

किल्ल्याचा इतिहास मांडताना कुलकर्णी गुरुजींनी सज्जनगडाचे ऐतिहासिक महत्त्व आणि इतिहास सांगितला. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी सज्जनगड येथे शिबिरार्थींनी केलेल्या कामाचे कौतुक करून गड किल्ले आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी तरुणांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

या नियोजनासाठी श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड आणि परळी ग्रामपंचायत यांचे सहकार्य लाभले. सदर स्वच्छता शिबिराचे नियोजन कार्यक्रम अधिकारी डॉ संदीप लोखंडे व डॉ सुनील पवार, एन.सी.सी. ऑफिसर डॉ. गणेश गमाले, प्रा. जयमाला उथळे, प्रा. शितल सालवाडगी, प्रा. संतोष सोंडगे, प्रा. भालचंद्र बिचितकर आणि संतोष पवार (पी. आय) यांनी केले. शिबिरामध्ये १०२ विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून शिबिर यशस्वीपणे पूर्ण केले.

उपस्थित होते. 'संत तुकाराम आणि आनंदी जीवन' या विषयावर क्षीरसागर यांनी सुमारे दोनशे सभासदांशी संवाद

समाजसेवक, समाजसुधारक या सर्वांचे जीवन म्हणजे जीवन कसे जगावे याचा आदर्श वस्तू पाठ आहे. संत तुकाराम

यांनी अवघ्या ४२ वर्षांच्या आयुष्यात प्रचंड संघर्ष केला. या जीवन संघर्षात त्यांनी समाजाचे निरीक्षण केले. साडेचार हजार अभंगांची रचना त्यांनी

अभ्यास, प्रोत्साहन इत्यादी सद्गुणांची महती विशद केली. महेश गुरव यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# सज्जनगडावर स्वच्छता अभियान

**परळी : पुढारी वृत्तसेवा**

नागठाणे येथील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र सरकारमार्फत आयोजित माय भारत स्वच्छता ही सेवा या अभियानांतर्गत सज्जनगड येथे स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्त अभियान राबवले.

शिबिराच्या प्रारंभी सातारा जिल्हा युवा अधिकारी स्वप्निल देशमुख यांनी शुभेच्छा संदेश दिला. सज्जनगडावरील वाहनतळ, बस स्थानक, किल्ले सज्जनगड महाद्वार मार्गावरील पायऱ्या, अंगलाई देवी मंदिर या पायऱ्या आणि गडावरील सर्व परिसरामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली.

किल्ल्याचा इतिहास मांडताना कुलकर्णी गुरुजींनी सज्जनगडाचे ऐतिहासिक महत्त्व आणि इतिहास सांगितला. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी शिबिरार्थींनी केलेल्या कामाचे कौतुक केले. नियोजनासाठी श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड आणि परळी ग्रामपंचायत यांचे सहकार्य लाभले. शिबिरासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ संदीप लोखंडे व डॉ. सुनील पवार, एन.सी.सी. ऑफिसर डॉ. गणेश गभाले, प्रा. जयमाला उथळे, प्रा. शितल सालवाडगी, प्रा. संतोष सोंडगे, प्रा. भालचंद्र बिचितकर आणि संतोष पवार (पी. आय) यांनी परिश्रम घेतले.



**नागठाणे येथील विद्यार्थ्यांनी किल्ले सज्जनगडावर स्वच्छता अभियान राबवून परिसराची सफाई केली.**



# नागठाणे कॉलेजने राबवली सज्जनगडावर स्वच्छता मोहीम

**नागठाणे/प्रतिनिधी:**

स्वच्छ मन, स्वच्छ शरीर आणि स्वच्छ परिसर अशी स्वच्छतेची संकल्पना गांधीजींनी मांडली. स्वच्छता स्वातंत्र्यापेक्षा महत्त्वाची आहे', असे गांधीजी म्हणत. स्वच्छतेला त्यांनी आपल्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनवले. म्हणून आपला परिसर, आपला देश स्वच्छ आणि निरोगी ठेवण्यासाठी भारत सरकारने स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत 'स्वच्छता ही सेवा' हे अभियान २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविले.

स्वच्छता ही सेवा या अभियानांतर्गत आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने

सज्जनगड स्वच्छता अभियान मोहिम राबवण्यात आली. सज्जनगडावरील कार पार्किंग, पायऱ्या आणि गडावरील सर्व परिसराची स्वयंसेवकांनी स्वच्छता करून प्लास्टिक निर्मूलनाअंतर्गत प्लास्टिक बाटल्यांचे संकलन करून परिसर प्लास्टिक मुक्त केला.

श्री कुलकर्णी गुरुजींनी सज्जनगडाचे ऐतिहासिक महत्त्व आणि इतिहास सांगून स्वयंसेवकांना हा ऐतिहासिक ठेवा जतन आणि संवर्धनासाठी सहकारी केल्याबद्दल धन्यवाद दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी सज्जनगड येथे शिबिरार्थींनी केलेल्या कामाचे कौतुक करून गड किल्ले आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी तरुणांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. या स्तुत्य उपक्रमास सातारा जिल्हा युवा अधिकारी स्वप्निल देशमुख यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले व शुभेच्छा दिल्या. सज्जनगड स्वच्छता अभियान शिबिर यशस्वी करण्यासाठी रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड आणि परळी ग्रामपंचायत यांचे सहकार्य लाभले.

सदर स्वच्छता शिबिराचे नियोजन कार्यक्रम अधिकारी डॉ संदीप लोखंडे व डॉ सुनील पवार, एन.सी.सी. ऑफिसर डॉ.गणेश गभाले, प्रा.जयमाला उथळे, प्रा. शीतल सालवाडगी, प्रा. संतोष सोंडगे, प्रा. भालचंद्र बिचितकर आणि संतोष पवार (पी.आय) यांनी केले. सदर स्वच्छता अभियान शिबिरामध्ये एकूण १०२ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्यावतीने 'माय भारत स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत दि. २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत महाविद्यालयामध्ये तसेच सामाजिक स्तरावर ग्रामस्वच्छता या विषयावर व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, स्मशानभूमी स्वच्छता हे उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे.

# नागठाणे कॉलेजचे सज्जनगडावर स्वच्छता ही सेवा अभियान

## विद्यार्थ्यांनी स्वच्छतेतून दिला गड किल्ले संवर्धनाचा संदेश

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**परळी, दि. १ :** आपल्या गड किल्ल्यांचे संवर्धन स्वच्छता ही आपणच केली पाहिजे कोणत्याही गडावर सार्वजनिक ठिकाणी गेल्यावर कचरा न करता स्वच्छता ठेवली पाहिजे हा संदेश उजवण्यासाठी नागठाणे येथील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र सरकारमार्फत आयोजित माय भारत स्वच्छता ही सेवा या अभियाना अंतर्गत सज्जनगड येथे स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्त अभियान राबविले.

हे अभियान केंद्र सरकारने १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये राबविण्यात येत आहे. शिबिराच्या प्रारंभी सातारा जिल्हा युवा अधिकारी श्री स्वप्निल देशमुख यांनी शिबिरास शुभेच्छा संदेश दिला. सज्जनगडावरील वाहनतळ बस स्थानक किल्ले सज्जनगड महाद्वार मार्गावरील पायऱ्या अंगलाई देवी मंदिर या पायऱ्या आणि गडावरील सर्व परिसरामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता करून प्लास्टिक तसेच प्लास्टिकच्या पाणी बॉटलचे संकलन केले.

यापूर्वी नागठाणे महाविद्यालयाने 'माय भारत स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत महाविद्यालयामध्ये तसेच सामाजिक स्तरावर स्वच्छतेवरती



व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, स्मशानभूमी स्वच्छता हे उपक्रम देखील राबविले आहेत.

किल्ल्याचा इतिहास मांडताना कुलकर्णी गुरुजींनी सज्जनगडाचे ऐतिहासिक महत्व आणि इतिहास सांगितला. महाविद्यालयाचे प्र प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी सज्जनगड येथे शिबिरार्थींनी केलेल्या कामाचे कौतुक करून गड किल्ले आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी तरुणांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

rinted at Muktagiri Press, 455/2/17, Sadarbazar, Satara and published at Shivsampada, 46, Mutha Colony, Sadarbazar, Satara. RNI Regd No. 69769/98



# मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये नागठाणे महाविद्यालयाचे यश

**देशमुखनगर :** आजरा महाविद्यालय आजरा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर ४४ वा मध्यवर्ती युवा महोत्सव संपन्न झाला. या युवा महोत्सवात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित, आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाने सादर केलेल्या लोकवाद्य एकलवादन स्पर्धेत सौरभ चौगुले यास तृतीय क्रमांक प्राप्त झाला. लघूपट या कलाप्रकारात जाणीव या लघुपटास उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक प्राप्त झाला. शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवातील महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व कलाकारांचे तसेच लघुपटाचे दिग्दर्शक नितीन पवार, एकल वादन साथीदार ज्ञानेश्वरी पुजारी, लघुपटातील विद्यार्थी कलाकार, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. संतोष निलाखे व सर्व सदस्य यांचे अभिनंदन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगीताई गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विभाग प्रमुख प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी अभिनंदन केले.

# मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये नागठाणे महाविद्यालयाचे यश

**नागठाणे/प्रतिनिधी:**

आजरा महाविद्यालय आजरा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर ४४ वा मध्यवर्ती युवा महोत्सव संपन्न झाला. या युवा महोत्सवात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित, आर्ट्स, कॉमर्स एड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाने सादर केलेल्या लोकवाद्य एकलवादन स्पर्धेत कु सौरभ चौगुले यास तृतीय क्रमांक प्राप्त झाला. तसेच लघूपट या कलाप्रकारात जाणीव या लघुपटास उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक प्राप्त झाला



शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवातील महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व कलाकारांचे तसेच लघुपटाचे दिग्दर्शक नितीन पवार, एकल वादन साथीदार कु ज्ञानेश्वरी पुजारी, लघुपटातील विद्यार्थी कलाकार, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा.संतोष निलाखे व सर्व सदस्य यांचे अभिनंदन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या सौ.शुभांगीताई गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विभाग प्रमुख प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ यांनी अभिनंदन केले.

# पुण्यभूमी महाराष्ट्र न्यूज

मुख्य संपादक: मंगेश पवार उपसंपादक: दिलीप वाघमारे

1/10/24 मंगळवार

# नागठाणे कॉलेज चे सज्जनगडावर स्वच्छताही सेवा अभियान




**पुणे सातारा**

नागठाणे (प्रतिनिधी): बजरंग चौधरी

नागठाणे येथील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र सरकारमार्फत आयोजित *माय भारत स्वच्छता ही सेवा* या अभियाना अंतर्गत सज्जनगड येथे स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्त अभियान राबविले.

हे अभियान केंद्र सरकारने १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये राबविण्यात येत आहे. शिबिराच्या प्रारंभी सातारा जिल्हा युवा अधिकारी श्री स्वप्निल देशमुख यांनी शिबिरास शुभेच्छा संदेश दिला. सज्जनगडावरील पार्किंग पायऱ्या आणि गडावरील सर्व परिसरामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता करून प्लास्टिक तसेच प्लास्टिकच्या पाणी बॉटलचे संकलन केले.

यापूर्वी नागठाणे महाविद्यालयाने 'माय भारत स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत महाविद्यालयामध्ये तसेच सामाजिक स्तरावर स्वच्छतेवरती व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, स्मशानभूमी स्वच्छता हे उपक्रम देखील राबविले आहेत.

किल्ल्याचा इतिहास मांडताना कुलकर्णी गुरुजींनी सज्जनगडाचे ऐतिहासिक महत्त्व आणि इतिहास सांगितला. महाविद्यालयाचे प्र प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी सज्जनगड येथे शिबिरार्थींनी केलेल्या कामाचे कौतुक करून गड किल्ले आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी तरुणांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

या नियोजनासाठी श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड आणि परळी ग्रामपंचायत यांचे सहकार्य लाभले. सदर स्वच्छता शिबिराचे नियोजन कार्यक्रम अधिकारी डॉ संदीप लोखंडे व डॉ सुनील पवार, एन.सी.सी. ऑफिसर डॉ.गणेश गभाले, प्रा.जयमाला उथळे, प्रा. शितल सालवाडगी, प्रा. संतोष सोंडगे, प्रा. भालचंद्र बिचितकर आणि संतोष पवार (पी. आय) यांनी केले. सदर शिबिरामध्ये एकूण 102 विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून शिबीर यशस्वीपणे पूर्ण केले.

सकाळ

# ‘पॉझिटिव्ह’ एकांकिकेने जागवला युवा महोत्सव

## शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरावर नागठाणे महाविद्यालयाचा डंका

**सातारा, ता. ३० :** कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या नागठाणे येथील आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच्या कलाकारांनी सादर केलेल्या ‘पॉझिटिव्ह’ या एकांकिकेला पहिला क्रमांक मिळाला. आजरा महाविद्यालय आजरा येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी या एकांकिकेची निवड झाली आहे.



**सातारा :** युवा महोत्सवातील एकांकिका स्पर्धेतील यशस्वी एकांकिकेतील कलाकार आणि तंत्रज्ञ.

युवा महोत्सव म्हणजे तरुणाईच्या उत्साहाला उधाण आणणारी स्पर्धा. या महोत्सवात विविध कला प्रकारामध्ये कलाकार आपली कला सादर करत असतात. महोत्सवातील एकांकिका सादरी करणात दिग्दर्शक नितीन पवार यांनी दिग्दर्शित केलेली पॉझिटिव्ह एकांकिका सरस ठरली. गेली सलग तीन वर्षे या युवा महोत्सवात फराळ, शहीद आणि आता पॉझिटिव्ह या दर्जेदार एकांकिकांचे सादरीकरण श्री. पवार यांनी केले आहे.

त्याचबरोबर या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात एकल लोकवाद्य वादन कलाप्रकारात सौरव चौगुले याचा द्वितीय क्रमांक आला आहे, तसेच भारतीय समूहगीत आणि सुगम गायन कला प्रकारातही उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. युवा महोत्सवातील महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व कलाकारांचे, तसेच दिग्दर्शक श्री. पवार, संगीत दिग्दर्शक दीपक सपकाळ, सहायक वादक, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. संतोष निलाखे, सर्व कलाकारांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विभागप्रमुख प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी अभिनंदन केले.

Satara, Satara-Today
01/10/2024 Page No. 3

प्रीतिसंगम

# युवकांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना राष्ट्रीय सेवा योजनेने निर्माण केली

## डॉ.सुभाष शेळके




***नागठाणे/प्रतिनिधी:*** राष्ट्रीय सेवा योजना ही राष्ट्रीय एकात्मतेसाठी सशक्त साधन आहे. युवकांच्यात निस्वार्थ सेवाभाव, राष्ट्रभक्ती, सेवाभावी वृत्ती विज्ञाननिष्ठा आणि प्रामाणिकपणा रुजवण्याचे काम या योजनेने केले आहे. राष्ट्राचा भूतकाळ अक्षरबद्ध करून राष्ट्राच्या भविष्याला आकार देण्याचे काम या योजनेच्या माध्यमातून युवक करतात. खऱ्या अर्थाने युवकांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना राष्ट्रीय सेवा योजनेने केली आहे. असे उदगार प्रा.डॉ. सुभाष शेळके यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स ,कॉमर्स न्ड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन समारंभ व एन एस एस दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानपर कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड हे होते.

प्रा डॉ सुभाष शेळके आपल्या भाषणात पुढे म्हणाले, एन एस एस चे शिबिर सहजीवन , सहशिक्षण व सहभोजन शिकवतात. यातून सर्वधर्मी समानत्व या भावनेचा विकास होतो. जीवन मूल्यांची जपणूक करण्याचं खरं शिक्षण, सचोटी आणि मनाची मशागत करणाऱ्या विचारांची शिदोरी ही योजना युवकांना देते. अलीकडे युवकांच्या मनावर अंधकार आणि मळभ दाटला आहे. अशावेळी त्यांना प्रकाशाचा झोत होऊन मार्ग दाखवण्याचे काम ही योजना करत आहे.

राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, भारतातला युवक देश सेवेची जोडला गेला पाहिजे या हेतूने राष्ट्रीय सेवा योजना निर्माण झाली. आज ही योजना युवकांना सामाजिकतेचे भान प्राप्त करून समाजाला उन्नत करण्याचे काम करते. त्यांच्यात नेतृत्व, वक्तृत्व आणि कर्तुत्व या गुणांचा विकास साधण्याचे काम या योजनेने स्थापनेपासूनच केले आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ संदीप लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.भालचंद्र बिचितकर यांनी केले तर आभार डॉ. सुनील पवार यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी कार्यक्रम समन्वयक प्रा अभय जायभाये, विद्यार्थी सचिव कु. अक्षदा जाधव सर्व प्राध्यापक विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रीन क्लब यांच्या विद्यमाने स्वयंसेवकांनी तयार केलेल्या 'स्वच्छता हीच सेवा 'या विषयावरील २५ पोस्टर्सचे प्रदर्शन भरवण्यात आले. त्याचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

01 Oct 2024 - Page 3 | epaper.pritisangam.in
Powered by softisky | 9764331134

सातारा टाईम्स्

Email ID : sataratimes007@gmail.com

संपादक : श्री. सत्यनारायण शेडगे Postal Regn.No. STR/093/2022-2024
Posted every Wednesday at Satara City Post Office

वर्ष ४ • अंक ३५ • सोमवार दि. ३० सप्टेंबर २०२४ ते रविवार दि. ६ ऑक्टोबर २०२४ RNI No. MAHMAR/2021/79817 • पृष्ठ -४ • किंमत - २ रुपये

# अविष्कार संशोधन स्पर्धेतून विद्यार्थ्यांची जिज्ञासा वृत्ती वाढेल : प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार



नागठाणे : विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्ती वाढीस लागावी, त्यांच्यामध्ये कौशल्य आणि कल्पकता निर्माण व्हावी, यासाठी विद्यापीठामध्ये अविष्कार संशोधन स्पर्धा घेतल्या जातात. या स्पर्धेसाठी विद्यार्थी तयार व्हावेत हे उद्दिष्ट समोर ठेवून महाविद्यालय स्तरावर अशी स्पर्धा आयोजित करणे हे कौतुकास्पद आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन संशोधक विद्यार्थी नवनवीन विषयावर अभ्यासपूर्ण संशोधन करून सादरीकरण करतात. त्यातून त्यांच्यात सृजनशीलता वाढते आणि त्यांना समाजाच्या अनेक समस्यांवर उत्तरे शोधण्याची सवय लागते. तसेच जिज्ञासा वाढून संशोधन वृत्तीला चालना मिळते असे उदगार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित, विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूरचे प्राचार्य. डॉ.आर.आर.कुंभार यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या अविष्कार संशोधन स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी ते प्रमुख उदघाटक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते. प्राचार्य डॉ.आर.आर. कुंभार आपल्या भाषणात पुढे म्हणाले, आविष्कार स्पर्धेमध्ये सहभागी झालेले संशोधक विद्यार्थी व परीक्षक यांच्याशी स्पर्धेदरम्यान होणारा संवाद तसेच तज्ञांचे होणारे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांच्या संशोधन विचार क्षमतेमध्ये सखोलता निर्माण होते. म्हणून विद्यार्थ्यांनी सूचनांचे लक्ष पूर्ण आकलन करावे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ.महेश गायकवाड आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास अविष्कार संशोधन स्पर्धा उपयुक्त ठरते. विद्यार्थ्यांना त्यांच्या मनातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक विचार व्यव... [illegible] ...वर तपासून पाहण्याची संधी आविष्कारमुळे निर्माण [illegible] मुळे मिळाली. त्याचा उपयोग करून आत्मविश्वासाने [illegible].

Copied

महाविद्यालयीन स्तरावरील अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये १४ विद्यार्थ्यांनी विविध विषयावर अभ्यासपूर्ण संशोधन करून सादरीकरण केले. कु. साक्षी कदम हिच्या 'ग्रामपंचायत मधील महिलांचे आरक्षण आणि महिलांचे राजकीय सक्षमीकरण: एक मूल्यमापन' या संशोधन प्रकल्पास प्रथम क्रमांक प्राप्त झाला. कु प्रतिक्षा देशमुख हिच्या 'मॅनेजमेंट ऑण्ड रियुज' या संशोधन प्रकल्पास द्वितीय क्रमांक, तर तृतीय क्रमांक कु.लक्ष्मी सपकाळ हिच्या 'उच्चशिक्षित विवाहितातील वाढता घटस्फोटाचा कल : एक अभ्यास संशोधन प्रकल्पास मिळाला. यशस्वी स्पर्धकांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ.पी पी लोहार (एल. बी. एस. कॉलेज सातारा) अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजाराम कांबळे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. संदीप लोखंडे , राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. नागनाथ चोबे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अविष्कार संशोधन स्पर्धा प्रमुख डॉ. अजितकुमार जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.जयमाला उथळे यांनी केले. तर आभार डॉ.नागनाथ चोबे यांनी मानले. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी - विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

Satara Edition_5 Oct 2024_011
05 Oct 2024

# नागठाणे महाविद्यालयाने सज्जनगडावर राबवले स्वच्छता अभियान

**विद्यार्थ्यांनी स्वच्छतेतून दिला गड किल्ले संवर्धनाचा संदेश**




सज्जनगड : स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले नागठाणे कॉलेजचे विद्यार्थी.

ठोसेघर, दि. ४ (प्रतिनिधी) - आपल्या गड किल्ल्यांचे संवर्धन स्वच्छता ही आपणच केली पाहिजे कोणत्याही गडावर सार्वजनिक ठिकाणी गेल्यावर कचरा न करता स्वच्छता ठेवली पाहिजे हा संदेश उजवण्यासाठी नागठाणे येथील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र सरकारमार्फत आयोजित 'माय भारत स्वच्छता ही सेवा' ही सेवा या अभियानांतर्गत सज्जनगड येथे स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्त अभियान राबविले.

हे अभियान केंद्र सरकारने १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये राबविण्यात येत आहे. शिबिराच्या प्रारंभी सातारा जिल्हा युवा अधिकारी स्वप्निल देशमुख यांनी शिबिरास शुभेच्छा संदेश दिला. सज्जनगडावरील वाहनतळ बस स्थानक किल्ले सज्जनगड महाद्वार मार्गावरील पायऱ्या अंगलाई देवी मंदिर या पायऱ्या आणि गडावरील सर्व परिसरामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता करून प्लास्टिक तसेच प्लास्टिकच्या पाणी बॉटलचे संकलन केले. यापूर्वी 'माय भारत स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत महाविद्यालयामध्ये तसेच सामाजिक स्तरावर स्वच्छतेवरती व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, स्मशानभूमी स्वच्छता हे उपक्रम देखील राबविले आहेत. कुलकर्णी गुरुजींनी सज्जनगडाचे ऐतिहासिक महत्त्व आणि इतिहास सांगितला. प्रभारी प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी शिबिरार्थींनी केलेल्या कामाचे कौतुक करून गड किल्ले आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी तरुणांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले.

शिबिरासाठी श्री रामदास स्वामी संस्थान आणि परळी ग्रामपंचायत यांचे सहकार्य लाभले. शिबिराचे नियोजन कार्यक्रम अधिकारी डॉ संदीप लोखंडे व डॉ सुनील पवार, एन. सी. सी. ऑफिसर डॉ. गणेश गभाले, प्रा. जयमाला उथळे, प्रा. शीतल सालवाडगी, प्रा. संतोष सोंडगे, प्रा. भालचंद्र बिचितकर आणि संतोष पवार यांनी केले. शिबिरामध्ये १०२ विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

प्रीतिसंगम

# अविष्कार संशोधन स्पर्धेतून विद्यार्थ्यांची जिज्ञासा वृत्ती वाढेल

## प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार




**नागठाणे/प्रतिनिधी:** विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्ती वाढीस लागावी, त्यांच्यामध्ये कौशल्य आणि कल्पकता निर्माण व्हावी, यासाठी विद्यापीठामध्ये अविष्कार संशोधन स्पर्धा घेतल्या जातात. या स्पर्धेसाठी विद्यार्थी तयार व्हावेत हे उद्दिष्ट समोर ठेवून महाविद्यालय स्तरावर अशी स्पर्धा आयोजित करणे हे कौतुकास्पद आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन संशोधक विद्यार्थी नवनवीन विषयावर अभ्यासपूर्ण संशोधन करून सादरीकरण करतात. त्यातून त्यांच्यात सृजनशीलता वाढते आणि त्यांना समाजाच्या अनेक समस्यांवर उत्तरे शोधण्याची सवय लागते. त्याचबरोबर जिज्ञासा वाढून संशोधन वृत्तीला चालना मिळते असे उदगार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित, विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूरचे प्राचार्य. डॉ.आर.आर.कुंभार यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या अविष्कार संशोधन स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी ते प्रमुख उदघाटक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते.

प्राचार्य डॉ.आर.आर. कुंभार आपल्या भाषणात पुढे म्हणाले, आविष्कार स्पर्धेमध्ये सहभागी झालेले संशोधक विद्यार्थी व परीक्षक यांच्याशी स्पर्धेदरम्यान होणारा संवाद तसेच तज्ज्ञांचे होणारे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांच्या संशोधन विचार क्षमतेमध्ये सखोलता निर्माण होते. म्हणून विद्यार्थ्यांनी सूचनांचे लक्ष पूर्ण आकलन करावे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ.महेश गायकवाड आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास अविष्कार संशोधन स्पर्धा उपयुक्त ठरते. विद्यार्थ्यांना त्यांच्या मनातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक विचार व्यवहारतेच्या पातळीवर तपासून पाहण्याची संधी आविष्कारमुळे निर्माण झालेल्या व्यासपीठामुळे मिळाली. त्याचा उपयोग करून आत्मविश्वासाने सादरीकरण करावे.

महाविद्यालयीन स्तरावरील अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये १४ विद्यार्थ्यांनी विविध विषयावर अभ्यासपूर्ण संशोधन करून सादरीकरण केले. कु. साक्षी कदम हिच्या ग्रामपंचायत मधील महिलांचे आरक्षण आणि महिलांचे राजकीय सक्षमीकरण: एक मूल्यमापन या संशोधन प्रकल्पास प्रथम क्रमांक प्राप्त झाला. कु प्रतिक्षा देशमुख हिच्या Temple Flower Waste Management and Reuse या संशोधन प्रकल्पास द्वितीय क्रमांक, तर तृतीय क्रमांक कु.लक्ष्मी सपकाळ हिच्या उच्चशिक्षित विवाहितातील वाढता घटस्फोटाचा कल: एक अभ्यास संशोधन प्रकल्पास मिळाला. यशस्वी स्पर्धकांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ.पी पी लोहार (एल. बी. एस. कॉलेज सातारा) अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजाराम कांबळे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. संदीप लोखंडे, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. नागनाथ चोबे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अविष्कार संशोधन स्पर्धा प्रमुख डॉ. अजितकुमार जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.जयमाला उथळे यांनी केले. तर आभार डॉ.नागनाथ चोबे यांनी मानले. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी -विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.


Powered by softisky | 9764331134

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# नागठाणे महाविद्यालय पॉझिटिव्ह एकांकिकेचा युवा महोत्सवात डंका

**❋ महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**नागठाणे, दि. २८ सप्टेंबर:** कोरेगाव डी.पी.भोसले महाविद्यालय येथे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर ४४ सातारा जिल्हा स्तरीय युवा मोहत्सव मोठ्या आनंदात मोठ्या संख्येने नुकताच संपन झाला या जिल्हा स्तरीय मोहत्स्वात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाने या महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील कलाकारांनी (जय लोरे,संध्या पवार, राजेश्वरी पवार, साहिल मोरे, अश्विनी लोखंडे, दीक्षा कुंभार, आशिष गायकवाड, प्रथमेश शेलार, शिवानी पवार, हर्षल कांबळे, धनश्री डफळे, सादिक मुलानी, प्रीती मोहिते, ऋतुजा पवार,)सादर केलेल्या पॉझिटिव्ह या एकांकिकेने प्रथम क्रमांकाची बाजी मारत या युवा मोहत्स्वामध्ये आपला डंका पिठवला.



युवा मोहत्सव म्हणजेच तरुणाईच्या उत्सवाला उधाण आणणारी स्पर्धा. या मोहत्सवात विविध कला प्रकारामध्ये कलाकार आपली कला सादर करत असतात. यातीलच युवा पिढीची नाट्य विषयातील रुची आणी गती वाढवत समाजातील दुःख आणी वेदना एकांकिकेच्या माध्यमातून मांडणारे मराठी नाटकांना उभारी देणारा एक सहज आणि सशक्त एक कलाप्रकार म्हणजे एकांकिका. यामध्ये ग्रामीण भागातील कलाकारांना अभिनयाची आवड निर्माण करून देणारे कोरी पाटीचे दिग्दर्शक नितीन पवार यांनी गेली सलग तीन वर्ष या युवा महोत्सवात फराळ,शहीद आणी आता पॉझिटिव्ह या दर्जेदार एकांकिकाचे सादरीकरण करून आपल्या कलेने प्रेक्षकांना भुरळ घातली.यावर्षी मोहत्सवात पॉझिटिव्ह या दर्जेदार एकांकिकेने युवा मोहत्सवात कमालीचे यश संपादन केले आहे. त्याचबरोबर या जिल्हास्तरीय युवा मोहत्सवात एक लोकवाद्य वादन कलाप्रकारात सौरभ चौगुले याचा दुतीय क्रमांक आला आहे तसेच भारतीय समूहगीत आणी सुगम गायन कला प्रकारात ही उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवून या महाविद्यालयाने पुन्हा एकदा शिवाजी विद्यापीठात आपला डंका पिठला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील महाविद्यालयाच्या या यशाबदल सर्व कलाकारांचे तसेच दिग्दर्शक नितीन पवार,संगीत दिग्दर्शक दिपक सपकाळ, सहायक वादक,सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा.संतोष निलाखे व सर्व सदस्य यांचे मनःपूर्वक अभिनंदन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे,संस्था सचिव प्राचार्या शुभांगीताई गावडे,संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे,विभाग प्रमुख प्राचर्य डॉ.राजेंद्र शेजवळ यांनी अभिनंदन केले असून त्यांनी पुढील होणाऱ्या आजरा येथे होणाऱ्या आजरा महाविद्यालयात होणाऱ्या मधवर्ती युवा महोत्सवाच्या निमित्ताने त्यांना साधरीकरनासाठी हार्दीक शुभेच्छा दिल्या.

# नागठाणे महाविद्यालयाचा 'पॉझिटिव्ह' एकांकिकेचा युवा महोत्सवात डंका

***नागठाणे/प्रतिनिधी:***

डी.पी भोसले महाविद्यालय कोरेगाव येथे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४४ सातारा जिल्हा स्तरीय युवा महोत्सव नुकताच संपन्न झाला. यामध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील कलाकारांनी सादर केलेल्या पॉझिटिव्ह या एकांकिकेने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावून युवा महोत्सवामध्ये आपला डंका पिटवला.

युवा महोत्सव म्हणजे तरुणाईच्या उत्साहाला उधाण आणणारी स्पर्धा.या महोत्सवात विविध कला प्रकारामध्ये कलाकार आपली कला सादर करत असतात.

यातीलच मराठी नाटकांना उभारी देणारा एक सहज आणि सशक्त एक कलाप्रकार म्हणजे एकांकिका. युवा पिढीची नाट्य विषयातील रुची आणि गती वाढवत समाजातील दुःख आणि वेदना एकांकिकेच्या माध्यमातून मांडणारे आणि ग्रामीण भागातील कलाकारांना अभिनयाची आवड निर्माण करून देणारे कोरी पाटीचे दिग्दर्शक नितीन पवार यांनी गेली सलग तीन वर्ष या युवा महोत्सवात फराळ, शहीद आणि आता पॉझिटिव्ह या दर्जेदार एकांकिकांचे सादरीकरण करून प्रेक्षकांना भुरळ पाडली. यावर्षी पॉझिटिव्ह या एकांकिकेने युवा महोत्सवात कमालीचे यश प्राप्त केले आहे.



त्याचबरोबर या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात एकल लोकवाद्य वादन कलाप्रकारात सौरव चौगुले याचा द्वितीय क्रमांक आला आहे. तसेच भारतीय समूहगीत आणि सुगम गायन कला प्रकारातही उत्तेजनार्थ पारितोषिक मिळून या महाविद्यालयाने पुन्हा एकदा शिवाजी विद्यापीठात आपला डंका पिटला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व कलाकारांचे तसेच दिग्दर्शक नितीन पवार, संगीत दिग्दर्शक दीपक सपकाळ, सहाय्यक वादक, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा.संतोष निलाखे व सर्व सदस्य यांचे अभिनंदन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या सौ.शुभांगीताई गावडे , संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विभाग प्रमुख प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ यांनी अभिनंदन केले व आजरा महाविद्यालय आजरा येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या सादरीकरणासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

तेजस्वी

त साजरा



# अभिनय प्रशिक्षण कार्यशाळेतून कलाकार घडतात

## प्राचार्य डॉ. शेजवळ




**नागठाणे/प्रतिनिधी:**
कला ही लोकांच्या भावना, विचार आणि अनुभव कथन करते. ती मानवी जीवनाला आकार देते. कलेमुळे माणसाला संकट समयी उभारी मिळते. म्हणून विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्त कलागुण ओळखून कोणताही न्यूनगंड न बाळगता कला आत्मसात करून महाविद्यालयीन जीवनात मिळालेल्या संधीचे सोने केले पाहिजे. अशा अभिनय प्रशिक्षण कार्यशाळेतून प्रशिक्षकांनी कलेविषयी केलेल्या मार्गदर्शनामुळेच कलाकार घडत असतात. असे उदगार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी प्रशासन सहसचिव व विभाग प्रमुख प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी काढले.

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे आणि कोरी पाटी प्रोडक्शन, तारळे यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय एक दिवसीय अभिनय व संगीत प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

ते आपल्या भाषणात पुढे म्हणाले, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त या स्तुत्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. संस्थामातांनी डॉ. बापूजींच्याशैक्षणिक कार्याला व संस्था उभारणीला आयुष्यभर साथ सोबत केली. संस्थेतील शिक्षण घेणाऱ्या मुलांची दिनदुबळ्यांची सावली म्हणून काम केले. त्या साक्षात त्याग मुर्ती आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड म्हणाले की, गुरुशिवाय कला प्राप्त होऊ शकत नाही. विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्त गुण ओळखून कला आत्मसात करावी. कलेत पारंगत होण्यासाठी निरीक्षण व सराव यासारखी कौशल्य विद्यार्थ्यांनी विकसित करावीत.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात कोरी पाटी प्रोडक्शन चे संस्थापक नितीन पवार यांनी अभिनय प्रशिक्षण -नाट्य वेबसिरीज, एकांकिका या विषयावर मार्गदर्शन केले.दुस-या सत्रात मदन कदम सर यांनी संगीत प्रशिक्षणातून समूहगीत, समूहगायन या विषयावर मार्गदर्शन केले.तर तिसऱ्या सत्रात पळशीची पी टी चित्रपटाचे दिग्दर्शक धोंडिबा कारंडे यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी डॉ.प्रकाश अहिवळे, डॉ. रमजान मुजावर,डॉ.शीतल गायकवाड या प्राध्यापकांनी तर प्रशिक्षक विद्यार्थी कलाकारांनी ही आपली मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा.संतोष निलाखे यांनी केले. आभार सहसमन्वयक प्रा.जयमाला उथळे यांनी मानले.तर सूत्रसंचालन समन्वयक डॉ. राजाराम कांबळे यांनी केले. या कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातून विद्यार्थी सहभागी झाले होते.

# शिक्षक विद्यार्थ्यांचे चारित्र्य व भविष्य घडवितात:प्रा.कोरे




**नागठाणे/प्रतिनिधी:**
शिक्षक हा समाजाचा कणा आहे. स्वतःच्या मुलाप्रमाणेच विद्यार्थ्यांना अतिशय काळजीपूर्वक आणि मनापासून शिक्षक शिकवतात. आई-वडिलां इतकेच शिक्षक महान असतात. पालक मुलांना जन्म देतात तर विद्यार्थ्यांचे चारित्र्य आणि भविष्य घडवण्याचे काम शिक्षक करतात असे उदगार प्रमुख मार्गदर्शक प्रा. बळवंत कोरे यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्यावतीने भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून महाविद्यालयात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानपर कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

प्रा. बळवंत कोरे सर आपल्या भाषणात पुढे म्हणाले, भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन हे एक आदर्श शिक्षक होते. एक शिक्षक ते देशाच्या सर्वोच्च राष्ट्रपती पदापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. समाजाचा आणि देशाचा विकास हा केवळ शिक्षक देत असलेल्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. म्हणून शिक्षक हे केवळ पुस्तकी ज्ञान शिकवत नाहीत तर विद्यार्थ्यांना जगण्याची कला शिकवत असतात.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, समाजात आपणास कसं चांगलं वागावं हे ज्यांनी सांगितले ते सर्वच आपले गुरु आहेत.आई आपल्या आयुष्यातील पहिला शिक्षक आहे. समाजात बौद्धिक आणि नैतिक मुल्ये रुजवण्याचे काम शिक्षक करतात म्हणून शिक्षकाबद्दल नम्रता आणि आदर बाळगला पाहिजे.

या कार्यक्रमात विद्यार्थी शिक्षक झालेल्या कु. प्रतीक्षा कदम , कु. अक्षदा जाधव, कु. अर्चना जाधव, कु. सोनम शिंदे व कु. साक्षी मोरे यांनी मनोगत व्यक्त केली. तर प्रा.संतोष निलाखे डॉ. राजाराम कांबळे प्रा जयमाला उथळे, प्रा. प्रतीक्षा कदम या गुरुदेव कार्यकर्त्यांनी आपली मनोगते व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत कु. राधिका पवार हिने केले. सूत्रसंचालन कु तन्वी जाधव हिने केले. तर आभार कु. शिवांजली चव्हाण यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# नागठाणे महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा



# तरुण भारत

## सांस्कृतिक विभाग विद्यार्थ्यांच्या विकासाचे व्यासपीठ : प्रा. साठे

वार्ताहर
देशमुखनगर

मानवी व्यक्तिमत्वाचा विकास हा बहुआयामी असतो. विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व केवळ शैक्षणिक क्रियाकलापासूनच साध्य होत नाही तर संपूर्ण व्यक्तिमत्व प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांच्यात असलेल्या सुप्त कलागुणांना वाव द्यावा लागतो. सांस्कृतिक विभाग हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे व्यासपीठ असल्याचे आमदार शशीकांत शिंदे महाविद्यालय, मेढा येथील मराठी विभागप्रमुख प्रा. आनंद साठे यांनी सांगितले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

### समाजाशी नाळ घट्ट

महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड म्हणाले, कला माणसाला माणूस बनवते. माणसाला संवेदनशील तसेच भावूक बनवण्याचेही काम कला करते. कलाकार समाजातील समस्यांशी एकरूप होतो तो दुसऱ्यांचे दुःख आणि समस्या लवकर जाणून घेतो. समाजाशी त्याची नाळ घट्ट बांधलेली असते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते.

प्रा. आनंद साठे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, कला माणसाला जगायला शिकवते. विद्यार्थ्यांनी पथनाट्य, एकांकिका, कविता लघुनाटिका, मूकनाट्य, गायन या सारख्या विविध कला प्रकारात सहभागी व्हावे आणि नैतिक मूल्यांची जोपासनी करत कलेची सेवा करावी.



नागठाणे : मार्गदर्शन करताना प्रा. आनंद साठे.

प्रा. आनंद साठे यांनी विविध कलाविष्कार अभिनयातून सादर करून मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संतोष निलाखे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. संजय बागल यांनी केला. आभार डॉ. राजाराम कांबळे याने मांडले. सूत्रसंचालन प्रा. जयमाला उथळे यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य समाजशास्त्र विभाग, विवेक वाहिनी विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नशाबंदी विषयावर पोस्टर प्रदर्शन पार पडले.

# नागठाणे महाविद्यालयामध्ये 'इंग्रजी संभाषण कौशल्य' विषयावर कार्यशाळा संपन्न

**नागठाणे/प्रतिनिधी:-**

नागठाणे येथील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये इंग्रजी विभागाच्या वतीने 'इंग्रजी संभाषण कौशल्य' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे सातारा येथील शिवाजी कॉलेजमधील इंग्रजी विषयाचे प्रा. डॉ. राजेंद्र तांबिले होते.याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, इंग्रजी बोलण्यासाठी आवश्यक असणारी वाचन,श्रवण,संभाषण आणि लेखन ही कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे.इंग्रजी भाषेची भीती न बाळगता आत्मविश्वासाने संभाषण करणे गरजेचे आहे. तसेच




इंग्रजी संभाषण कौशल्य आत्मसात करण्यासाठी इंग्लिश न्यूज, इंग्रजी वर्तमानपत्रे, मूव्हीज, पुस्तके यांचे वाचन करणे आवश्यक आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. अभय जायभाये म्हणाले की, आजच्या काळात इंग्रजी भाषेचे महत्त्व आहे.इंग्रजी भाषेच्या माध्यमातून आपण आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्ञान प्राप्त करू शकतो.कार्यक्रमाच्या संयोजनासाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांचे प्रोत्साहन लाभले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन सादिक मुलाणी याने,पाहुण्यांचा परिचय किरण साळुंखे हिने तर आभार प्रदर्शन कु.रेणुका जाधव ने मानले . कार्यशाळेचे आयोजन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.सुरेश पाटील,प्रा.एम.बी.सुतार, प्रा.अशोक गाडेकर, प्रा.शैला चोबे यांनी केले. सदर कार्यशाळेस कॉलेजमधील प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# भाषिक सामर्थ्य मनुष्याला समृद्ध बनवते:प्रो.डॉ.सोनटक्के

**नागठाणे/प्रतिनिधी:**

'भाषिक सामर्थ्य मनुष्याला समृद्ध बनवते' असे प्रतिपादन प्रो. (डॉ.) देवानंद सोनटक्के यांनी नागठाणे येथील आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी केले. ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, ज्यांच्याकडे शब्दसंपदा असते ते आपला अनुभव तितक्याच ताकतीने व्यक्त करू शकतात. शब्द नष्ट झाले की संस्कृती नष्ट होण्यास सुरुवात होते. समाजामध्ये भाषेचे महत्त्वाचे स्थान आहे. भाषिक समृद्धी लाभण्यासाठी शब्दसंपदा वाढविणे गरजेचे आहे आणि ती वाचनातून वाढते.आजच्या युवकांनी मोबाईलच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त होऊन वाचन, चिंतन, लेखन यांकडे लक्ष देऊन आपला व्यक्तिमत्व विकास करणे गरजेचे आहे.



विद्यार्थ्यांनी आपली भाषिक समृद्धी केल्यामुळे त्यांच्या ज्ञानकक्षा रुंदावतात. भाषेचा अनुभव हा विद्यार्थ्यांना संवेदनशील, सर्जनशील बनवितो. याप्रसंगी त्यांनी ज्ञानेश्वरांचे अभंग, विंदा करंदीकर गुलजार यांच्या कवितांची उदाहरणे दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड म्हणाले की, ज्ञान हीच शक्ती आहे. आणि हे ज्ञान भाषेतून येते त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचन, श्रवण, चिंतन याद्वारे आपले शब्दसामर्थ्य वाढवावे. ज्या व्यक्तीमध्ये शब्दांची, भाषेशी खेळण्याचे कौशल्य निर्माण होते ते सर्जनशील लेखन करू शकतात. त्यामुळे तरुणांनी भाषिकदृष्ट्या समृद्ध असणे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांचे भाषेवर प्रभुत्व असेल तर विद्यार्थी आपल्या क्षेत्रात नेतृत्व, वक्तृत्व आणि कर्तृत्व गाजवू शकतात.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते मराठी विभागाच्या वतीने विंदा करंदीकर यांच्या जयंतीनिमित्त 'स्वरचित पाऊस व निसर्ग कविता' या भित्तीपत्रिका चे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाङ्मय मंडळाचे प्रमुख प्रा. शौकत आतार यांनी केले. आभार इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. सुरेश पाटील यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. स्मिता कालभूषण यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन मराठी, हिंदी व इंग्रजी विभागातर्फे करण्यात आले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
Satara Edition_24 Aug New_009
24 Aug 2024

# पोलिसांच्या हाती बांधले राखीचे बंधन

**नागठाणे, दि. २३ (प्रतिनिधी)** - येथील आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थिनींनी बोरगाव पोलीस ठाण्यात पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना राखी बांधून बहीण-भावाच्या प्रेमाचा बंध बळकट केला.

विद्यार्थीनींनी सण, उत्सवात देखील घरदार सोडून निष्ठेने कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांना राखी बांधत बहीण-भावाच्या प्रेमाचा बंध अधिक बळकट केला.

पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे औक्षण करीत राख्या बांधताना पोलीस अधिकारी-कर्मचारी भारावून गेले होते. ओवाळणी म्हणून त्यांच्या रक्षणाची सर्वतोपरी जबाबदारी घेत



**बोरगाव :** सपोनि रवींद्र तेलतुंबडे व पोलीस कर्मचाऱ्यांना राख्या बांधताना विद्यार्थिनी. (छाया : विजय घोरपडे)

असल्याचे सपोनि रविंद्र तेलतुंबडे यांच्यासह अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आश्वासित केले.

यावेळी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी संचालक प्रा. अभय जायभाये यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप लोखंडे, डॉ. सुनील पवार, प्रा. जयमाला उथळे, प्रा. शीतल सालवडगी, प्रा. भालचंद्र बिचीतकर यांनी केले.

तरुण भारत

गुरुवार, १५ ऑगस्ट २०२४

# स्वातंत्र्यलढ्यात जिल्ह्याचे योगदान अनन्यसाधारण–डॉ. दीपक जाधव



नागठाणे : आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेजमध्ये व्याख्यानात बोलताना डॉ. दीपक जाधव. समवेत इतर.

वार्ताहर
देशमुखनगर

सातारा हा क्रांतिकारकांचा जिल्हा म्हणून संपूर्ण भारतात ओळखला जातो. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाने साताऱ्यातील स्वातंत्र्य चळवळीला चांगलेच बळ मिळाले. काही जणांनी सशक्त क्रांतीच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळावे यासाठी प्रयत्न केले तर काहींनी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सातारा जिल्ह्याचे योगदान महत्वपूर्ण आहे, असे उद्गार प्रा. डॉ दीपक जाधव यांनी काढले.

नागठाणे (ता.सातारा) येथील आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे इतिहास विभाग व सातारा इतिहास संशोधन मंडळ सामंजस्य करारांतर्गत ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात 'भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सातारा जिल्ह्याचे योगदान' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन महेश गायकवाड हे होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयातील इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी स्थानिक इतिहासावर आधारित संशोधन प्रकल्पाचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. अजितकुमार जाधव यांनी प्रास्ताविक केले पाहुण्यांची ओळख अंजली जाधव हिने करून दिली. प्रा. शीतल सालवाडगी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुनील पवार यांनी आभार मानले.

# बहुजनांचा शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे:डॉ जाधव

**नागठाणे/प्रतिनिधी:**

दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा यात पिचत पडलेल्या दुःखी, दीन, दलित आणि बहुजन समाजाचा उद्धार करावयाचा असेल तर शिक्षणासारखे दुसरे प्रभावी साधन नाही हे ओळखून बापूजींनी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार या त्रिसूत्रीवर आधारित सत्य, चारित्र्य, प्रामाणिकपणा, त्याग व सेवा या खडतर तत्वांचा अंगीकार करून श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था सुरू केली. आणि शिक्षणासाठी तहानलेल्या, भुकेल्यांसाठी, दीन-दलितांसाठी

त्यांच्या झोपडीपर्यंत शिक्षणाची प्रकाशवाट खुली केली. बहुजनातील हजारो गुरुदेव कार्यकर्त्यांची कुटुंबे उभी राहिली. लाखो मुले शिकली. त्यामुळेच डॉ. बापुजी




खऱ्या अर्थाने बहुजनांचे शिक्षणमहर्षी आहेत. असे उदगार इतिहास विभागप्रमुख डॉ. अजितकुमार जाधव यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ८ ऑगस्ट स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानपर कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ.अजितकुमार जाधव आपल्या भाषणात पुढे म्हणाले, बापूजींच्या विचारांचे आचारात रूपांतर करीत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या ४०६ शाळा, महाविद्यालये आज सात दशकांनंतरही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. बापूजी स्वतः चंदनासारखे झिजले आणि बहूजन समाजास शिक्षणरूपी प्रकाश दिला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. अभय जायभाये आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, डॉ. बापूजींनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अविरत कष्ट आणि शतकानुशतके दारिद्र्यात गांजलेल्या, अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या असंख्य पददलितांना, बहुजनांना शिक्षण देऊन सुजाण नागरिक बनवण्याचे व माणसातील माणूस जागा करण्याचे कार्य केले.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. प्रतीक्षा कदम व कु. सानिका चव्हाण यांनी बापूजींच्या कार्याविषयी मनोगतं व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. संतोष निलाखे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजाराम कांबळे यांनी केले तर आभार प्रा. संजय बागल यांनी मानले. त्यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व प्राध्यापक बंधू भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# क्रांतिकारी योद्धा क्रांतिसिंह नाना पाटील

## डॉ.अजितकुमार जाधव

**नागठाणे/प्रतिनिधी:**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. तलाठी पदाची नोकरी झुगारून देऊन त्यांनी १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनात उडी घेऊन इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. चले जाव आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. जुलमी इंग्रजांचे राज्य नष्ट व्हावे आणि जनतेला पूर्ण स्वातंत्र्य मिळावे, यासाठी भूमिगत राहून स्वातंत्र्याचे आंदोलन छेडले. ते क्रांतिकारी योद्धा होते. असे उदगार डॉ. अजितकुमार जाधव यांनी काढले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात सांस्कृतिक व इतिहास विभागाच्या संयुक्तविद्यमाने क्रांतिसिंह नाना



पाटील याची १२५ जयंती साजरी करण्यात आली. या जयंतीपर कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ.अजितकुमार जाधव आपल्या भाषणात पुढे म्हणाले, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान ही फार मोठे आहे. त्यांच्यावर महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, यांच्या पुरोगामी विचारांचा प्रभाव होता. हुंडाबंदी, बिनखर्चाचे गांधी विवाह करणे, संपूर्ण दारूबंदी, गुन्हेगारांना शिक्षा, असे कार्य त्यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, क्रांतिसिंह नाना पाटील हे धुरंदर, लढवय्ये, स्वाभिमानी आणि प्रामाणिक नेते होते. ते दोन वेळा खासदार झाले. जनमाणसाच्या हक्क व अधिकारांसाठी संसदेत मराठी भाषेतून आवाज उठवणारा महाराष्ट्रातील पहिला खासदार म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. राजाराम कांबळे यांनी केले. आभार प्रा. संतोष निलाखे यांनी मानले. त्यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.

# शाश्वत विकासासाठी लोकसंख्या नियंत्रण आवश्यक

## डॉ.प्रविण जाधव

**नागठाणे/प्रतिनिधी:** शाश्वत विकास हा आर्थिक विकास आणि मानवी विकासामधील एक दुवा आहे. शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढ्या त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतीशी तडजोड न करता वर्तमानात गरजा पूर्ण करणारा विकास होय. मात्र आज पृथ्वीतलावर लोकसंख्येचा प्रचंड विस्फोट झाला आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी बारेमाप उत्पादन होऊ लागल्याने मर्यादित संसाधनावर अतिरिक्त ताण पडत आहे. त्यातून पर्यावरणाचा ऱ्हास होऊ अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे पुढच्या पिढीला गंभीर परिणाम भोगावे लागतील. म्हणून शाश्वत विकासासाठी अतिरिक्त वाढणारी लोकसंख्या नियंत्रणात आणणे आवश्यक आहे असे उदगार आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे येथे जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त बोलताना डॉ. प्रविण जाधव यांनी काढले.

महाविद्यालयातील अर्थशास्त्र व समाजशास्त्र विभागाच्या वतीने ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून व्याख्यानपर कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून 'लोकसंख्या वाढ आणि शाश्वत विकास' या विषयावर लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख डॉ. प्रवीण जाधव बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य कॅप्टन डॉ.महेश गायकवाड हे होते.

डॉ.प्रविण जाधव आपल्या भाषणात पुढे म्हणाले, पृथ्वीतलावर उत्तर गोलार्धात ९० टक्के लोकसंख्या वास्तव्य करत आहे. तर दक्षिण गोलार्धात फक्त १० टक्के लोकसंख्या वास्तव्य करीत आहे. १९८७ ला जगाची लोकसंख्या ५०० कोटी होती आज ती ८०० कोटीच्या पुढे आहे.



कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, लोकांना पृथ्वीतलावर चांगले राहता येईल इतकी लोकसंख्या असणे आवश्यक आहे. शाश्वत विकासातून लोकांना आनंददायी जीवन जगता आलं पाहिजे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. राजाराम कांबळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. रणधीर शिलेवंत यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. जयमाला उथळे यांनी केले. तर आभार प्रा. रघुनाथ संकपाळ यांनी मानले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून अर्थशास्त्र विभागाच्यावतीने 'पर्यावरणावर वाढत्या लोकसंख्येचा प्रभाव ' या आशयाचे भितीपत्रक प्रकाशित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. अभय जायभाये तसेच सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक बंधूभगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

दै. प्रीतिसंगम

तरूण भारत

# लोकसंख्या नियंत्रण आवश्यक-डॉ. जाधव

वार्ताहर
देशमुखनगर

शाश्वत विकास हा आर्थिक विकास आणि मानवी विकासामधील एक दुवा आहे. शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढ्या त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतीशी तडजोड न करता वर्तमानात गरजा पूर्ण करणारा विकास होय. मात्र आज पृथ्वीतलावर लोकसंख्येचा प्रचंड विस्फोट झाला आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी वारेमाप उत्पादन होऊ लागल्याने मर्यादित संसाधनावर अतिरिक्त ताण पडत आहे. शाश्वत विकासासाठी अतिरिक्त वाढणारी लोकसंख्या नियंत्रणात आणणे आवश्यक आहे, असे उदगार डॉ. प्रविण जाधव यांनी काढले.

नागठाणे (ता. सातारा) येथील आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते.




नागठाणे : जागतिक लोकसंख्या दिन कार्यक्रमात बोलताना प्रा. डॉ. प्रवीण जाधव, समवेत इतर.

डॉ. प्रवीण जाधव पुढे म्हणाले, पृथ्वीतलावर उत्तर गोलार्धात ९० टक्के लोकसंख्या वास्तव्य करत आहे. तर दक्षिण गोलार्धात फक्त १० टक्के लोकसंख्या वास्तव्य करीत आहे. १९८७ ला जगाची लोकसंख्या ५०० कोटी होती, आज ती ८०० कोटीच्या पुढे आहे. झपाट्याने वाढणारी लोकसंख्या जगाचा चिंतेचा विषय बनली आहे. आशिया खंडातील भारताने लोकसंख्येत चीनला पाठीमागे टाकले आहे.

डॉ. राजाराम कांबळे यांनी स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. रणधीर शिलेवंत यांनी केला. प्रा. जयमाला उथळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रघुनाथ संकपाळ यांनी आभार मानले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# महामार्गाचे काम विद्यार्थ्यांनी बंद पाडले

## पर्यायी मार्गाची व्यवस्था करण्याची मागणी

**नागठाणे : पुढारी वृत्तसेवा**

नागठाणे गावच्या हद्दीत पुणे-बेंगळूर राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाचे काम सुरू आहे. हे काम करत असताना पर्यायी मार्ग करणे आवश्यक आहे. मात्र, डी. पी. जैन कंपनीच्या ठेकेदाराने पर्यायी मार्ग न केल्याने विद्यार्थ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या निषेधार्थ ठेकेदाराच्या विरोधात विद्यार्थी व शिक्षकांनी सोमवारी महामार्गाचे काम बंद पाडले.

नागठाणे हद्दीत सहापदरीकरणाचे काम डी. पी. जैन या ठेकेदाराकडून काम सुरू आहे. ज्या ठिकाणी हे काम आहे त्यालगतच श्री रामकृष्ण विद्यामंदिर आहे. महामार्गाचे काम सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या जाण्या-येण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेतील विद्यार्थी येण्या जाण्यासाठी बोगद्याचा वापर करत होते. मात्र, त्या ठिकाणी आता दोन्ही बाजूने पान २ वर

### पोलिसांच्या उपस्थितीत बैठक

महामार्गाचे काम बंद पाडल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शिक्षक व अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. त्यामुळे पोलिसांना पाचारण करावे लागले. यानंतर पोलिस, शिक्षक व अधिकाऱ्यांमध्ये चर्चा झाली. यावर लवकरात लवकर कार्यवाही करण्याच्या सूचना पोलिसांनी अधिकाऱ्यांना केल्या.



# अर्थशास्त्री डॉ.आंबेडकरांच्या 'दी प्रॉब्लेम ऑ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये डी एस्सी च्या अत्युच्च पदवीसाठी लिहिलेल्या द प्रॉब्लेम ऑफ रूपी इटस ओरिजिन ॲण्ड इटस सोल्युशन हा प्रबंध प्रा. एडविन कॅनन यांच्या अनुमतीने लंडन विद्यापीठास सादर केला. ब्रिटिश राजवटीत अर्थशास्त्रात डी एस्सी हे सर्वोच्च पदवी मिळणारे बाबासाहेब भारतीय उपखंडात एकमेव होते. ज्यावेळी बाबासाहेबांना ही डिग्री मिळाली त्यावेळी त्यांचे वय अवघे ३२ वर्ष होते. भारतीय चलनाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मिमांसा करून भारतासाठी आदर्श चलनपध्दतीवर डॉ.बाबासाहेबांनी प्रकाश टाकला. हा प्रबंध ग्रंथ रूपाने सन १९२३ मध्ये प्रकाशित होवून १०० वर्ष पुर्ण झाली. भारतासह जगात अनेक ठिकाणी या ग्रंथाचा शताब्दी वर्ष सोहळा संपन्न होत आहे. या पुस्तकावर चर्चासत्र, परिसंवाद मेळावे घेवून डॉ. बाबासाहेबांनी या ग्रंथात मांडलेला विचार समजून घेत वर्तमानात निर्माण होणा-या आर्थिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

कायदेतज्ज्ञ बाबासाहेबांची 'घटनाकार' म्हणून असलेली ओळख सर्वदूर आहे. त्यांनी भारतीय समाजात शतकानुशतकांच्या जातीच्या उतरंडीवर पिचून सगळ्यात शेवटी उभ्या असलेल्या दलित समुदायामध्ये पेटवलेली चेतना आणि एकहाती घडवून आणलेली क्रांती त्यांना 'महामानव' पदापर्यंत घेऊन जाते. त्यांचं व्यक्तिमत्त्व सर्वव्यापी आहे. धर्म, मानववंशशास्त्र, सामाजिक शास्त्रं, राज्यशास्त्र, एक ना अनेक, असे कोणतेही विषय त्यांच्या प्रज्ञेच्या कक्षेतून सुटले नाहीत. पण त्यांच्या उपलब्ध सर्व लेखनातून, भाषणांतून, इतर साहित्यातून एक गोष्ट प्रकर्षानं जाणवते. ती म्हणजे, त्यांच्या बुध्दीच्या आणी हृदयाच्या सर्वात जवळ असणारा विषय होता अर्थशास्त्र. डॉ आंबेडकरांनी भारतीय राजकारणात नवा प्रवाह आणला जो जातींच्या प्रभावामुळे हजारो वर्ष लुप्त होता. पण ते त्यांचं ऐतिहासिक कार्य लक्षात घेता हे दिसतं की त्यांच्या मनाची मूळ वीण ही अर्थशास्त्राची होती. भारत आणि त्याच्या इतिहास-वर्तमान-भविष्य यांच्याभोवती फिरणारा त्यांचा अर्थविचार हा विद्यार्थीदशेपासून दिसतो.

अर्थशास्त्र या विषयातील जगातील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या डॉक्टर ऑफ सायन्स (डी एस्सी) या पदवीकरिता डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी लिहिलेला द प्रॉब्लेम्स ऑफ रुपी हा प्रबंध आहे.दिवसाचे सतत २१ तास अभ्यास करून व नंतर अनंत हालअपेष्टा सहन करून आंबेडकरांना प्रबंध तयार केला. प्रबंधाविषयी डॉ. बाबासाहेब म्हणतात माझ्या प्रबंधाचा उद्देश हा आहे की ,भारतीय चलन व्यवस्था कशाप्रकारे भक्कम पायावर उभे राहील याचे विवेचन करणे मी जे काय लिहिले आहे ते मुलता भारतीय गरीब जनतेचा विचार करून लिहिले आहे त्या गरीब जनतेला चलन व्यवस्थेच्या सर्वसाधारण नियमांची कसली जाण नाही व माहिती नाही या विचाराने मी या प्रबंधाचे लेखन केले आहे.

डॉ बाबासाहेबांनी प्रबंध लिहिला त्यावेळची पार्श्वभुमी विचारात घेता प्रथम भारतातील चलनपध्दतीचा इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे. भारतात 'ईस्ट इंडिया कंपनी'तर्फे ब्रिटिश साम्राज्याचा पाया रचणा-या सुरुवातीच्या काही लोकांमध्ये वॉरन हेस्टिंग्सचं नाव कायम येतं. त्यानं १७७३ मध्ये पहिल्यांदा 'जनरल बँक ऑफ बंगाल एंड बिहार' ही कंपनीच्या व्यवहारांसाठी स्थापन करावी असं म्हटलं होतं. तेव्हा ते नाकारण्यात आलं. पण नंतर १८०६ मध्ये 'बँक ऑफ बंगाल' स्थापन करण्यात आली. तिला बंगाल आणि बिहार प्रांतात स्वतःच चलन वाटण्याचे अधिकारही मिळाले. १८४० मध्ये 'बँक ऑफ बॉम्बे' आणि १८४३ मध्ये 'बँक ऑफ मद्रास' स्थापन करण्यात आल्या. या तीनही बँकांना 'प्रेसिडन्सि बँक्स' म्हटलं जायचं. १८५७ चं पहिलं स्वातंत्र्यसमर झालं आणि त्यानंतर 'कंपनी' जाऊन ब्रिटिश सरकारचा राणीच्या नावानं अंमल सुरु झाला. त्यानंतरच भारतात अधिक औपचारिक, विस्तारित बँकिंग व्यवस्था निर्माण करण्याच्या हालचाली आणि विचारमंथन सुरु झालं. १८६१ मध्ये ब्रिटिश सरकारनं 'पेपर करन्सी ॲक्ट' करून चलनाचे सारे अधिकार आपल्या हातात घेतले. तेव्हापासून सगळ्या देशासाठी एक केंद्रीय व्यवस्था असणारी 'सेंट्रल बँक' असावी असा विचार बोलून दाखवला जाऊ लागला.

भारताचं चलन तेव्हा चांदीच्या प्रमाणात होतं. पण १८९२ मध्ये जेव्हा सोन्याच्या तुलनेत चांदीचे दर घसरले, तेव्हा भारताच्या चलनप्रश्नाचा अभ्यास करणा-या समितीनं 'बँक ऑफ इंग्लंड'च्या धर्तीवर भारतातही केंद्रीय बँक असावी असं सुचवलं. पण हा सोपा निर्णय नव्हता कारण अनेकांचे व्यावसायिक हितसंबंध त्यात होते. पुढे अनेक वर्ष काहीच घडलं नाही. तोपर्यंत भारतीय उपखंडात रुपया हे चलन स्थिरावलं होतं आणि स्थानिक चलन म्हणून ते सगळ्या प्रांतांमध्ये स्वीकारलं. १९१० मध्ये सरकारनं 'युनिव्हर्सल पेपर करन्सी ॲक्ट' हा कायदा केला आणि पाच, दहा आणि शंभर रुपयाच्या नोटा चलनात आणल्या.

१९१३ मध्ये भारतीय चलनाचं स्थैर्य आणि सरकारी पतपुरवठा यावर अभ्यास करण्यासाठी जे 'रॉयल कमिशन नेमले त्याचे सभासद केंब्रिज विद्यापीठातले

डॉ.राजाराम कांबळे
आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे

नावाजलेले अर्थशास्त्रज्ञ केन्स होते. यांचा भारतीय चलन आणि अर्थव्यवस्था यांचा गाढा अभ्यास होता.केन्स यांचा सहभाग असलेल्या रॉयल कमिशनने १९१४ मध्ये त्यांच्या अहवालात तेव्हा सुरु असलेली चलनपद्धत चालू ठेवण्याबरोबरच हे सांगितलं की तीनही 'प्रेसिडन्सी बँक्स' एकत्र करण्यात याव्यात आणि त्यावर केंद्रीय म्हणजे सरकारी नियंत्रण असावं. या केंद्रीय बँकेचं काम हे चलननिर्मिती करणं आणि सरकारी पत-कर्ज यांचं व्यवस्थापन करणं हे असेल. पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटिश सरकारनं त्याप्रमाणे १९२१ साली तीनही बँकांचं एकत्रिकरण करून 'इंपेरियल बँके'ची स्थापना केली, मात्र तिला चलनासंबंधी कोणतेही अधिकार दिले नाहीत. पुढे १९५५ मध्ये याच बँकेचं राष्ट्रीयिकरण होऊन ती 'स्टेट बँक ऑफ इंडिया' झाली. पण रुपयाचं मूल्य यानंतरही हेलकांडत होतं. भारतात तेव्हाही रुपयाच्या बदल्यात चांदी असे व्यवहार होत होते. १९१७ मध्ये युद्धकाळात सोन्याची विक्री सरकारनं थांबवल्यावर चांदीचे भाव वाढले आणि परिणामी भारतीय रुपया गडगडला. अनेक प्रश्न भारतीय रुपयासमोर होते. स्टर्लिंगच्या तुलनेत रुपयाचे मूल्य स्थिर करण्याची मागणी सुरु झाली. रुपयाचं अस्थिर मूल्य, त्याची आवश्यक स्थिरता, सुवर्ण विनिमय पद्धत की सुवर्ण प्रमाण पद्धत, केंद्रीय बँकेची आवश्यकता असा तो मोठा आवाका होता. त्याच वेळेस आंबेडकरांनी या रुपयाच्या प्रश्नाला हात घातला. हाच त्यांचा प्रबंध म्हणजे 'दी प्रॉब्लेम ऑफ रूपी'.

सुवर्ण विनिमय पद्धतीत देशाच्या चलनाच्या मूल्याची सांगड ही सोन्याच्या मूल्याशी घातली जाते. या पद्धतीचा अवलंब करणारे देश आपल्या कागदी चलनाचे रूपांतर निश्चित दराने सोन्यामध्ये करून ठेवतात. तसेच अशा देशांत सोन्याची किंमत सरकार निर्धारित करते. परंतु सुवर्ण प्रमाण पद्धतीत मात्र प्रत्यक्ष चलनात काही प्रमाणात सोने वापरले जाते. पारतंत्र्यातील भारतात सुवर्ण विनिमय पद्धतीने रुपयाची हाताळणी केली जावी असे ब्रिटिश सरकार आणि प्रा. केन्स आदी प्रभृतींचे मत होते.' बाबासाहेबांनी या वादात उडी घेत केन्स यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या अर्थतज्ञाशी एका प्रकारे दोन हात केले. प्रा. केन्स हे मत बाबासाहेबांनी अत्यंत हिरीरीने खोडून काढले. त्यांचे म्हणणे होते की, सुवर्ण विनिमय प्रमाण पद्धतीत चलनस्थैर्य येऊ शकत नाही. प्रा. केन्स आणि त्यांच्या मताचा पुरस्कार करणाऱ्या वाटत होते. सुवर्ण विनिमय प्रमाण पद्धतीत रुपयाची किंमत आपोआपच स्थिर होऊ शकेल. बाबासाहेबांना ते अमान्य होते. आपले मत सिद्ध करण्यासाठी बाबासाहेबांनी इ. स. १८०० ते १८९३ या काळातील चलनमूल्यांचा धांडोळा घेतला. त्यातून मिळालेल्या दाखल्यांच्या आधारे त्यांनी साधार दाखवून दिले की, भारतासारख्या अविकसित देशात सुवर्ण विनिमय पद्धती अयोग्य आहे. खेरीज या पद्धतीत चलनवाढीचाही धोका असतो. इतकाच युक्तिवाद करून बाबासाहेब थांबले नाहीत. त्यांनी आपल्या सखोल अभ्यासाच्या आधारे ब्रिटिश सरकारवर थेट आरोप केला. बाबासाहेबांचे म्हणणे होते की, सुवर्ण विनिमय पद्धतीचा अवलंब करून ब्रिटिश

दै प्रीतिसंगम

तरुण भारत

# नागठाणे महाविद्यालय व शिक्षक संघ(शिविम) यांच्यात सामंजस्य करार

वार्ताहर
देशमुखनगर

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाचा शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर (शिविम) यांच्यात पुर्वी २ वर्षे कालावधीसाठी केलेला करार संपुष्टात आल्याने नव्याने सामंजस्य करार करण्यात आला.



सातारा : करार करताना प्राचार्य डॉ. महेश गायकवाड, अध्यक्ष डॉ. भरत जाधव, प्रा. अभय जायभाये, प्रा. स्मिता कालभूषण.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक (शिविम) संघ, कोल्हापूर हा विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे संघाचे ध्येय आहे. मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञान प्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांमध्ये बौद्धिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते.

विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते.

**मराठी भाषा, साहित्य संस्कृती यांचे संवर्धन व विकसन करणे संघाचे ध्येय आहे.**

तसेच मराठी विषयाच्या प्राध्यापकांना त्यांच्या संशोधन निबंधला पारितोषिक, ललित व ललितेतर ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते. त्याचा ISSN नं. २३१९-६०२५ असून शिवाजी विद्यापीठ आणि यु. जी. सी. मान्यताप्राप्त यादीमध्ये पत्रिकेचा समावेश झालेला आहे.


अशा वैविध्यपूर्ण भूमिका बजावणाऱ्या शिविम संघाशी सामंजस्य करार करण्यात आला. या संघाने विविध उपक्रमामध्ये आमच्या महाविद्यालयाला वेळोवेळी सहकार्य केले आहे. या करारामुळे हि परंपरा कायम राहील.

करार करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. भरत जाधव, महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. अभय जायभाये, प्रा. स्मिता कालभूषण हे उपस्थित होते.

प्रीतिसंगम

# तणावमुक्त जीवन जगण्यासाठी ओशोच्या विचारांची गरज

## प्रा शौकत अतार



**नागठाणे /प्रतिनिधीः**

ओशो रजनीश हे केवळ एक संत, आध्यात्मिक गुरु किंवा विचारवंत नव्हते, तर ते एक क्रांतिकारी विचारसरणी घेऊन जगासमोर आलेले परिवर्तनवादी तत्त्वज्ञ होते. त्यांनी माणसाच्या मनोव्यापारांपासून ते आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील वैचारिक स्वतंत्रतेपर्यंत अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांचा गाभा हा स्वतंत्र विचार, प्रेम, ध्यान, आनंद आणि मुक्त जीवनशैली याभोवती गुंफलेला आहे. आजच्या धकाधकीच्या युगात तणावमुक्त जीवन जगण्यासाठी ओशोंच्या विचारांची अधिक गरज आहे. असे विचार प्रा. शौकत आतार यांनी मानले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित, आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त प्राध्यापक प्रबोधनी विभागांतर्गत ओशो विचारांची वर्तमानातील प्रासंगिकता या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते.

प्रा.शौकत अतार आपल्या पासून पुढे म्हणाले, ओशोच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू व्यक्तिगत स्वातंत्र्य, आत्मशोध आणि आनंद जीवन जगणे हा आहे तुमचं जीवन हे दुसऱ्याच्या नियमानुसार जगू नका. स्वतःचा मार्ग शोधा. सत्य बाहेर नाही ते तुमच्या आत आहे आणि त्याचा शोध घेण्यासाठी ध्यान आवश्यक आहे तसेच संभोग हेच अंतिम सत्य नाही पण त्याच्या माध्यमातून उच्च अध्यात्मिक अनुभव मिळू शकतो असे ओशोचे तत्वज्ञान सांगते.असे ते म्हणाले.

प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात ओशो यांच्या विचारधारेतील आधुनिक जगासाठी असलेली उपयुक्तता, त्यांचे ध्यानसाधनेवरील विचार आणि मुक्त जीवनशैलीच्या संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे समजून त्यांच्या तत्त्वज्ञानाचा योग्य उपयोग केला तर आपण एक समाधानी, आनंदी आणि विचारस्वातंत्र्याने समृद्ध जीवन जगू शकतो. असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अभय जायभाये यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. शितल सालवाडगी यांनी केले. आभार प्रा. रणधीर शिलेवंत यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बहूसंख्येने उपस्थित होते.

प्रीतिसंगम

# इतिहासाचा शोध

## नागठाणे कॉलेजच्या विद्यार्थ्यांची तारळे येथील ऐतिहासिक वाड्यास भेट

**नागठाणे/प्रतिनिधी:**

आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त इतिहास विभागातील विद्यार्थ्यांची तारळे येथील ऐतिहासिक अशा राजे महाडिक यांच्या वाड्यास अभ्यास भेट देण्यात आली.

भारताची संस्कृती जगातील सर्वात प्राचीन संस्कृतींपैकी एक आहे. ५००० वर्षांच्या आणि त्याहून अधिक काळाच्या संस्कृतीने भारतात आणि महाराष्ट्रात काही विलक्षण ऐतिहासिक ठिकाणे, आहेत जी भूतकाळात प्राप्त झालेल्या कलात्मक उत्कृष्टतेची साक्ष देतात. याचे ज्ञान महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व्हावे तसेच भारतीय संस्कृती आणि परंपरांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी या अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

या अभ्यास भेटीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या कन्या अंबिकाबाई यांचा विवाह हरजीराजे महाडिक यांच्याशी झाला असल्याने राजे महाडिक घराण्याची माहिती राजे महाडिक घराण्याचे वारसदार असणाऱ्या त्यांच्या कुटुंबियाकडून घेण्यात आली. तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी वाड्याचे ऐतिहासिक वास्तुशिल्प, घराण्याचा इतिहास, जतन आणि संवर्धन करून ठेवलेल्या विविध वस्तू दाखवून विद्यार्थ्यांना विस्तृत माहिती दिली. याचबरोबर तारळे गावातील ऐतिहासिक मंदिरे, १८५७ चा स्मृति स्तंभ, तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या कन्या भवानीबाई त्यांचे पती शंकराजी महाडिक यांच्या मृत्यूनंतर त्यांनी सतीचा मार्ग निवडला. तारळे येथील महाडिक स्मशानभूमीत, तारळी आणि काळगंगा नद्यांच्या संगमावर असलेली त्यांची समाधीस विद्यार्थ्यांनी भेट दिली.



तारळे येथील ऐतिहासिक वाड्याच्या अभ्यास भेटीचे यशस्वी आयोजन इतिहास विभाग प्रमुख डॉ. अजितकुमार जाधव, डॉ. सुनिल पवार यांनी केले. या अभ्यास भेटीत इतिहास विभागातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले. तारळे येथील वाड्याला भेट दिल्याने विद्यार्थ्यांच्या इतिहासाची समज वाढलीच पण महाराष्ट्राच्या हृदयात रुजलेल्या सांस्कृतिक वारशाबद्दल अभिमान आणि कौतुकाची भावनाही निर्माण झाली.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

[redacted]

24 Mar 2025 - Page 3 | epaper.pritisangam.in
Powered by softisky | 9764331134

सकाळ

# युवकांनी आत्मविश्वास बाळगणे आवश्यक

## प्रा. डॉ. सूरज चौगुले; नागठाणेच्या महाविद्यालयात बक्षीस वितरण उत्साहात

**नागठाणे, ता. २३ :** तेजस्विता, तपस्विता आणि तत्परता हे तीन तारुण्याचे तकार ज्याच्याकडे असतात, तो तरुण समजला जातो. मी कोण होणार, हे ठरवून स्वतःचा चेहरा ओळखून कठोर परिश्रम केले पाहिजेत. जीवनात यशस्वी होण्यासाठी युवकांनी आत्मविश्वास बाळगणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन इस्लामपूर येथील वक्ते व साहित्यिक प्रा. डॉ. सूरज चौगुले यांनी काढले.



**नागठाणे :** येथील महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. सूरज चौगुले. त्या वेळी उपस्थित मान्यवर.

नागठाण्यातील आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज महाविद्यालयात वार्षिक बक्षीस वितरण व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड होते.

प्रा. डॉ. चौगुले म्हणाले, "आपले आई-वडील हेच आपल्यासाठी आदर्श असले पाहिजेत. तारुण्याचं आयुष्य निघून जाणार आहे, पण जाणिवा मात्र जिवंत ठेवा. तारुण्यातून प्रौढावस्थेत जात असताना तारुण्यात जगल्याचा अभिमान बाळगता आला पाहिजे, असे जगावे."

डॉ. गायकवाड म्हणाले, "आजच्या युवकांनी आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत, हे सिद्ध करण्यासाठी कठोर मेहनत घेणे आवश्यक आहे. आपल्या नावाने जेव्हा स्वतःच्या आई-वडिलांना ओळखलं जाईल, तेव्हाचा क्षण तुमच्या आयुष्यातील सर्वोच्च असेल."

कृषिभूषण मनोहर साळुंखे, मुख्याध्यापक संजय नलावडे यांनी मनोगत व्यक्त केले. घनश्याम ताटे यांनी त्यांच्या दिवंगत बंधूच्या स्मृतीनिमित्त महाविद्यालयास ११ हजार १११ रुपयांची देणगी प्राचार्यांकडे सुपूर्द केली.

प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांचा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सातारा जिल्हा सहायक विभाग प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल सत्कार झाला. यावेळी संचालक डॉ. लक्ष्मण दोडमणी, प्रा. स्मिता कालभूषण, प्रा. अभय जायभाये, प्रा. संतोष निलाखे, डॉ. जयमाला उथळे, राजाराम कांबळे यांनी परिश्रम घेतले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी, स्वयंसेवकांचा गौरव करण्यात आला.

सचिन पाटील, वसंत पवार, घनश्याम ताटे, बाळासाहेब पवार, गणेश साळुंखे, संतोष साळुंखे, प्रकाश नलावडे, श्री. मघाळे, गोरख यादव, श्री. पवार, अण्णासाहेब पाटील, रामचंद्र साळुंखे आदी उपस्थित होते.

Satara, Satara-Today
24/03/2025 Page No. 5

प्रीतिसंगम

# ग्रामस्थ आणि गुरुदेव कार्यकर्त्यांनी दातृत्वातून ज्ञानमंदिरे साकारावीत

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे



**नागठाणे/प्रतिनिधी:**
आजी-माजी गुरुदेव कार्यकर्त्यांचा स्नेह मेळावा हा कृतज्ञता व्यक्त करण्याचा कार्यक्रम आहे. ज्या ज्ञानमंदिरात सरस्वतीची पूजा होते. तिथे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्याचे भाग्य गुरुदेव कार्यकर्त्यांना लाभते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्य आणि स्वराज्याचे पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्याचे काम प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन डॉ. बापूजींनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केले. आज ग्रामस्थ आणि गुरुदेव कार्यकर्त्यांनी आपलं एवढं जीवन घडलं त्यातून काहीतरी उतराई व्हावे म्हणून भरघोस देणगी देऊन दातृत्वाचा वारसा जपला. हा वारसा असाच पुढे चालत ठेवून ग्रामस्थ आणि गुरुदेव कार्यकर्ते यांनी ज्ञानमंदिरांचा विकास करावा. असे उद्‌गार प्राचार्य अभयकुमार साळुंखे (कार्याध्यक्ष ,श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर) यांनी काढले.

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या आजी-माजी गुरुदेव कार्यकर्त्यांचा स्नेह मेळावा व संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे सभागृह नामकरण समारंभात ते बोलत होते.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, लाख मोलाचे विचार या नागठाणेच्या मातीमध्ये डॉ. बापूजी व छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांनी रुजवले. ज्ञानमंदिर आणि गाव वेगळं नाही. विचार आणि वृत्ती यांची सांगड घालत, हातात हात घेऊन ग्रामस्थ व ज्ञानमंदिरे काम करून विवेकाचा आनंद घेत आहेत. आज नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे. युवाशक्तीला जे हवे ते दिले पाहिजे. गुरुदेव कार्यकर्त्यांनी २१व्या शतकाला सामोरे जाणारा विद्यार्थी घडवताना आपल्या ज्ञानाची उंचीही वाढवणे आवश्यक आहे. तरच पुढची पिढी घडणार आहे. आज धर्मांधता वाढली आहे सत्ता आणि पैसा मिळवण्याच्या पाठीमागे सर्वजण लागले आहेत. अशावेळी आपणालाच सुसंस्कारशील विद्यार्थी घडवायचा आहे.

प्राचार्य डॉ अशोक करांडे (माजी सहसचिव प्रशासन, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर) आपल्या भाषणात म्हणाले, पिकांना क्षार मुक्त पाणी दिल्यामुळे पीक जसे जोमात येते त्याप्रमाणे या महाविद्यालयाचे वातावरण चांगले ठेवण्यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न केले. त्यामुळेच नॅक पुर्नमानांकनात हे महाविद्यालय ग्रामीण भागात महाराष्ट्रात नंबर एक वर पोहोचले.विद्यार्थ्यांनी पाहिलेली स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी महाविद्यालयाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. गुरुदेव कार्यकर्त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाबाबत चर्चा करावी व त्याला सामोरे जाणारे महाविद्यालय नव्याने निर्माण करावे.

या कार्यक्रमात डॉ प्राचार्य बाबासाहेब दुधाळे , प्राचार्य सुहास साळुंखे प्रा आनंद साठे, डॉ. वसंत शिंदे, प्रा. मानेपाटील , डॉ.लक्ष्मण दोडमणी , प्र. प्राचार्य शेखर मोहिते, कृषिभूषण मनोहर (भाऊ) साळुंखे, शशिकांत पाटील, उद्योजक अमोल जाधव, गणेश साळुंखे, त्याने आपले मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमात गुरुदेव कार्यकर्त्यांनी व ग्रामस्थांनी महाविद्यालयाच्या नियोजित मल्टीपर्पज हॉल बांधकामासाठी देणगी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्र. प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.राजाराम कांबळे यांनी केले. आभार यांनी मानले. त्यावेळी महाविद्यालयातील आजी-माजी गुरुदेव कार्यकर्ते नागठाणे गावातील प्रतिष्ठित नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

11 Mar 2025 - Page 3 | epaper.pritisangam.in
Powered by softisky | 9764331134

सातारा न्यूज

*** संमिश्र ***

# नागठाणे कॉलेजच्या विद्यार्थ्यांची जानकी ॲग्रो टुरिझमला अभ्यास भेट




**सातारा न्यूज;**
**देशमुखनगर** : भारत हा खेड्यांचा देश आहे. त्याचबरोबर कृषीप्रधान देश म्हणून ही ओळखला जातो. भारतातील खेडी समृद्ध झाली तर देशाचा विकास होईल त्यादृष्टीने केंद्र सरकार व राज्य सरकार ग्रामीण भागात विविध उपक्रम राबवत आहेत. त्यातीलच एक कृषी पर्यटन व्यवसायाला ग्रामीण भागात चालना दिली जात आहे. कृषी पर्यटन व्यवसायाबाबतची माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाबरोबरच कृषी पर्यटनाच्या संधी व आव्हाने जाणून घेऊन उद्योजकता आणि व्यवसाय व्यवस्थापनाबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन या विशेष हेतुने आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची जानकी ॲग्रो टुरिझम बोरगाव येथे अभ्यास भेट देण्यात आली.

अभ्यास भेटीत जानकी ग्रो टुरिझमचे व्यवस्थापक मा. शहाजी साळुंखे यांची प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात आली. ते आपल्या मुलाखतीत म्हणाले, कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागात पर्यटकांना आकर्षित करून, स्थानिक अर्थव्यवस्थांना चालना मिळत आहे. तसेच ॲग्रो टुरिझम व्यवसायाची संकल्पना कशी विकसित करण्यात आली याबाबत ही त्यांनी विस्तृत माहिती दिली.

या संवादातून कृषी व व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिक संधी, नवकल्पना आणि व्यवसायिक दृष्टिकोन आत्मसात करण्याबाबत प्रत्यक्ष अनुभव त्यांनी सांगितले त्याचबरोबर भविष्यात या व्यवसायामध्ये कोणत्या नवीन योजना घेऊन येणार आहे याची कल्पना त्यांनी दिली तसेच यशस्वी उद्योजक बनण्याबरोबर सामाजिक व कौटुंबिक जबाबदारीची ही जाणीव विद्यार्थ्यांना करून दिले आपण यशस्वी होत असताना आपल्या कुटुंबातील सर्व व्यक्तींना एकत्रित बांधू शकलो तर आपली निश्चित प्रगती होईल यासाठी एकत्रित कुटुंब पद्धतीचा सर्वांनी स्वीकार करावा असा सामाजिक संदेश हे त्यांनी आपल्या मुलाखतीमध्ये दिला. मुलाखतकार म्हणून ऋतुजा कमाने या विद्यार्थीनीने भूमिका बजाविली.

अभ्यास भेटीचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड व अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजाराम कांबळे यांच्या मार्गदर्शक प्रा. रणधीर शिलेवंत यांनी केले.

अभ्यास यशस्वी करण्यासाठी अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी विद्यार्थीनी, प्रा. कुलदीप सूर्यवंशी, प्रा. रघुनाथ संकपाळ, डॉ. संतोष सोडगे व कु. साक्षी कांबळे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेऊन मोलाचे सहकार्य केले.

प्रीतिसंगम

# नागठाणे महाविद्यालयात विद्यार्थी-पालक मेळावा संपन्न

**नागठाणे/प्रतिनिधी:**

आर्टस् ,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज , नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थी-पालक मेळावा महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.



विद्यार्थी पालक मेळाव्यात उपस्थित असलेल्या पालकांना मार्गदर्शन करताना प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड म्हणाले, महाविद्यालयाच्या सर्वांगिन विकासात पालकांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असते. पालक शिक्षक यांच्यामध्ये संवाद व समन्वय साधावा व महाविद्यालय व विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती पालकांना समजावी या हेतूने विद्यार्थी-पालक-शिक्षक मेळावा आयोजित करण्यात आला आहे. आज विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या नव्या संधी,उपलब्ध झाल्या आहेत. विद्यार्थ्यांचा कौशल्यधिष्टीत विकास व्हावा यासाठी हे महाविद्यालय प्रयत्नशील आहे.


विद्यार्थी पालक मेळाव्याचे प्रास्ताविक डॉ. नागनाथ चोबे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा अभिलाषा देशमुख यांनी केले तर आभार डॉ सुनील पवार यांनी मांडले. त्या मेळाव्यात कला शाखेच्या वतीने प्रा. अभय जायभाये , कॉमर्स विभागाच्या वतीने डॉ. राजाराम कांबळे यांनी तर विज्ञान विभागाच्या वतीने प्रा. सुनिता जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. त्यावेळी पालकांनीही आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगत त्यांनी महाविद्यालय आणि पालक यांचे ऋणानुबंध अधिक दृढ होण्यासाठी आयोजित केलेल्या पालक मेळाव्यासाठी महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या मेळाव्यासाठी विद्यार्थी पालक प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

सातारा न्यूज
निर्भीड व निष्पक्ष बातमी देणारं एकमेव व्यासपीठ
http://esataranews.com sataranewsonline @SataraNews sataranews

# निष्ठेने कर्म केल्यास यश निश्चित मिळेल : प्रा ए जी थोरात

## आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ संपन्न

सातारा न्यूज;
देशमुखनगर : एकविसाव्या शतकात फक्त पदव्या घेऊन चालणार नाही तर जगण्याचा आनंद घेण्यासाठी प्रत्येकाने कला जोपासणे आवश्यक आहे. मानवी जीवनात कर्म मोठे आहे कर्माने माणूस मोठा होतो. कर्म प्रामाणिक आणि निष्ठेने करा तुम्हास यश निश्चित मिळेल असे उदगार प्रा ए जी थोरात (माजी व्यवस्थापक सदस्य श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर) यांनी काढले.



आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे या महाविद्यालयात बी ए, बी कॉम व बी एस्सी भाग तीन या वर्गातील विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ संपन्न झाला. या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड होते .

प्रा ए जी थोरात आपल्या भाषणात पुढे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यामुळे आमची पिढी शिकली. बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळाली. आजची नवीन पिढी फार प्रगल्भ आहे. त्यांना जाण आहे. पण पूर्वी सगळी नाती ही भावनेने, प्रेमाने आणि मनाने बांधली गेली होती आज ती पोरकी होत चालली आहेत असे वाटते. कुटुंब संस्था उध्वस्त होत चालल्या आहेत. युवा पिढीने या सगळ्यांच आत्मचिंतन करणे आवश्यक आहे. अलीकडे इतिहासाची मोडतोड करण्यात येत आहे आणि जाती-जातीमध्ये, धर्मा धर्मामध्ये भांडणे लावण्याचे काम होत आहे हे अतिशय निंदनीय असून ते लोकशाहीला घातक आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित असलेले प्रो डॉ सतीश घाटगे (प्राचार्य शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड) आपल्या यांनीही मनोगत व्यक्त केले ते आपल्या मनोगतात म्हणाले, निसर्गात सर्वात सुंदर असं माणूस नावाच रूप निर्मीकाराने निर्माण केले. माणसाने आपल्या कार्याने जग सुंदर ही बनवले परंतु अलीकडे स्वार्थासाठी मानवी जीवनात नको त्या वाईट प्रवृत्ती वाढल्या आहेत. अनेक वाईट घटना घडवून आणल्या जाऊन विकृतीत वाढली आहे. अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे. यात युवक भरडला जात आहे. अशावेळी युवकांनी जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून मार्गक्रमण करावे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, गौतम बुद्धांनी अती अपेक्षा हे दुःखाचे मूळ आहे हे सांगितले आहे. आनंदी जगण्यासाठी स्वार्थापासून माणसाने दूर राहिले पाहिजे. महाविद्यालयात झालेले संस्कार, विचार व मैत्री कधीच विसरली जात नाही. कोणतीही गोष्ट मिळवण्यासाठी कष्ट पणाला लावा आयुष्य पणाला लावू नका.

तसेच माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष गणेश साळुंखे यांनी आपल्या मनोगतात माजी विद्यार्थी संघाने आजवर केलेली वाटचाल विशद केली व महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थी संघाचे सदस्य होण्याबद्दल आवाहन केले.

शुभचिंतन समारंभात कु. अक्षता जाधव, कु. श्रेया देशमुख, कु. तन्वी जाधव, कु. साक्षी कदम यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रीतिसंगम

# नागठाणे महाविद्यालयात सायन्स विभागाच्यावतीने भित्तीपत्रिकेचे प्रकाशन

**नागठाणे/प्रतिनिधी:**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज , नागठाणे या महाविद्यालयात विज्ञान विद्याशाखेतील वनस्पतीशास्त्र विभाग व निसर्गमंडळाच्यावतीने 'पश्चिम घाटातील सह्याद्री पर्वत रांगामधील जैवविविधता अभ्यास ' या विषयावरील भित्तीपत्रिकेचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.



सह्याद्रीमध्ये असणारे प्रादेशिक वनस्पती व त्यांचं मेडिकल सायन्स मधील महत्व,, दुर्मिळ वनस्पती,, संपत चालेल्या वनस्पतीच्या जाती,, नव्याने विशाळगडावर सापडलेली –शोध लागलेले सेरोपेजिया शिवरायांना ही कंदीलपुष्प वनस्पती या सर्व विषयाचा अभ्यास या भित्तीपत्रिका उदघाटनाच्या माध्यमातून विद्यार्थांपर्यंत पोहचवण्याचे काम केले.

भित्तिपत्रिका उदघाटन प्रसंगी प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड म्हणाले , पश्चिम घाट अनेक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे. याचे कारण म्हणजे या प्रदेशातील वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजातींची प्रचंड विविधता आणि विपुलता आहे. कास पठार किंवा पाचगणीच्या पठारावर उललेली फुले पर्यटकांबरोबरच अभ्यासकांना आकर्षित करतात. निसर्गाचा हा ठेवा पुढील पिढ्यांना पाहण्यासाठी त्याचे जतन आणि संवर्धन करणे काळाची गरज आहे.

याप्रसंगी डॉ. राजाराम कांबळे डॉ. अजितकुमार जाधव, प्रा अभय जायभाये , डॉ. नागनाथ चोबे व डॉ. जयमाला उथळे यांनी मनोगत व्यक्त केले.

भित्तिपत्रिकेचे वाचन वनस्पतीशास्त्र विभागातील कु. साई सुतार, कु.आश्विनी जाधव, कु.रसिका मोहिते व कु. साक्षी घाडगे यांनी केले. कार्यक्रमाची प्रास्ताविक व स्वागत प्रा. पूजा कदम यांनी केले. तर आभार प्रा. संध्या पाटील यांनी मानले. त्यावेळी विज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा. अभिलाषा देशमुख, प्रा. आचल तावरे, प्रा. सुनिता जाधव तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक बंधू- भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

दैनिक मुक्तागिरी

# नागठाणे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

## विकसित भारत २०४७: जागतिक शांततेसह शाश्वत विकास या विषयावर चर्चासत्र आयोजित

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**नागठाणे, दि. २ :** येथील आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विकसित भारत २०४७: जागतिक शांततेसह शाश्वत विकास या विषयावर आयोजित करण्यात आलेले बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले.




आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या उदघाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. मिलिंद हुजरे हे होते. ते आपल्या उदघाटनपर भाषणात म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन करुन बहुजन, दीनदलित समाजाला शिक्षण दिले. नागठाणे महाविद्यालयाने देशाला दिशा देणाऱ्या बहुमोल अशा विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या विषयावर दिवसभर वैचारिक मंचन घडवून आणले जाणार आहे. विकसित भारत संकल्पनेची उद्दिष्टे ही आर्थिक वाढ आणि राहणीमानाचा दर्जा सुधारणे, पर्यावरण संमतोल, पायाभूत सुविधा, सामाजिक कल्याणासह शाश्वत विकास साधने हा आहे. त्या दृष्टिने या चर्चासत्रात सकारात्मक चर्चा घडून यावी. चर्चासत्राच्या उदघाटनपर समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व सहभागी संशोधक, तज्ञ मार्गदर्शन यांचे चर्चासत्रात सहभाग नोंदविल्याबददल धन्यवाद दिले. त्यावेळी कृषिभूषण मनोहर साळुंखे उपस्थित होते.

डॉ. संजय कप्तान म्हणाले, जगामध्ये शांततेसह शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी भारताने शाश्वत विकासाच्या घटकांचा विकास साधणे आवश्यक आहे. कोणत्याही देशाच्या विकासासाठी मानवी भांडवल आवश्यक असते. भारताकडे सर्वात जास्त तरुण मानवी भांडवल आहे त्याचा शाश्वत विकासासाठी उपयोग होणे आवश्यक आहे. चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात संशोधक मार्गदर्शक डॉ. पी. एस. कांबळे आपल्या संशोधनपर भाषणात त्यांनी अमेरिका आणि भारत यांच्यातील आर्थिक घटकांबाबत तुलना करुन भारताला विकसित देश बनण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न, आरोग्य, शिक्षण, आर्थिक समानता, बेकारी व दारिद्र्य निर्मुलन आणि पर्यावरण समतोलासह शाश्वत विकास साधने आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

# मराठी भाषा आणि साहित्याचा वारसा जपणे ही आपली जबाबदारी : प्रदीप कांबळे

**सातारा न्यूज;**

**देशमुखनगर :** मराठी भाषा आणि साहित्याचा वारसा जपणे ही आपली जबाबदारी आहे' असे प्रतिपादन सातारचे ज्येष्ठ साहित्यिक व निवेदक श्री प्रदीप कांबळे यांनी केले.ते नागठाणेच्या आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मराठी भाषा ही तीर्थ स्वरूप पाण्यासारखी आहे. मानवतेचा नंदादीप कुसूमाग्रज होते.'नटसम्राट' सारखी अजरामर कलाकृतीचे लेखन त्यांनी केले. 'नासा' संस्थेमध्ये १४२ मराठी भाषिक वैज्ञानिक वरिष्ठ पदांवर कार्यरत आहेत ही आपणांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडील आणि मराठी भाषेला विसरता कामा नये.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड म्हणाले की, मराठी भाषा वाङ्मय समृद्ध आहे. बोली भाषा सर्वांनी दैनंदिन जीवनात वापरून टिकवली पाहिजे तसेच विद्यार्थ्यांनी मराठी वाचन,श्रवण,चिंतनाच्या जोरावर आपले व्यक्तिमत्व विकसित केले पाहिजे. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून असलेले मराठी साहित्य परिषदेचे सचिव श्री ऋषिकेश सारडा यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र साहित्य परिषद व मराठी विभाग यांच्यात सामंजस्य करार संपन्न झाला. याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात आयोजित केलेल्या विद्यापीठस्तरीय निबंध, वक्तृत्व, काव्यवाचन इ.स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

याप्रसंगी विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेच्या बक्षिसासाठी सौजन्य लाभलेले श्री दत्तात्रय काळकुटे यांचा सत्कार करण्यात आला. सदर स्पर्धांच्या बक्षीसांसाठी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड व प्रा.रघुनाथ गवळी यांचे सौजन्य लाभले.

मराठी विभागातर्फे 'अभिजात भाषेचा दर्जा: मराठीचा गुणगौरव' या भित्तीपत्रिकेचे अनावरण प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रीतिसंगम

# नागठाणे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय सेमिनार संपन्न

**नागठाणे/प्रतिनिधी:**

आर्टस, कॉमर्स ण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विकसित भारत २०४७: जागतिक शांततेसह शाश्वत विकास या विषयावर आयोजित करण्यात आलेले बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले.

आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या उदघाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे मा प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे (सहसचिव अर्थ, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर) हे होते. ते आपल्या उदघाटनपर भाषणात म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन करुन बहुजन , दीनदलित समाजाला शिक्षण दिले. नागठाणे महाविद्यालयाने देशाला दिशा देणा-या बहुमोल अशा विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या विषयावर दिवसभर वैचारिक मंचन घडवून आणले जाणार आहे. विकसित भारत संकल्पनेची उद्दिष्टे ही आर्थिक वाढ आणि राहणीमानाचा दर्जा सुधारणे, पर्यावरण




संमतोल, पायाभूत सुविधा, सामाजिक कल्याणासह शाश्वत विकास साधने हा आहे. त्या दृष्टिने या चर्चासत्रात सकारात्मक चर्चा घडून यावी. चर्चासत्राच्या उदघाटनपर समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व सहभागी संशोधक, तज्ञ मार्गदर्शन यांचे चर्चासत्रात सहभाग नोंदविल्याबददल धन्यवाद दिले. त्यावेळी मा. कृषिभूषण मनोहर भाऊ साळुंखे उपस्थित होते.

चर्चासत्राचे बीजभाषक डॉ. संजय कमान (माजी वाणिज्य विभागप्रमुख सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे) आपल्या बीजभाषणात म्हणाले, जगामध्ये शांततेसह शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी भारताने शाश्वत विकासाच्या घटकांचा विकास साधणे आवश्यक आहे. कोणत्याही देशाच्या विकासासाठी मानवी भांडवल आवश्यक असते. भारताकडे सर्वात जास्त तरुण मानवी भांडवल आहे त्याचा शाश्वत विकासासाठी उपयोग होणे आवश्यक आहे.

चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात संशोधक मार्गदर्शक मा. डॉ. पी एस कांबळे (सिनिअर प्रोफेसर, अर्थशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर) आपल्या संशोधनपर भाषणात त्यांनी अमेरिका आणि भारत यांच्यातील आर्थिक घटकांबाबत तुलना करुन भारताला विकसित देश बनण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न, आरोग्य, शिक्षण, आर्थिक समानता, बेकारी व दारिद्रय निर्मुलन आणि पर्यावरण समतोलासह शाश्वत विकास साधने आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

चर्चासत्राच्या दुस-या सत्रातील संशोधक मार्गदर्शक डॉ. विनायक पराळे (योन्सी विद्यापीठ, दक्षिण कोरिया) यांनीही कोणत्याही देशाच्या विकासासाठी शांतता हवी असते असे मत व्यक्त करुन, सामाजिक कल्याण आणि पर्यावरण संरक्षण सुनिश्चित करताना दीर्घकालीन आर्थिक विकासाला चालना देताना पर्यावरण विकासासाठी एरोजेल टेक्नॉलॉजीचे महत्व त्यांनी विषद केले. या चर्चासत्रात ऑनलाईन आणि ऑफलाईन संशोधन पेपरचे वाचन संशोधकांनी केले.

आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ (माजी प्रशासन सहसचिव श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था) हे होते. ते आपल्या भाषणात म्हणाले, नागठाणे महाविद्यालयाने नॅक पुर्नमुल्यांकनात महाराष्ट्रात ग्रामीण भागात प्रथम क्रमांक मिळविला आहे. विकसित भारत २०४७: शांततेसह शाश्वत विकास या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र घेवून त्यांनी ते यशस्वी करुन दाखविले. या चर्चासत्रासाठी १४० पेक्षा अधिक शोधनिबंध आले त्यातच या चर्चासत्राची यशस्वीता दिसते.

आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या उदघाटन समारंभाचे प्रास्ताविक डॉ. अजितकुमार जाधव यांनी केले पाहुण्यांचा परिचय डॉ. नागनाथ चोबे यांनी केला. समारोप समारंभाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. राजाराम कांबळे यांनी केले तर आभार प्रा. शौकत आतार यांनी मानले त्यावेळी सर्व संशोधक, महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

02 Mar 2025 - Page 3 | epaper.pritisangam.in
Powered by softisky | 9764331134

# नागठाणे महाविद्यालयात विद्यार्थी-पालक मेळावा संपन्न

**सातारा न्यूज; देशमुखनगर** : आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थी -पालक मेळावा महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

विद्यार्थी पालक मेळाव्यात उपस्थित असलेल्या पालकांना मार्गदर्शन करताना प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड म्हणाले, महाविद्यालयाच्या सर्वांगिन विकासात पालकांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असते. पालक शिक्षक यांच्यामध्ये संवाद व समन्वय साधावा व महाविद्यालय व विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती पालकांना समजावी या हेतूने




विद्यार्थी-पालक- शिक्षक मेळावा आयोजित करण्यात आला आहे. आज विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या नव्या संधी,उपलब्ध झाल्या आहेत. विद्यार्थ्यांचा कौशल्यधिष्टीत विकास व्हावा यासाठी हे महाविद्यालय प्रयत्नशील आहे.

विद्यार्थी पालक मेळाव्याचे प्रास्ताविक डॉ. नागनाथ चोबे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा अभिलाषा देशमुख यांनी केले तर आभार डॉ सुनील पवार यांनी मांडले. त्या मेळाव्यात कला शाखेच्या वतीने प्रा. अभय जायभाये, कॉमर्स विभागाच्या वतीने डॉ. राजाराम कांबळे यांनी तर विज्ञान विभागाच्या वतीने प्रा. सुनिता जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. त्यावेळी पालकांनीही आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगत त्यांनी महाविद्यालय आणि पालक यांचे ऋणानुबंध अधिक दृढ होण्यासाठी आयोजित केलेल्या पालक मेळाव्यासाठी महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या मेळाव्यासाठी विद्यार्थी पालक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# ज्ञानवंत व गुणवंत असे विद्यार्थी घडवणे हे बापूजींचे ध्येय होते

**नागठाणे/प्रतिनिधी:** डॉ. बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार या त्रिसूत्रीवर आधारित सत्य, चारित्र्य, प्रामाणिकपणा, त्याग व सेवा या तत्वांचा अंगीकार करून शिक्षणासाठी तहानलेल्या, भुकेल्यांसाठी, दीन-दलितांसाठी त्यांच्या दारापर्यंत गंगोत्री नेऊन पोहचवली. लाखो मुले शिकली. शिक्षणाचा हेतू विद्यार्थी केंद्रबिंदू मानून सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडावा यासाठी बापूजींनी स्वतः विविध स्पर्धांचे आयोजन केले. त्या पाठीमागे व्यक्तिमत्वाने परिपूर्ण ज्ञानवंत व गुणवंत असे विद्यार्थी घडवणे हे बापूजींचे ध्येय होते. असे उदगार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे प्रशासन सहसचिव प्राचार्य सिताराम गवळी यांनी काढले.

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते.

प्राचार्य सिताराम गवळी आपल्या भाषणात पुढे म्हणाले, डॉ. बापूजींनी ७० वर्षांपूर्वी जी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्पर्धा सुरू केली आहे ती परंपरा आजही व्यापक स्वरूपात चालू आहे. आजसुद्धा लाखो विद्यार्थी बापूजींनी सुरू केलेल्या शैक्षणिक डेरेदार वटवृक्षाखाली आयुष्याची स्वप्ने प्रत्यक्षात उतरवतात. बापूजींच्या विचारांचे आचारात रूपांतर करीत आहेत .

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, आजच्या युवा पिढीला डॉ.



बापूजींच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू मार्गदर्शक ठरू शकतात. तरूणांनी सत्य, प्रामाणिकपणा, सेवा आणि त्याग पिळवणूक प्रवृत्तीस आळा या मौलिक निष्ठा जीवनात उतरवण्यासाठी सुसंस्कारी शिक्षण घेतले पाहिजे. आपले आचार विचार व उच्चार हे पवित्र असले पाहिजेत.

श्री स्वामी विवेकानंद जयंती समाहात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धा सुरुवातीस संस्थेच्या सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, मराठवाडा व रायगड या सहा विभागातील सर्वच शाखांवर घेण्यात आली. त्यातून यश मिळवलेल्या स्पर्धकांची विभागीय स्पर्धा पार पडली व त्यातून या सहा विभागातील निबंध, वक्तृत्व, चित्रकला, कराओके, सुगम गायन व विवेकानंद टॅलेंट सर्च परीक्षा स्पर्धेत प्राथमिक,उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक , महाविद्यालयीन विद्यार्थी व गुरुदेव कार्यकर्ते गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त स्पर्धकांची राज्यस्तरीय स्पर्धा नुक्तीच आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे येथे पार पडली. या स्पर्धेत ५०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

या राज्यस्तरीय स्पर्धेच्या समारोप समारंभ व बक्षीस वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे प्राचार्य अरुण काळबागे (सातारा जिल्हाध्यक्ष, विद्या समिती) यांच्या शुभहस्ते स्पर्धेत सर्वच गटातील व विविध स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त स्पर्धकास रोख रक्कम , प्रमाणपत्र व मोमेंटो देऊन गौरव करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य अशोक देसाई यांनी केली. सूत्रसंचालन डॉ. राजाराम कांबळे यांनी केले. तर आभार प्रा संतोष निलाखे यांनी मानले. त्यावेळी सर्व स्पर्धक, सर्व स्पर्धांचे परीक्षक, संघ व्यवस्थापक, विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्य सौ शुभांगी गावडे, सहसचिव प्रशासन प्राचार्य सिताराम गवळी व सहसचिव अर्थ प्राचार्य डॉ मिलिंद हुजरे यांचे मौलिक सहकार्य व मार्गदर्शन लाभले

## रोहिदास
## ाजरी होणार

र्णिमा
ॉलनी
र्णिमा
ते व्हा



# नागठाणे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय सेमिनार संपन्न



प्रीतिसंगम

# करिअर करण्यासाठी स्पर्धा परीक्षा उत्तम पर्याय

## सौ.सितल पाटील करंजेकर



**नागठाणे/प्रतिनिधी:** अलिकडच्या काळात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. स्पर्धा परीक्षा हे एक आव्हान आहे आणि ते पेलायचे असेल तर निश्चित ध्येय , योग्य मार्गदर्शन, अचूक तयारी , वेळेचे व्यवस्थापन व त्याला कष्टाची जोड देणे आवश्यक आहे. समाजात स्वाभीमान आणि आत्मसन्मानाकरिता करियर करण्यासाठी स्पर्धा परीक्षा उत्तम पर्याय आहे असे उदगार सौ सितल पाटील करंजेकर (वित्त व लेखा अधिकारी, सातारा) यांनी काढले.

आर्ट्स , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील विवेकानंद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, ग्रामपंचायत नागठाणे आणि शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र , कराड यांच्या सामंजस्य करारा अंतर्गत महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विवेकानंद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उदघाटन समारंभ व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड हे होते.

सौ. सितल पाटील करंजेकर आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या, स्पर्धा परीक्षेची एक सर्वसामान्य अभ्यास पद्धती आहे. वाचन करणे, नोट्स काढणे ,पठन करणे , मनन करणे, आकलन करणे व विश्लेषण करणे या पद्धतीने अभ्यासाचा क्रम ठेवल्यास यशाचा मार्ग सुकर होतो.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, निर्धार, निश्चित ध्येय, शिस्त , सराव व एकाग्रता हा स्पर्धा परीक्षा यशस्वीतेचा पाया आहे. विद्यार्थ्यांनी लेखन, मनन, वाचन, चिंतन आणि मेहनतीने करिअर करावे.

महाविद्यालयातील विवेकानंद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी मा. अजित साळुंखे यांनी ५००० रुपयाची स्पर्धा परीक्षेची पुस्तके दिली. डॉ अजितकुमार जाधव यांनी ती पुस्तके प्राचार्यांच्याकडे सुपूर्द केली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. अजितकुमार जाधव (संचालक विवेकानंद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र) यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजाराम कांबळे यांनी केले तर आभार प्रा. शौकत अतार यांनी मानले. त्यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक बंधू-भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.


Powered by softisky | 9764331134

प्रीतिसंगम

# माता आणि मातीशी जो नाते जोडतो तोच खरा सुसंस्कारी

## दिलीप संकपाळ



**नागठाणे/प्रतिनिधी:** राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष संस्कार शिबिरातून युवकांना स्वतःहाच स्वतःची ओळख होत असते. दत्त गावात युवक फक्त श्रम करायलाच येत नाही तर जाताना गावातील सुसंस्काराची शिदोरी आपल्याबरोबर घेऊन जातो. जगात आपली आई सर्वात मोठी शिल्पकार आहे. आपल्या आयुष्यात जो माता आणि मातीशी नाते जोडतो तोच खरा सुसंस्कारी असतो असे उदगार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजीव सेवक मा. दिलीप संकपाळ यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे खोजेवाडी ता जि. सातारा येथे संपन्न झाले. या शिबिरातील समारोप समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड हे होते.

दिलीप संकपाळ आपल्या भाषणात पुढे म्हणाले, श्रमसंस्कार शिबिरातून मैत्री जोपासली जाते व ती दीर्घकाळ टिकते. आपला देश तरुणांच्या बाबतीत श्रीमंत आहे. त्यांना दिशा देऊन त्यांच्या श्रमाचा वापर देश समृद्धीसाठी केला पाहिजे. शिक्षणमहर्षी डॉ.बापूजींनी शिक्षण संस्था निर्माण करून बहुजनांना शिक्षण दिलेच पण हे कार्य करताना त्यांनी माणसं हेरली. निर्माण केलेली संस्कार केंद्र त्यांच्या ताब्यात दिली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, विद्यार्थ्यांनी श्रमदानातून जे काम केलं आहे ते अतिशय उल्लेखनीय आहे. तुम्ही चार भिंतीच्या बाहेरच शिक्षण घेतलं, समाजात मिसळलात आणि समाजाशी नाळ जोडून एकरूप झालात. हेच शिबिराचे फलित आहे.

वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व शिबीर देतात. स्वच्छता हा संस्कार आहे की जो परमेश्वरानंतर येतो. ते तुम्ही या गावात दाखवून दिले आणि महात्मा गांधीजींचा आणि संत गाडगेबाबांचा आदर्श ठेवला त्याबद्दल हे गाव कृतज्ञ राहील.

या कार्यक्रमात संजय (बाबा) घोरपडे पंचायत समिती सदस्य आपल्या मनोगतात म्हणाले, काम करताना अनुभवातून ज्ञान मिळतेच पण त्याचबरोबर शिक्षणाचीही आवश्यकता असते. श्रमसंस्कारातून चांगल्या गुणांचा विकास होतो. डॉ शिबिरामुळे आमच्या गावातील वर्षानुवर्ष प्रलंबित असलेले प्रश्न सुटले.

श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभात कु.अक्षदा जाधव व विक्रांत मोरे यांनी विद्यार्थी मनोगत व्यक्त केले. तसेच ग्रामस्थांच्यावतीने सांप्रदायिक भजनी मंडळाचे सुशांत महाराज घोरपडे व प्राध्यापकांच्या वतीने डॉ. संतोष सोंडगे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत कार्यक्रमाधिकारी डॉ संदीप लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा शीतल सालवाडगी यांनी केले. तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ सुनील पवार यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी सातारा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्ता घाडगे, नागठाणे पत्रकार संघाचे अध्यक्ष धनाजी कणसे, ग्रामपंचायत सदस्या सौ. हिराबाई घोरपडे, सौ.सुनीता साळुंखे, सौ.मनीषा सातपुते तसेच सौ. ज्योती मदने, माजी प्राचार्य शिवाजी पाचुपते, विश्वनाथ साळुंखे, सर्व ग्रामस्थ, प्रतिष्ठित नागरिक, युवा मंडळातील पदाधिकारी व सर्व सदस्य, आजी-माजी सैनिक संघटनेचे सर्व सदस्य, मराठी शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक, महाराष्ट्र हायस्कूलचे मुख्याध्यापक व शिक्षक, महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच सर्व स्वयंसेवक स्वयंसेविका, राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.



दैनिक मुक्तागिरी

# युवक युवतींनी आभासी दुनियेतून बाहेर पडावे : किशोर काळोखे




**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**परळी, दि. २९ :** सध्याच्या युगात आपल्याला विचलित करणारे समाज माध्यमातील प्रकार आपण दुर्लक्षित केले पाहिजेत. आभासी जग हे क्षणिक असून मानसन्मान आणि आत्मसन्मान जपणे हे आपल्या यशस्वी जगण्याचे सूत्र आहे, असे मानसिक व भावनोपचार तज्ञ किशोर काळोखे म्हणाले,

आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज नागठाणे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रामपंचायत खोजेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते तारुण्याच्या उंबरठ्यावर या विषयावर ते बोलत होते. यावेळी अशोक मदने, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप लोखंडे, डॉ. सुनील पवार समितीतील सदस्य डॉ. जयमाला उथळे, प्राध्यापक भालचंद्र बीचीतकर,प्राध्यापक संतोष सोंडगे, प्राध्यापक शितल सालवाडगी, प्राध्यापक सुनीता जाधव, प्रशांत सावंत सौ.हिराबाई घोरपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

काळोखे पुढे म्हणाले, की तारुण्यात आपली जी गुर्मी असते त्याचे रूपांतर उर्मीमध्ये करायला हवे. तंत्रज्ञानात आपले अवघे विश्व आपण हरवून बसतो. आपली खरी ओळख ही बोलण्यात वागण्यात आणि कार्यात आहे. मैदानावरच स्वतःला सिद्ध करण्याची संधी असते.व्याधीमुक्त राहण्यासाठी शरीर आणि मन सुदृढ असायला हवे. आंधळ प्रेम आणि राग यावर विजय मिळवायलाच हवा. खरे प्रेम हे सत्यावर हवे मानलेल्या नात्यांपेक्षा रक्ताची नाती सर्वश्रेष्ठ असतात वैज्ञानिक दृष्टिकोन हा स्वतःला चिकित्सक बनवतो आपण निर्व्यसनी निरोगी आणि निकोप जीवन जगण्याला प्राधान्य द्यायला पाहिजे.

ग्रामीण भागातील विकसित होणारी जीवनशैली आरोग्यदायी राहावी म्हणून प्रबोधन व्हायला हवे यासाठी दूत म्हणून कार्यरत पहा असाही त्यांनी कानमंत्र दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुमारी स्नेहा पवार यांनी केले तर आभार कुमारी प्रतीक्षा जाधव यांनी मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी अमिता गायकवाड यांनी केले.

पुण्यभूमी महाराष्ट्र न्यूज

Saturday 1st February 2025 Pynyabhoomimaharashtra@gmail.com website: www.mywebsite.com

# माता आणि मातीशी जो नाते जोडतो तोच खरा सुसंस्कारी - मा दिलीप संकपाळ



**सातारा प्रतिनिधी :कलावती गवळी** राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष संस्कार शिबिरातून युवकांना स्वतःहाच स्वतःची ओळख होत असते. दत्त गावात युवक फक्त श्रम करायलाच येत नाही तर जाताना गावातील सुसंस्काराची शिदोरी आपल्याबरोबर घेऊन जातो. जगात आपली आई सर्वात मोठी शिल्पकार आहे. आपल्या आयुष्यात जो माता आणि मातीशी नाते जोडतो तोच खरा सुसंस्कारी असतो असे उदगार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजीव सेवक मा. दिलीप संकपाळ यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे खोजेवाडी ता जि. सातारा येथे संपन्न झाले. या शिबिरातील समारोप समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड हे होते.

मा दिलीप संकपाळ आपल्या भाषणात पुढे म्हणाले, श्रमसंस्कार शिबिरातून मैत्री जोपासली जाते व ती दीर्घकाळ टिकते. आपला देश तरुणांच्या बाबतीत श्रीमंत आहे. त्यांना दिशा देऊन त्यांच्या श्रमाचा वापर देश समृद्धीसाठी केला पाहिजे. शिक्षणमहर्षी डॉ.बापूजींनी शिक्षण संस्था निर्माण करून बहुजनांना शिक्षण दिलेच पण हे कार्य करताना त्यांनी माणसं हेरली. निर्माण केलेली संस्कार केंद्र त्यांच्या ताब्यात दिली. त्यांनी अपार परिश्रमाने त्या संस्कार केंद्रांचा विकास केला म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्रात ही ज्ञानमंदिरं उभी राहिली. या संस्कार केंद्रात तुम्ही शिक्षण घेत आहात हे तुमचे फार मोठे भाग्य आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, विद्यार्थ्यांनी श्रमदानातून जे काम केलं आहे ते अतिशय उल्लेखनीय आहे. तुम्ही चार भिंतीच्या बाहेरच शिक्षण घेतलं, समाजात मिसळलात आणि समाजाशी नाळ जोडून एकरूप झालात. हेच शिबिराचे फलित आहे.

वक्तृत्व , कर्तृत्व आणि नेतृत्व शिबीर देतात. स्वच्छता हा संस्कार आहे की जो परमेश्वरानंतर येतो. ते तुम्ही या गावात दाखवून दिले आणि महात्मा गांधीजींचा आणि संत गाडगेबाबांचा आदर्श ठेवला त्याबद्दल हे गाव कृतज्ञ राहील.

या कार्यक्रमात मा. संजय (बाबा) घोरपडे पंचायत समिती सदस्य आपल्या मनोगतात म्हणाले, काम करताना अनुभवातून ज्ञान मिळतेच पण त्याचबरोबर शिक्षणाचीही आवश्यकता असते. श्रमसंस्कारातून चांगल्या गुणांचा विकास होतो. श्रमसंस्कार शिबिरामुळे आमच्या गावातील वर्षानुवर्ष प्रलंबित असलेले प्रश्न सुटले. गावाची एकी झाली. ही एन एस एस ची ताकद आहे. तसेच डॉ. बापूजींनी ज्ञान , विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणाचा प्रसार केला. समाजसेवेचे संस्कार दिले. असे ते म्हणाले.

श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभात कु.अक्षदा जाधव व श्री विक्रांत मोरे यांनी विद्यार्थी मनोगत व्यक्त केले. तसेच ग्रामस्थांच्यावतीने सांप्रदायिक भजनी मंडळाचे श्री सुशांत महाराज घोरपडे व प्राध्यापकांच्यावतीने डॉ.संतोष सोंडगे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत कार्यक्रमाधिकारी डॉ संदीप लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा शीतल सालवाडगी यांनी केले. तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ सुनील पवार यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी सातारा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री दत्ता घाडगे , नागठाणे पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री धनाजी कणसे, ग्रामपंचायत सदस्या सौ. हिराबाई घोरपडे, सौ.सुनीता साळुंखे, सौ.मनीषा सातपुते तसेच सौ. ज्योती मदने, माजी प्राचार्य मा. शिवाजी पाचुपते, श्री विश्वनाथ साळुंखे , सर्व ग्रामस्थ, प्रतिष्ठित नागरिक, युवा मंडळातील पदाधिकारी व सर्व सदस्य, आजी-माजी सैनिक संघटनेचे सर्व सदस्य, मराठी शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक, महाराष्ट्र हायस्कूलचे मुख्याध्यापक व शिक्षक, महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच सर्व स्वयंसेवक स्वयंसेविका, राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

सकाळ

# आत्मसन्मान जपणे हेच यशस्वितेचे सूत्र

## किशोर काळोखे ; खोजेवाडीमध्ये श्रमसंस्कार शिबिर

**लिंबाचीवाडी, ता. २८ :** अनुकरण, आकर्षण आणि आभासी जग हे क्षणिक आहे. मान, सन्मान आणि आत्मसन्मान जपणे हे यशस्वी जगण्याचे सूत्र आहे, असे मत सुपरिचित वक्ते श्री. किशोर काळोखे यांनी व्यक्त केले.

नागठाणे येथील आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रामपंचायत खोजेवाडी आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात खोजेवाडी (ता. सातारा) येथे तारुण्याच्या उंबरठ्यावर या विषयावर ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच अशोक मदने होते. श्री. काळोखे म्हणाले, ''तारुण्यातील गुर्मीचे रूपांतर उर्मीमध्ये करायला हवे. तंत्रज्ञानात आपले अवघे विश्व आपण हरवून बसतो. आपली खरी ओळख बोलणे, वागण्यात आणि कार्यात आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन हा स्वतःला चिकित्सक बनवतो. आदर, आस्था आणि आपुलकीने आपण मन जिंकतो हे लक्षात घ्यायला हवे. आपण निर्व्यसनी, निरोगी आणि निकोप जीवन जगण्याला प्राधान्य द्यायला पाहिजे.''



**खोजेवाडी** : किशोर काळोखे यांचा सत्कार करताना प्रतीक्षा जाधव. त्या वेळी अशोक मदने आदी.

स्नेहा पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रतीक्षा जाधव यांनी आभार मानले. अमिता गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्या हिराबाई घोरपडे, प्रा. अभय जायभाये, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप लोखंडे, डॉ. सुनील पवार, डॉ. जयमाला उथळे, प्रा. भालचंद्र बिचितकर, प्रा. डॉ. संतोष सोंडगे, प्रा. शीतल सालवाडगी, प्रा. सुनीता जाधव, प्रशांत सावंत, तसेच स्वयंसेवक, स्वयंसेविका आणि ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

Satara, Satara-Today
29/01/2025 Page No. 4

# माता आणि मातीशी जो नाते जोडतो तोच खरा सुसंस्कारी : दिलीप संकपाळ

सातारा न्यूज:

[illegible]




[illegible]

## विकासाभिमख केंद्रीय अर्थसंकल्प - डॉ धनंजय दातार

## मकल माधव फाउंडेशनच्या सेरेब्रल पाल्सी ग्रस्त रुग्णांच्या शिबिरात तपासणी